अहवाल क्रमांक : १५१

# पंचायती राज समिती

# (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

(पंचायती राज समितीच्या तेराव्या विधानसभेतील दुसऱ्या अहवालातील गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा अनुपालन अहवाल )

# दुसरा अनुपालन अहवाल

सत्यमेव जयते

(सदर अहवाल दिनांक डिसेंबर, २०१७ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१७

# पंचायती राज समिती
# (२०१७-२०१८)

## (तेरावी  महाराष्ट्र विधानसभा)

(पंचायती राज समितीच्या तेराव्या विधानसभेतील दुसऱ्या अहवालातील गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा अनुपालन अहवाल )

# दुसरा अनुपालन अहवाल

# पंचायती राज समिती

**(सन २०१७-२०१८)**

**समिती प्रमुख :**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री. आर. टी.देशमुख, वि.स.स.
७. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
८. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.
९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री. भारत भालके , वि.स.स.
१७. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. श्री. तानाजी सावंत, वि.प.स.
२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख :**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. श्री. के.सी.पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रूपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची " कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

६. श्री. आर. टी.देशमुख, वि.स.स.

७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

१५. श्री. के. सी. पाडवी, वि.स.स.

१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१७. श्री. अमित झनक, वि.स.स.

१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२४. श्री. रामहरी रूपनवर, वि.प.स.

२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. ना.रा. थिटे, उप सचिव

(४) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

**पंचायती राज समिती**
**(सन २०१३-२०१४)**

**समिती प्रमुख :**

१. श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री. वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५. श्री. विजयराव खडसे, वि.स.स.
६. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७. श्री. दिलीप माने, वि.स.स.
८. श्री. भारत भालके, वि.स.स.
९. श्री. बाबासाहेब पाटील, वि.स.स.
१०. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
११. डॉ. राजेंद्र शिंगणे, वि.स.स.
१२. श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.
१३. श्री. संजय भेगडे, वि.स.स.
१४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
१५. श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.
१६. श्री. संजय राठोड, वि.स.स.
१७. श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
१८. ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
१९. श्री. प्रकाश भोईर, वि.स.स.
२०. श्री. राजाराम ओझरे, वि.स.स
२१. श्री. एम. एम. शेख, वि.प.स.
२२. डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.
२३. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२४. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२५. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित :**

२६. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
२७. श्री. सुरेश हळवणकर, वि.स.स.
२८. श्री. दादाराव केचे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. गंगाधर कोहळे, उप सचिव
(४) श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन तेराव्या विधानसभेतील समितीच्या दुसऱ्या अहवालातील गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालासंबंधीच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीसंबंधी दुसरा अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ करिता समिती दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परिक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य  झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येय धोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती साहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला " Mini Legislature " सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहित पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात, त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो, परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र  योजना  अस्तित्वात  आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालन सुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता.केलेल्याचुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याच प्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणे देखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तींवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई देखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासन खाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा ऊहापोह केला आहे.

सन २०१५-१६ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या समितीचा पहिला व दुसरा अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांस दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर करण्यात आला.

शासनाने समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईच्या संबंधात जारी केलेले आदेश, परिपत्रके इत्यादी परिशिष्टांमध्ये समावेश केले आहेत. शासनाकडून आलेल्या माहितीच्या संदर्भात समितीने गोंदिया जिल्हा परिषदेच्या संदर्भात दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या संदर्भात दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

त्या अहवालातील समितीच्या शिफारशींवर शासनाने केलेली कार्यवाही विचारात घेतल्यानंतर समितीच्या अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केलेल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी डॉ.विजय सतबीर सिंह, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, (व्यय) वित्त विभाग, श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसूल विभाग, श्री.संजीव कुमार, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, श्री.नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.वि.रा.नाईक, सचिव, ग्रामविकास विभाग (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना), डॉ.एस.के. बागडे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा, श्री.वि.ज.सुरळकर, संचालक, विमा संचालनालय, डॉ.सी.एल. पुलकुंडवार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया, श्री.शेखर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, श्री.व्ही.व्ही.गुजर, सह सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.भा.र.गावित, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्रीमती शुभांगी शेठ, सह सचिव, वित्त विभाग, श्री.श.मा.साठे, उप सचिव, कृषी व पदुम (पदुम) विभाग, श्री.ला.रा.गुजर, उप सचिव, महिला व बालविकास विभाग, श्रीमती.स्मिता निवतकर, उप सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.भि.य.मंता, उप सचिव, उर्जा विभाग, श्री.प्रकाश इंगोले, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.ना.भा.रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीच्या कामकाजात दिलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :**
नागपूर,
दिनांक : १९-१२-२०१७.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रकरण एक** **जिल्हा परिषद, गोंदिया** | |
| एक | पंचायत समिती, अर्जुनी/मोरगांव अंतर्गत हातपंप/ विद्युत पंप/दुरुस्ती वर्गणीची थकबाकी | १ |
| दोन | विधवा महिलांच्या मुलींच्या लग्नासाठी वाढीव अर्थसहाय्य देण्याबाबत | ४ |
| | **प्रकरण दोन** **जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग** | |
| तीन | प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या रिक्त पदाबाबत | ८ |
| चार | पंचायत समिती, वेंगुर्ले येथे जागा उपलब्ध नसलेल्या बेघर लोकांना घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत | १३ |
| पाच | पाचवी ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित विषय शिकविण्यासाठी स्वतंत्र तज्ज्ञ शिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत | २१ |
| सहा | पंचायत समिती, कुडाळ मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी २० टक्के रकमेपेक्षा कमी खर्च केल्याबाबत | २८ |
| | **परिशिष्ट “ अ ”** शासनाचे आदेश व परिपत्रके | ३१ |
| | **परिशिष्ट “ ब ”** समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | १११ |

प्रकरण एक

# जिल्हा परिषद, गोंदिया

## पंचायत समिती, अर्जुनी/मोरगांव अंतर्गत हातपंप/विद्युत पंप/दुरुस्ती वर्गणीची थकबाकी

गोंदिया जिल्हा परिषदेच्या सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ च्या अनुषंगाने दिनांक ०८ जानेवारी, २०१४ रोजी पंचायती राज समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी पंचायत समिती, अर्जुनी/मोरगांव यांचे गोदामात सध्या ऑईल इंजीन ९ नग, पेट्रोकेरोसीन पंप २ नग, विद्युत पंप ७६ नग, तीन फाळी नांगर १३ नग, एमी.बी.प्लो १३ नग व डायमेथोएट २२ लि., सल्फर ८५ कि. शिल्लक आहेत. अशी माहिती प्राप्त झाली.

समितीने अुर्जनी-मोरगांव पंचायत समितीस दिनांक ८ जानेवारी, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी, विद्युत पंपाच्या संदर्भात फिजिबिलिटी रिपोर्ट न मिळाल्यामुळे विद्युत पंप वितरीत करता आले नाही. विद्युत जोडण्या देण्यास लाभार्थी योग्य आहेत की, नाही या संदर्भात हा लागत असतो. हा अहवाल वीज वितरण कंपनी देत असते. सन २०१०-२०११ मध्ये ७६ पंप शिल्लक होते. परंतु त्यापैकी ६६ विद्युत पंप वितरीत करण्यात आले असून, आता सर्व विद्युत पंप वितरीत करण्यात आले आहेत. तसेच सन २०१२-२०१३ मधील विद्युत पंपाच्या वितरणाचे काम आता सुरु आहे अशी माहिती प्राप्त झाली.

समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्यांबाबत अधिक माहिती मागविली.

आजपर्यंत किती विद्युत पंप वितरीत करण्याचे बाकी आहे व किती विद्युत पंपाना फिजिबिलिटी रिपोर्ट मिळाले नाहीत. वितरीत केलेल्या किती पंपाना विद्युत जोडण्या देण्यात आलेले आहे व किती बाकी आहेत.

उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील माहिती प्राप्त झाली.

(१) पंचायत समिती अुर्जनी-मोरगांव, जि.गोंदिया यांनी प्रस्तुत वर्षी एकूण ११४ विद्युत पंपाचे पूर्ण वाटप केले असून, वाटप शिल्लक नाही.

(२) अद्याप ६१ विद्युत पंपाच्या प्रकरणी फिजिबिलिटी रिपोर्ट अप्राप्त आहेत.

(३) महावितरणाकडून एकूण २० विद्युत पंपाना विद्युत जोडणी देण्यात आली असून, अद्याप ९४ विद्युत पंप संचास विद्युत जोडणी देणे बाकी आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २६ जून, २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे कृषी विभागाच्या अपर मुख्य सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्दयासंदर्भात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी आपला दुसरा अहवाल सादर करुन पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या.

"समितीने अर्जुनी-मोरगांव पंचायत समितीच्या कार्यालयास दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१०-११ या वर्षासाठी ७६ पंप शिल्लक असल्याचे आढळून आले. या संदर्भात फिजिबिलीटी रिपोर्ट न मिळाल्यामुळे विद्युत पंप वितरीत करता आले नाहीत असा समितीस खुलासा प्राप्त झाला. त्यावर शासन १००% विद्युतीकरणाचा प्रयत्न करीत असताना अशी उत्तरे समितीस प्राप्त झाल्याबाबत समितीने नापसंती व्यक्त केली. एकूण ११४ विद्युत पंपाचे वाटप झाले होते. त्यापैकी फक्त २८ वीज पंपाना वीज जोडणी देण्यात आली व उर्वरित ८६ विद्युत पंप वीज जोडणीच्या प्रतिक्षेत होते. विद्युत पंप वितरण योजना अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी होती. या योजनेतून एका जोडणीसाठी दीड ते दोन लाख रुपये खर्च येतो व ही रक्कम भरल्याशिवाय महावितरण कंपनी हा खर्च करण्यास तयार नाही. तथापि, रुरल इलेक्ट्रीफिकेशन कॉर्पोरेशन लाभार्थ्यांची कुवत पाहून कर्ज पुरवठा करते. त्यामुळे १९१०५ हजार विद्युत पंपांपैकी ७५२२ विद्युत पंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या होत्या. उर्वरित अद्याप प्रलंबित आहेत. ही परिस्थिती सर्वच जिल्ह्यांमध्ये असल्याने राज्यासाठी ही बाब अतिशय गंभीर असल्याचे मत समितीने व्यक्त केले आहे. लाभार्थ्यांना विद्युत पंप मोफत दिलेले असून अजून ६६५० लाभार्थ्यांना वीज जोडणी देणे बाकी आहे. याचा खर्च एस.सी.पी. वा डी.पी.सी. मधून केल्याशिवाय पुढील कामे होऊ शकणार नाहीत असेही मत समितीने व्यक्त केले आहे.

भारत देशाप्रमाणेच महाराष्ट्रातील अर्थव्यवस्था सुध्दा शेतीवर आधारित आहे. गोंदिया/भंडारा हे जिल्हे "तलावांचे जिल्हे" म्हणून प्रसिध्द आहेत. गोंदिया जिल्ह्यात तलावांद्वारे मुबलक पाणी पुरवठा शेतीसाठी होवू शकतो. तथापि, विद्युत पंपाना वीज जोडणी अभावी पाणीसाठा असूनही तो शेतीसाठी उपलब्ध होवू शकत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

उक्त बाबी विचारात घेता शेतकऱ्यांना विद्युत पंपाचे विहित कालावधीत वाटप होणे व त्यांना विद्युत जोडणी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. सबब, समिती शिफारस करते की, राज्यात ज्या भागात विद्युत पंपाचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो आहे अशा ठिकाणी महावितरण कंपनी /डी.पी.सी./राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना पैकी कोणत्याही माध्यमाद्वारे विद्युत पंपांना जोडणी देण्यासंदर्भात ऊर्जा विभागाकडे प्रलंबीत कृषी विद्युत पंपाची संख्या विचारात घेता विज जोडणीचे प्रस्ताव वर्षानुवर्षे प्रलंबीत राहतात. त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध असूनही विजे अभावी त्यांचे शेतात सिंचन करता येत नाही व त्यामुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक पावसावर अवलंबून राहावे लागते. विज जोडण्या वेळीच दिल्या गेल्या तर शेतकऱ्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणावर सिंचन होवून त्याचा लाभ त्यांना मोठ्या प्रमाणावर मिळू शकतो. परंतु शासनाच्या उदासिन धोरणामुळे शेतकऱ्यांना दोन ते तीन वर्षे उलटूनही विज जोडणी दिली जात नाही. पर्यायाने शेतकऱ्यांचे कृषी पंप असूनही त्यांचा उपयोग होत नाही. यास्तव शेतकऱ्यांचा कृषी पंपाच्या विज जोडणीसाठी अर्ज आल्यास तो कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसात निकाली काढून विज जोडणी देण्यात यावी. ही विज जोडणी देण्याचे अधिकारी कार्यकारी अभियंता/उप अभियंता (विद्युत) यांना देण्यात यावेत आणि या संदर्भात स्वयंस्पष्ट व परिणामकारक शासन निर्णय निर्गमित करावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे."

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, गोंदिया यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

समितीने पंचायत समिती अर्जुनी मोरगांव कार्यालयास दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१०-११ वर्षातील रोजगार हमी योजनेअंतर्गत अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांना वाटप करावयाचे ११४ पंपापैकी ७६ पंप संच गोदामात शिल्लक असल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले होते. सदर ७६ पंपास विद्युतीकरणासाठी तंत्राकडून लागणाऱ्या फीजीबिलीटी सर्टीफिकेट अभावी पंप संच वाटपाचे प्रतिक्षेत होते. फीजीबिलीटी सर्टीफीकेट एम.एस.इ.बी.ला संबंधीत लाभार्थ्याकडून सादर झाल्यानंतर ११४ संचाचे पुर्णतः वाटप होवून त्यापैकी २८ पंपं संचास वीज जोडणी सदर कालावधीपर्यंत झालेली होती. उर्वरित ८६ पंपास वीज जोडणी देण्याचे काम प्रगतीपथावर होते.

सद्यस्थितीत ११४ पंप संचापैकी ११३ पंप संचास वीज जोडणी झालेली असून १ लाभार्थी शेतकरी वीज जोडणीसाठी इच्छुक झालेला दिसून आलेला नाही.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

**ऊर्जा विभागाचे अभिप्राय :-**

अर्जुनी-मोरंगाव पंचायत समितीने वाटप केलेल्या ११४ पैकी ११३ विद्युत पंपाना महावितरण कंपनीमार्फत विद्युत जोडणी देण्यात आली असून उर्वरित १ लाभार्थी मृत्यू पावल्यामुळे विद्युत जोडणी देण्यात आली नाही. कृषीपंप अनुशेष योजना, विदर्भ व मराठवाड्याकरीता विशेष पॅकेज व पायाभूत आराखडा-२ या योजना सद्यस्थितीत राबविण्यात येत आहेत.

उपरोक्त योजनांतर्गत मागील ५ वर्षात उपलब्ध निधीनुसार महावितरण कंपनीकडून गोंदिया जिल्ह्यात खालीलप्रमाणे वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

| वर्ष | महावितरणकडून दिलेल्या वीज जोडण्या |
|---|---|
| सन २०१२-१३ | १७१८ |
| सन २०१३-१४ | १७५६ |
| सन २०१४-१५ | २०९५ |
| सन २०१५-१६ | ३६४१ |
| सन २०१६-१७ | ३१३१ |

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने गोंदिया जिल्हा परिषदेच्या सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात दुसरा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की, सदर विषयाच्या संदर्भात विभागाची भूमिका काय आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांनी समितीस विदित केले की, ११४ व्यक्तींना वीज जोडणी मिळाली नव्हती, त्यापैकी ११३ व्यक्तींना आता वीज जोडणी मिळाली आहे. एका व्यक्तीने पत्र दिले आहे की, वीज जोडणी नको आहे, त्यामुळे आता कार्यवाही पूर्ण झाली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने आता दिलेले उत्तर छापील उत्तरात का दिले नाही शासनाचे अभिप्राय लिहिलेले आहेत त्यामध्ये हे उत्तर का नाही. यावर उप सचिव, ऊर्जा विभाग यांनी समितीस विदित केले की, ११४ प्रकरणे प्रलंबित होती, त्यापैकी ११३ प्रकरणामंध्ये वीज जोडणी दिली आहे. उत्तरात वर्षनिहाय माहिती दिली आहे. पुढील वर्षात किती पंपांना वीज जोडणी देत आहोत याचीही माहिती दिली आहे. दिनांक ३१ मार्च, २०१७ ला २८२४ प्रकरणे प्रलंबित आहेत. सध्या चालू असलेल्या कार्यक्रमाच्या वेगाप्रमाणे हे काम या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मुळात वीज जोडणी करणे हे वीज वितरण कंपनीचे काम आहे. त्यामुळे सर्वप्रथम महावितरण कंपनीने वीज जोडणी करणे आवश्यक आहे. त्यानंतरच विभागाकडून त्यावर उत्तर येऊ शकते. यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, शासनाने जी माहिती सादर केलेली आहे ती अद्ययावत आहे. डीपीडीसी, ओटीएसपी, टीएसपी इत्यादींच्या माध्यमातून पंप जोडणीसाठी अनुदान दिले जाते. यावर समितीने अशी विचारणा केली की, कंपनीने वीज जोडणीच्या कामाचा वेग वाढविला तर हा प्रश्न सुटू शकतो. प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, महावितरण कंपनीने गोंदिया जिल्ह्यात २०१४-१५ मध्ये २०१५, २०१५-१६ मध्ये ३६४१ आणि २०१६-१७ मध्ये ३१३१ वीज पंपांना जोडण्या दिल्या आहेत. मागच्या वर्षातील वीज पंप जोडणीचा वेग पाहता प्रलंबित वीज जोडण्या या वर्षी पूर्ण करण्यात येतील. यावर समितीने निदेश दिले की, सदरहू काम पूर्ण करण्याच्या अनुषंगाने योग्य ते नियोजन करावे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने सन २०१०-११ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ च्या अनुषंगाने पंचायत समिती अर्जुनी/मोरगांव येथे भेट देवून पंचायत समितीच्या गोदामातील वस्तूंची व वस्तूंच्या नोंदवहीतील नोंदीची पडताळणी केली असता सन २०१०-११ मधील ७६ विद्युत पंप वीज जोडणी अभावी वितरीत करणे शिल्लक होते. यासंदर्भात समितीने विषयाचे गांभिर्य लक्षात घेऊन कृषी पंपाच्या वीज जोडणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यावर तो तीस दिवसांत निकाली काढून वीज जोडणी द्यावी अशी आग्रहाची शिफारस केली होती. समितीच्या शिफारशीनुसार ११४ पंप संचापैकी १ लाभार्थी मृत्यू पावल्यामुळे विद्युत जोडणी देता न आल्यामुळे सदर ७६ पंपासहीत एकूण ११३ पंप संचास वीज जोडणी देण्यात आली असल्याची माहिती समितीस अनुपालन अहवालावरील साक्षीच्या दरम्यान प्राप्त झाली. समितीच्या मते सदरहू बाब उल्लेखनीय असून अभिनंदनास पात्र आहे. **याबरोबरच माहे मार्च, २०१७ अखेर प्रलंबित असलेल्या वीज जोडण्याचे काम तातडीने पूर्ण करावे तसेच शासनाने हाती घेतलेली कृषी पंप अनुशेष योजना, विदर्भ व मराठवाड्याकरीता विशेष पॅकेज व पायाभूत आराखडा २ या योजनांना विभागाने गती द्यावी व त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, गोंदिया

### विधवा महिलांच्या मुलींच्या लग्नासाठी वाढीव अर्थसहाय्य देण्याबाबत

गोंदिया जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ या वर्षातील वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक १ संदर्भात दिनांक ०९ जानेवारी, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी, विधवा महिलांच्या मुलींच्या लग्नासाठी २००० रुपयांची जी रक्कम आहे ती अतिशय तुटपुंजी असल्यामुळे त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता व्यक्त करून सामूहिक विवाहामध्ये १० हजार रुपये दिले जातात अशी माहिती दिली.

समितीने जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक २६ जून, २०१४ रोजीच्या आयोजित साक्षीच्या वेळी समितीने विधवा महिलेच्या मुलीच्या लग्नाकरिता सहाय्य देण्यात येत असलेले रु.२,०००/- चे अनुदान रकमेत वाढ करण्याबाबत शासनाचे काय धोरण आहे या मुद्यांची माहिती मागविली.

उपरोक्त मुद्याबाबत महिला व बालविकास विभागाने समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती पुरविली.

महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणारी निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान ही योजना शहरी भागाकरिता, या विभागाचे संबंधित जिल्ह्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत तर ग्रामीण भागाकरिता, जिल्हा परिषदेतील महिला व बाल विकास विभागामार्फत (अधिसूचना १९ ऑक्टोबर २००० नुसार-हस्तांतरीत योजना) राबविण्यात येत आहे.

दिनांक २५/०५/२००१ चा योजनांचा सर्वसमावेशक शासन निर्णयानुसार या योजनेमध्ये रु.२,०००/- इतके अनुदान देण्याची तरतूद होती. तथापि, या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान रु.२,०००/- वाढविण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती. त्यानुसार दि.२९/१/२०१४ रोजीच्या मंत्रीमंडळात याबाबत निर्णय होऊन, महिला व बाल विकास विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र.२२०/का-२, दि. १५ फेब्रुवारी, २०१४ अन्वये योजनेच्या अनुदानात वाढ करून रु.१०,०००/- इतके अनुदान करण्यात आलेले आहे. (सोबत शासन निर्णय दि.१५ फेब्रुवारी, २०१४ ची प्रत सादर) या दिनांक १५ फेब्रुवारी, २०१४ चे शासन निर्णयानुसार निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान ही योजना रद्द करून, शासन निर्णय दि.३०/९/२०११ अन्वये कार्यान्वित शुभ मंगल सामुदायिक विवाह योजनेची व्याप्ती वाढवून, ती केवळ शेतकरी/शेतमजूर यांच्यासाठी न ठेवता, अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग वगळता अन्य प्रवर्गातील रुपये एक लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या निराधार/ परित्यक्त्या आणि विधवा महिलांच्या केवळ दोन मुलींच्या विवाहाकरिता शासन निर्णय दिनांक ३०/९/२०११ मधील इतर अटी/शर्तीनुसार मंजूर करण्याचा निर्णय झालेला आहे. या योजनेची अंमलबजावणी दिनांक ०१/०१/२०१४ पासून करण्यात येणार असून, योजना पूर्णतः जिल्हा नियोजन समितीमार्फत राबविण्यात येणार असून, याकरिता जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

समितीने दिनांक २६ जून, २०१४ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी आपला दुसरा अहवाल सादर करून पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या.

“विधवा महिलेच्या मुलीच्या लग्नासाठी शासनाने सन २०११ पासून रु.२,०००/- एवढ्या रकमेची तरतूद केलेली आहे.शुभमंगल नोंदणीकृत विवाह योजनेंतर्गत मुलीच्या विवाहासाठी तिच्या हयात असलेल्या आई/वडील यांच्या नाव्याने रु.१०,०००/- अनुदान देण्यात येते व विवाह आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना प्रती जोडपे रु.२,०००/- अनुदान देय असते. आंतरजातीय विवाह सामाजिक न्याय विभागामार्फत करणाऱ्या जोडप्यास रु.५०,०००/- तसेच महिला व बालविकास विभागामार्फत विधवा व परित्यक्त्या यांच्या मुलीच्या विवाहासाठी रु.१०,०००/- एवढे अनुदान देय असते. ही सर्व अनुदानाची रक्कम सध्याची महागाई पहाता अत्यंत अल्प असून प्रचलित शासन निर्णयामध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे अशी समितीची धारणा झालेली आहे.

शुभमंगल योजने अंतर्गत अथवा विधवा महिलेच्या मुलीचे विवाह आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना विवाह खर्च अथवा अनुदान म्हणून रु.२,०००/- देण्यात येतात. त्या ऐवजी रु.५,०००/- शुभमंगल नोंदणीकृत विवाह योजनेंतर्गत मुलीच्या विवाहासाठी रु.१०,०००/- ऐवजी रु.२५,०००/- एवढे अनुदान तसेच आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन म्हणून देणाऱ्या रकमेत आवश्यक ती वाढ करण्यात यावी. तसेच या विवाह इच्छुक जोडप्याना लाभ देताना ज्या कागदपत्रांची मागणी करण्यात येते ती वेळ खाऊ असून

लाभार्थ्यांना अनुदान मिळण्यास प्रचंड विलंब होत असल्याने या अटी शिथील करुन सोप्या व सुटसुटीत पध्दतीने लाभ देण्याबाबत विभागाने शासन निर्णयात तात्काळ दुरुस्ती करून कार्यवाही करावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे."

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, गोंदिया यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

विधवा महिलेच्या मुलीच्या लग्नासाठी व शुभमंगल योजनेंतर्गत अथवा विधवा महिलेच्या मुलीचे विवाह आयोजित करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना विवाह खर्च/अनुदान इत्यादीसाठी शासनाकडून देण्यात येणारे अनुदान अल्प असल्याने त्यामध्ये सुधारणा होऊन अटी व शर्ती शिथील होण्याबाबत समितीने शिफारस केलेली आहे. त्यानुसार स्वयंस्पष्ट, परिपूर्ण व सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करणे ही बाब शासन स्तरावरील आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

**महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय :-**

या विभागाच्या दिनांक ३०.९.२०११ च्या शासन निर्णयानुसार शुभमंगल सामुहिक विवाह योजनेंतर्गत विधवा महिलेच्या मुलींच्या विवाहासाठी तिच्या हयात असलेल्या आई-वडील यांच्या नावाने सन २०११ पासून रु.१०,०००/- इतके अनुदान तर विवाह आयोजित करणाऱ्या संस्थांना रु.२०००/- प्रति जोडपे इतके अनुदान शासनामार्फत देणेत येते. सदर बाबीसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

यासंदर्भात समितीने केलेल्या शिफारशींनुसार शुभमंगल सामुहिक विवाह योजनेंतर्गत सध्या देण्यात येणाऱ्या विवाहासाठीच्या लाभार्थ्यांना द्यावयाच्या अनुदानात रु.१०,०००/- ऐवजी रु.२५,०००/- व विवाह आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या अनुदानात रु.२०००/- ऐवजी र.५०००/- प्रति जोडपे इतकी वाढ करण्याचा प्रस्ताव विभागामार्फत नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास नियोजन व वित्त विभागाची मान्यता मिळल्यानंतर समितीच्या शिफारशीप्रमाणे याबाबतच्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात येतील.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने गोंदिया जिल्हा परिषदेच्या सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात दुसरा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शुभमंगल योजनेंतर्गत अथवा विधवा महिलेच्या मुलींचे विवाह आयोजित करणा-या स्वयंसेवी संस्थांना विवाह खर्च अथवा अनुदान म्हणून २ हजार रुपयांऐवजी ५ हजार रुपये आणि शुभमंगल नोंदणीकृत विवाह योजनेंतर्गत मुलींच्या विवाहासाठी १० हजार रुपयांऐवजी २५ हजार रुपये अनुदान तसेच आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन म्हणून देण्यात येणा-या रकमेत आवश्यक ती वाढ करण्याबाबत समितीने शिफारस केली होती. या शिफारशींच्या अनुषंगाने विभागाने काय कार्यवाही केली आहे, या संदर्भातील सद्यःस्थिती काय आहे, यावर उप सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सदरहू वाढ करण्याच्या प्रस्तावास नियोजन विभागाकडून मान्यता मिळाली आहे. सदरहू प्रस्ताव पुढील मान्यतेसाठी वित्त विभागाकडे सादर करण्यात येईल. सदरहू प्रस्तावाला लवकरात लवकर मान्यता मिळविण्यासाठी विभागाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, विवाह इच्छुक जोडप्याना लाभ देण्यासाठी त्यांच्याकडे कागदपत्रांची जी मागणी केली जाते ती वेळखाऊपणाची आहे. त्यामुळे यातील अटी शिथिल करून तसेच त्या सोप्या व सुटसुटीत करून, जोडप्यांना वेळेवर अनुदान मिळण्यासाठी विभागाने तात्काळ शासन निर्णयात दुरुस्ती करण्याबाबत सुध्दा समितीने शिफारस केली होती. या शिफारशीच्या अनुषंगाने विभागाने काय कार्यवाही केली आहे, यावर उप सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी विदित केले की, ज्यावेळी नवीन शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल त्यावेळी सोप्या व सुटसुटीत शब्दांचा वापर करून त्यात योग्य ती दुरुस्ती करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने गोंदिया जिल्हापरिषदेस भेट देवून सन २०१०-११ च्या वार्षिक प्रशासनावर मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली असता शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या अंतर्गत शासन निर्णय क्रमांक ८१/२००१/ मविधो-२०००/प्र.क्र.४२९/का-२, दिनांकित २५ मे, २००१ अनुसार (परिशिष्ट २.१) विधवा महिलांच्या मुलींच्या लग्नासाठी २०००/- रुपयांची अनुदान देण्याची योजना राबविण्यात येत असल्याची व सदरहू रक्कम अत्यंत तुटपुंजी असल्याची बाब अधोरेखित झाली. त्यानुषंगाने समितीने सदरच्या अनुदान रक्कमेत वाढ करण्याबाबत शिफारस केली होती. सदरहू शिफारशीच्या अनुषंगाने महिला व बालविकास विभागाने शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१२/ प्र.क्र.२२०/का-२, दिनांकित १५ फेब्रुवारी, २०१४ **(परिशिष्ट २.२)** निर्गमित करून सदरहू निराधार विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता रुपये २०००/- अनुदान देण्याची योजना रद्द केली. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०११/प्र.क्र.९३/का-२, दिनांकित ३० सप्टेंबर, २०११ **(परिशिष्ट २.३)** अनुसार शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह योजनेत सदर योजना समाविष्ट करून सदरहू अनुदान रुपये १०,०००/- एवढे वाढविल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते. परंतू समितीची मूळ शिफारस ही सदरहू अनुदान २५,०००/- रुपये एवढे वाढविण्याची व आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत होती. यासंदर्भात महिला व बालविकास विभागाच्या उप सचिवांनी सदरहू प्रस्ताव नियोजन विभागाकडून मंजुरी प्राप्त होऊन वित्त विभागाकडे सादर करण्यात येत असल्याची समितीला माहिती दिली. **त्यामुळे ती केवळ शेतकरी/शेतमजूर यांच्यासाठी न ठेवता, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागासप्रवर्ग वगळता अन्य प्रवर्गातील रुपये एक लक्षपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या निराधार/परित्यक्त्या आणि विधवा महिलांच्या केवळ दोन मुलींच्या विवाहासाठीचे अनुदाने २५,०००/- रुपये करण्याच्या प्रस्तावावर तसेच आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या अनुदानात योग्य ती वाढ करण्यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घ्यावा तसेच सदरहू योजनेकरीता लाभार्थ्यांनी सादर करावयाची कागदपत्रे, अटी व कार्यपध्दती ही सोपी व सुटसुटीत करून लाभार्थ्यांना वेळेवर अनुदान मिळण्यासाठी संबंधित शासन निर्णयात दुरुस्ती करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

# जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

प्रकरण तीन

# जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

## प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या रिक्त पदाबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १७ ते १९ जुलै, २०१४ या कालावधीत सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१०-२०११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक एक बाबत दिनांक १९ जुलै, २०१४ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये एमबीबीएस वैद्यकीय अधिकाऱ्यांबरोबरच बीएएमएस व बीएचएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत तसेच शासनाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी खास बाब म्हणून बीएएमएस व बीएचएमएस डॉक्टरांची भरती करण्याची परवानगी दिलेली आहे. तथापि, हे अभियान डिसेंबर, २०१३ मध्ये संपलेले आहे, याबाबत समितीने माहिती मागितली. तसेच पुरेशा प्रमाणात एमबीबीएस डॉक्टर उपलब्ध होत नाहीत, त्यामुळे पूर्वी बीएएमएस व बीएचएमएस डॉक्टरांची नियुक्ती करण्यास आता अशी परवानगी नसल्यामुळे बीएएमएस व बीएचएमएस डॉक्टरांची नियुक्ती करता येत नाही. तथापि, बीएएमएस व बीएचएमएस डॉक्टर मिळत असतील तर त्यांची नियुक्ती केली पाहिजे व रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली पाहिजे. तसेच काही डॉक्टरांना त्यांची १५ ते २० वर्षे सेवा झालेली असून देखील त्यांना सेवेत कायम करण्यात आलेले नाही. त्यांना सध्या एक-एक वर्षाची मुदतवाढ दिली जाते. या सर्व डॉक्टरांना सेवेत कायम स्वरुपी सामावून घेण्याची आवश्यकता समितीने प्रतिपादीत केली.

समितीस शासनाकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

(१) उमा देवी विरुध्द कर्नाटक शासन या न्यायालयीन प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या आधारे कर्नाटक शासनाने कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सेवेत समावेशन करण्यासाठी नियम विहित केलेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील अस्थायी स्वरुपात कार्यरत असलेल्या ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दि.३१.१२.२००७ रोजी ३ वर्षाची सेवा पूर्ण केलेली आहे व जे दि.२.२.२००९ या अधिसूचनेच्या दिनांकास सेवेत आहेत अशा अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे एक वेळचे समावेशन करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (महाराष्ट्रात अस्थायी म्हणून नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे एक वेळचे समावेशन) विशेष नियम,२००९ केले आहे. सदर नियमातील तरतुदीनुसार अस्थायी वैद्यकीय अधिकारी दि.२.२.२००९ या अधिसूचनेच्या दिनांकास सेवेत होते अशा एकूण १४२१ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ अंतर्गत वैद्यकीय अधिकारी या पदावर समावेशन करण्यात आलेले आहे.

वैद्यकीय अधिकारी या पदाची नियमित सेवेत मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे असल्याने आरोग्य सेवा व्यवस्थित सुरळीत सुरू राहण्याच्या उद्देशाने शासनाने अस्थायी वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला होता. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग/स्वतंत्र निवड मंडळ यांचेकडून एम.बी.बी.एस./बी.ए.एम.एस. उमेदवार उपलब्ध होईपर्यंत नेमणूक सुरू राहील या अटीवर प्राथमिक आरोग्य केंद्र, फिरती पथके इत्यादी ठिकाणी / विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीद्वारे बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अस्थायी नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. सदर अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे शासन सेवेत समावेशन करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयाकडून अधिक माहिती मागविण्यात आली असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) शासन अधिसूचना दि.२/२/२००९ अन्वये अस्थायी एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सन २००९-१० मध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गात समावेशन करण्यात आले आहे. तसेच त्यावेळी काही अस्थायी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे जे ८०००-१३५०० या वेतनश्रेणीत कार्यरत होते त्या अधिकाऱ्यांचे समावेशन सुध्दा करण्यात आलेले आहे. तथापि, काही बी.ए.एम.एस. अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे समावेशन न झाल्यामुळे त्यांनी मा.न्यायाधिकरणात मूळ अर्ज दाखल केले होते. सदर प्रकरणी मा.न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशानुसार शासन अधिसूचना दि.२/२/२००९ मध्ये नमूद अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या इतर अस्थायी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गात समावेशन करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

पंचायती राज समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी उपस्थित झालेल्या उपरोक्त मुद्यांवरुन अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १६ जून, २०१५ रोजी विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्दयासंदर्भात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी आपला दुसरा अहवाल सादर करुन पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या.

"केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा १५ ते २० वर्ष झाली आहे त्यांना सेवेत कायम करण्यात आलेले नाही तसेच एमबीबीएस वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त राहण्याचे प्रमाणही जास्त आहे, असे समितीच्या निदर्शनास आले. या उलट बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे अतिरिक्त भरण्यात आली आहेत. मुळात नियुक्ती पत्र देण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी केवळ ४०% वैद्यकीय अधिकारी सेवेत रुजू होतात असा सर्वसाधारण अनुभव आहे. तसेच राज्यात डोंगराळ भाग, आदिवासी क्षेत्र इ. दुर्गम भागात वैद्यकीय सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाच्या सेवेत असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच पुरेशा प्रमाणात एम.बी.बी.एस. डॉक्टर उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे पुर्वी बी.ए.एम.एस. व बी.एच.एम.एस. डॉक्टरांची नियुक्ती करण्यास शासनाने परवानगी दिली होती. परंतु आता अशी परवानगी नाही. त्यामुळे बी.ए.एम.एस. व बी.एच.एम.एस. डॉक्टरांची नियुक्ती करता येत नाही. एम.बी.बी.एस. डॉक्टरांची अनुपलब्धता विचारात घेता बी.ए.एम.एस. व बी.एच.एम.एस. डॉक्टर उपलब्ध होत असतील तर अशा डॉक्टरांची नियुक्ती करुन रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, असे मत समितीने व्यक्त केले.

सध्याच्या शासन निर्णयानुसार २५% पेक्षा जास्त बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती शासनास करता येत नाही आणि यामुळे राज्यात सुमारे ९०० वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून रुग्णसेवा पुरविण्यात विलंब होत असल्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात यावी व त्यानुसार बीएएमएस/बीएचएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांचे २५% हे प्रमाण वाढविण्यात यावे तसेच शासनाच्या सेवेते असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनात समाधानकारक वृध्दी करण्यात यावी. तसेच त्यांच्या बदल्यांच्या धोरणात बदल करण्यात यावा. त्याचप्रमाणे त्यांना कायम करण्याच्या कालावधीमध्ये देखील शासनाने सकारात्मक विचार करुन तातडीने कार्यवाही करावी. जेणेकरुन एमबीबीएस व पदवीधर डॉक्टर खाजगी सेवेत स्वारस्य न दाखविता शासन सेवेत येण्यास सर्वतोपरी तयार होतील. तसेच राज्यात रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा तातडीने भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे."

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद अंतर्गत वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकूण ७६ पदे मंजूर असून त्यापैकी मार्च, २०१७ अखेरपर्यत ४२ पदे भरली असून ३४ पदे रिक्त आहेत. भरलेल्या ४२ पदांपैकी ४ वैद्यकीय अधिकारी अनधिकृत गैरहजर असून ५ वैद्यकीय अधिकारी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी गेलेले आहेत. तसेच गट-ब संवर्गाची १० पदे मंजूर असून त्यापैकी ७ पदे भरलेली आहेत.

वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत संचालक आरोग्य सेवा व सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याने जिल्हा प्रशासनाने जिल्हा फंडातून जिल्हा परिषदेची मान्यता घेऊन नोव्हेंबर, २०१४ पासून २०१६-२०१७ पर्यंत कंत्राटी तत्वावर १७ बीएएमएस अर्हताधारक उमेदवारांना वैद्यकीय अधिकारी पदावर नियुक्ती दिली आहे. त्यापैकी ७ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. तसेच एनआरएचएम अंतर्गत १७ बीएएमएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत आहेत.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-**

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत गट-ब संवर्गात ७९१ बीएएमएस वैद्यकीय अधिकारी अस्थायी स्वरुपात कार्यरत आहेत. सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या समावेशनाचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे आणण्याची कार्यवाही सुरु आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग व विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले आहेत. उपरोक्त नमुद करण्यात आलेल्या ७९१ बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संख्येत काही बदल झाला असण्याची शक्यता विचारात घेऊन सध्या कार्यरत असणाऱ्या गट-ब वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सद्यस्थितीतील पदस्थापनेसह जिल्हानिहाय यादी क्षेत्रिय कार्यालयाकडून मागविण्यात आली आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे.रु.५४००) संवर्गाची रिक्त पदे संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुलाखतीद्वारे (Walk in Interview) भरण्यासाठी शासन परिपत्रक दि.२४.०६.२०१६ अन्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत शासन पत्र दि.१६.११.२०१६ अन्वये जिल्हाधिकारी यांना कळविले आहे. त्यानुसार दि.२२.११.२०१६ रोजी वैद्यकीय अधिकाऱ्यांची १४ पदे भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली व दि.०५.१२.२०१६, दि.१३.१२.२०१६ व दि.२६.१२.२०१६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मुलाखती घेण्यात आल्या. दि.०५.१२.२०१६ च्या मुलाखतींमधून ६ उमेदवारांची निवड करण्यात आली व त्यापैकी ४ उमेदवारांना जिल्हा शल्यचिकित्सक सिंधुदुर्ग यांच्या अधिनस्त असणाऱ्या रुग्णालयात व २ उमेदवारांना प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये नियुक्ती देण्यात आलेली आहे. तसेच दि.१३.१२.२०१६ रोजी घेण्यात आलेल्या मुलाखतीमधून २ व दि.२६.१२.२०१६ रोजी घेण्यात आलेल्या मुलाखतीमध्ये १ अशा तीन उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे. तथापि, सदर उमेदवार नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत.

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक ३०.११.२०१६ अन्वये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ (वेतनश्रेणी रु.१५६००-३९१००+ग्रेड पे रु.५४००/-) या संवर्गातील तसेच रुग्णसेवा कर्मचाऱ्यांच्या गट-ब ते गट-ड मधील जिल्हाअंतर्गत बदल्यांचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीस प्रत्यार्पित करण्यात आलेले आहेत.

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे अभिप्राय :-**

शासनाने दिनांक २२/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये ५ स्त्री वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तात्पुरत्या सेवा नियमित केलेल्या आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेच्या सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाला संदर्भात दुसरा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी विदित केले की, पंचायती राज समितीने एकूण ४ शिफारशी केलेल्या आहेत. बीएएमएस/एचएमएस वैद्यकीय अधिका-यांचे २५ टक्के हे प्रमाण वाढविण्यात यावे, वैद्यकीय अधिका-यांच्या वेतनात समाधानकारक वृध्दी करण्यात यावी, तसेच त्याच्या बदल्यांच्या, बढतीच्या धोरणात बदल करण्यात यावेत अशा शिफारशी केलेल्या आहेत.यापैकी दोन बाबींवर कार्यवाही करण्यात आलेली आहे. पूर्वी एमपीएससी मार्फत भरती करण्यात येत होती. परंतु आता ते अधिकार विभागाला प्रदान करण्यात आले आहेत आणि त्या प्रमाणे विभागामार्फत भरतीवर कार्यवाही सुरु झालेली आहे. त्याशिवाय मागील वर्षी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करुन त्यांना देखील भरतीचे अधिकार देण्याचा निर्णय झालेला आहे. मागील वर्षी निर्णय झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत या संदर्भात कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यांनी ५५२ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूकीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यापैकी २५९ वैद्यकीय अधिकारी कामावर रुजू झालेले आहेत. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदलीचे अधिकार सुध्दा देण्यात आलेले आहेत. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावरील समितीमार्फत मोठया प्रमाणावर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा भरण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. तरी सुध्दा अजूनही काही ठिकाणी विशेष करुन दुर्गम भागात आणि आदिवासी भागात वैद्यकीय अधिकारी जाण्यास इच्छुक दिसत नाहीत. त्यामुळे आपण बऱ्याच जागा भरु शकलो नाही. सार्वजनिक आरोग्य विभाग जिल्हाधिकारी स्तरावर बीएएमएस पदवीधर वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचा विचार करीत आहे. बीएएमएस किंवा इतर ट्रेडिशनल कोर्सचे शिक्षण घेतलेल्या पदवीधरांचे प्रमाण वाढविले तर त्याचा वैद्यकीय सेवेवर दुष्परिणाम होणार नाहीत. कारण कर्करोगासारख्या गंभीर आजाराच्या उपचारांचे ज्ञान एमबीबीएस, एमडी डॉक्टरांना असते. आयुर्वेद किंवा इतर ट्रेडिशनल कोर्सचे शिक्षण घेतलेल्या डॉक्टरांना कर्करोगासारख्या गंभीर आजारांचे तेवढे ज्ञान नसते. काही ठिकाणी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे आपण हे प्रमाण २५ टक्क्यांपेक्षा थोडे जास्त वाढविण्याचा विचार करीत आहोत. आम्ही शासकीय सेवेत बीएएमएस डॉक्टरांची संख्या वाढविण्याची कार्यवाही करीत आहोत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, २५ टक्क्यांपेक्षा जास्त बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करावयाची नाही असे बंधन आहे. आपल्याकडे बीएएमएस पदवीधर डॉक्टर्स उपलब्ध आहेत. परंतु आपल्याला २५ टक्क्यांपेक्षा जास्त बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती करता येत नाही. तसेच, एमबीबीएस डॉक्टरांची भरती

करावयाची असेल तर ते शासकीय सेवेत रुजू होत नाहीत. कारण, त्यांना खाजगी रुग्णालयांमध्ये जास्त पैसे मिळतात. एमबीबीएस डॉक्टरांनी शासकीय सेवेत यावे यासाठी आपण काही तरी उपाययोजना केल्या पाहिजेत. तसेच २५ टक्क्यांचे जे प्रमाण आहे ते वाढविले पाहिजे. आज राज्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी नाहीत. आपल्याला २५ टक्क्यापेक्षा जास्त बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येत नाही. त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. आपण २५ टक्क्यांचे प्रमाण वाढवून वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा भरणार आहात काय, तसेच एमबीबीएस डॉक्टर शासकीय सेवेत आले पाहिजेत या दृष्टीने शासन धोरणात बदल करणार आहे काय, यावर अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, ज्या ठिकाणी पदे रिक्त आहेत ती भरण्याच्या दृष्टीने भरतीच्या नियमांमध्ये बदल करुन हे प्रमाण २५ टक्क्यापेक्षा थोडे जास्त वाढवून आयुर्वेदिक आणि युनानी पदवीधर डॉक्टरांना सेवेत घेण्यासाठी शासन सकारात्मक विचार करीत आहे. यावर समितीने सांगितले की, या संदर्भात समितीने शिफारस केलेली आहे. यावर अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, शासन त्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हे प्रमाण ५० टक्के केले तर ते योग्य होईल. मुळात म्हणजे एमबीबीएस डॉक्टर खेडयात जाण्यास तयार नाहीत. एमबीबीएस डॉक्टरांनी काही दिवस खेडयात काम केले पाहिजे असे त्यांना बंधनकारक केले पाहिजे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत. आपल्याला बीएएमएस डॉक्टर्स मिळाले तर चांगले होईल म्हणून आपण हे प्रमाण २५ टक्क्यांवरुन ५० टक्के कसे करता येईल यासाठी प्रयत्न करावा. यावर अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, एमबीबीएस किंवा एमडी पदवीधर विद्यार्थ्यांसाठी सर्व्हिस बॉन्ड असतो. त्यांना शासन नियुक्त करील अशा ठिकाणी बॉन्डच्या कालावधीत काम करावे लागते. यावर समितीने विचारणा केली की, डॉक्टरांना तेथे काम करावेच लागेल अशा सूचना केल्या तरच तसे होऊ शकेल. यावर प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांनी समितीस विदित केले की, एम.बी.बी.एस. केल्यानंतर ग्रामीण भागात अनिवार्य १ वर्ष तर पी.जी. झाल्यानंतर २ वर्षे काम करावे लागेल असा बॉंड असतो. त्याप्रमाणे दरवर्षी ५०० ते ६०० डॉक्टर्स सार्वजनिक आरोग्य विभाग उपलब्ध करुन देते. मात्र मागणी जास्त असल्याने मागणीपेक्षा कमी डॉक्टर्स उपलब्ध होतात. आता बॉंड न करता अनिवार्य २ वर्षाची सेवा करावी, असा विचार शासनाच्या वतीने सुरु आहे. पुढच्या अधिवेशनात कायद्यामध्ये तशी संकल्पना आणण्याचाही विचार आहे. अनिवार्य केल्याशिवाय डॉक्टर्स ग्रामीण भागात जात नसल्याने दुसरा एक पर्याय म्हणून सेवेत असलेल्यांना पी.जी. मध्ये प्राधान्य देताना सक्तीची सेवा करता येईल काय, यादृष्टीने विचार सुरु आहे. कदाचित काही महिन्यात याला अंतिम स्वरुप येईल. यावर समितीने विचारणा केली की, पालघरमध्ये जिल्हा परिषदेच्या मार्फत कंत्राटी पध्दतीने डॉक्टर्स नेमून काम सुरु आहे. ही अतिशय सुंदर योजना आहे.शासनास या योजनेबाबत काही माहिती आहे काय, खरोखरच अशी एखादी योजना असेल तर ती गडचिरोली, सिंधुदूर्ग सारख्या ठिकाणी देखील शासनाला सुरु करता येईल. यावर अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, नॅशनल रुरल हेल्थ मिशनच्या नॉर्म्सनुसार कंत्राटी पध्दतीने डॉक्टर्स नेमण्याची प्रक्रिया सुरू असून, त्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून कार्यवाही होते. यावर समितीने विचारणा केली की, पालघर येथे सेस फंडातून काम करण्यात आले आहे यावर अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, सिंधुदूर्ग येथे जिल्हा परिषदेमध्ये सेस फंडातून काही डॉक्टर्सची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मेळघाट सारख्या ठिकाणी जेथे डॉक्टर्स नसतात तेथेही अशी योजना केली पाहिजे. याकरिता राज्य शासनाने जिल्हा परिषदेला तरतूद उपलब्ध करुन दिली पाहिजे. याबाबतचा सर्व भार जिल्हा परिषदेवर टाकून चालणार नाही. यावर अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, शासन देखील अशा ठिकाणी डॉक्टर्सनी जावे याकरिता त्यांना वेतनश्रेणीमध्ये अधिकचा एक स्केल देऊन जास्तीचे वेतन देतो. तसेच, जेथे जिल्हा परिषदेकडे फंड आहे. जेथे डॉक्टर्स नाहीत केवळ अशाच ठिकाणी असे केले जाते. नॅशनल रुरल हेल्थ मिशनमध्ये केंद्र शासनाचा सहभाग ६० टक्के तर शासनाचा सहभाग ४० टक्के एवढा आहे. या अंतर्गत कंत्राटी पध्दतीने डॉक्टर्स नेमण्याची कार्यवाही केली जाते. यावर समितीने अशी विचारणा केली की, सिंधुदूर्ग जिल्ह्यात या अंतर्गत किती डॉक्टर्सची नेमणूक करण्यात आली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग यांनी समितीस विदित केले की, सिंधुदूर्ग जिल्ह्यात सी.आय.एस.च्या माध्यमातून ३ बी.ए.एम.एस चे राष्ट्रीय रुरल हेल्थ मिशनमधून १७ डॉक्टर्स अशा प्रकारे एकूण २० डॉक्टर्स कार्यरत आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने सिंधुदूर्ग जिल्हा परिषद येथे भेट देवून सन २०१०-११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान सिंधुदूर्ग जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याची माहिती प्राप्त झाली. सिंधुदूर्ग जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात थोड्याफार प्रमाणात

अशीच परिस्थिती असल्याचे लक्षात घेवून राज्यातील सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये १५-२० वर्षे अस्थायी स्वरुपात काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्याची व सध्याच्या शासन निर्णयानुसार शासकीय रुग्णालयातील बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाण २५ टक्यांवरुन वाढविण्याची शिफारस समितीने केली होती.

सदरहू शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने शासन परिपत्रक दिनांक २४ जून, २०१६ **(परिशिष्ट ३.१)** अन्वये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-१ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी ग्रेड पे (५४००) संवर्गाची रिक्त पदे भरण्याचे अधिकार आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचा शासन निर्णय क्रमांक बदली-१३-१४/प्र.क्र.५१९/सेवा-२, दिनांकित ३० नोव्हेंबर, २०१६ **(परिशिष्ट ३.२)** अनुसार वैद्यकीय अधिकारी व रुग्णसेवा कर्मचाऱ्यांच्या जिल्हा अंतर्गत बदल्यांचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांच्या समितीकडे प्रत्यावर्तीत करण्यात आल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. अशाप्रकारे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याचे अधिकार शासनाने जिल्हाधिकारी यांच्यापर्यंत प्रत्यावर्तीत केलेले असले तरी राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागात आजही मोठ्या प्रमाणात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. **यासंदर्भात विभागाच्या सचिवांनी समितीस आश्वासित केल्यानुसार शासकीय रुग्णालयातील बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे २५ टक्के हे प्रमाण आणखी वाढविण्याच्या संदर्भातील प्रस्तावावर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा तसेच वैद्यकीय पदवी व पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर ग्रामीण भागात अशा डॉक्टरांना एक ते दोन वर्ष सेवा बॉंड न करता कायद्याद्वारे अनिवार्य करण्याचे जे समितीसमोर सचिवांनी प्रतिपादन केले त्याअनुषंगाने विभागाने तातडीने कार्यवाही करुन संबंधित अधिनियमात बदल करुन तसा प्रस्ताव तातडीने तयार करुन शासनाकडे मंजूरीस पाठविण्यात यावा व त्यादृष्टीने डॉक्टरांना ग्रामीण भागात सेवा अनिवार्य करण्यासंदर्भात निर्णय घ्यावा जेणेकरुन या डॉक्टरांची सेवा ग्रामीण रुग्णांना मिळेल व त्याद्वारे वैद्यकीय सेवा देणे देखील सुकर होईल. याबाबत कार्यवाही करुन समितीस तीन महिन्यात अवगत करावे अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील/आयुर्वेद महाविद्यालयातील तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत उमेदवारांच्या सेवा वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एलइसी-१४/प्र.क्र.२५/वै.सेवा-३, दिनांकित २२ ऑक्टोबर, २०१६ **(परिशिष्ट ३.३)** नुसार नियमित केली असल्याची त्याचबरोबर सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत गट-ब संवर्गात ७९१ बी.ए.एम.एस. वैद्यकिय अधिकारी अस्थायी स्वरुपात असल्याची माहिती समितीस देण्यात आली. सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या समावेशनाचा प्रस्ताव मंत्री परिषदेसमोर आणण्याची कार्यवाही सुरु असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आणूण देण्यात आली. **सदर प्रस्तावास सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, विधी व न्याय विभाग या सर्व विभागांचे प्राप्त झालेले अभिप्राय लक्षात घेवून सदरहू प्रस्तावावर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशीही समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

प्रकरण चार

# जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

## पंचायत समिती, वेंगुर्ले येथे जागा उपलब्ध नसलेल्या बेघर लोकांना घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी मौजे पालकरवाडी, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग ग्रामपंचायतीला भेट दिली असता तेथील ग्रामसेवकाने समितीला दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात बेघरांची मोठी संख्या आहे. त्याचप्रमाणे घरकुलांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी शिल्लक आहे. परंतु या जिल्ह्यात घरकुलांसाठी जमीनी मिळत नसल्यामुळे घरकुलांचे बांधकाम करता येत नाही व त्यामुळे बेघर कुटुंबे या योजनेपासून वंचित आहेत. या जिल्ह्यासाठी घरकुल बांधकामाबरोबरच जमीन विकत घेण्यासाठी देखील शासनाने अनुदान देण्याची आवश्यकता आहे किंवा जमीन अधिगृहीत करुन घरकुलांसाठी ती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे या जिल्ह्यांसाठी शासनाने गावठाण विस्ताराची विशेष योजना राबविण्याची देखील आवश्यकता आहे असे अभिप्राय भेटीच्या वेळी व्यक्त केले.

समितीने साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खालील मुद्यांची माहिती मागविली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात बेघर लोकांची संख्या १ लक्षपेक्षा अधिक दिसून येते. या बेघरांना घरकुल योजनांचा लाभ का दिला नाही, अशी भेटीच्या वेळी विचारणा केली असता, सिंधुदुर्ग जिल्ह्यात जागेचा मोठा प्रश्न असून ज्या बेघर लोकांकडे जागा उपलब्ध नाहीत अशांना घरकुल बांधून देता येत नाही. तेव्हा अशा लोकांना घरकुल बांधून देण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाची काय भूमिका आहे.

समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्याची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात बेघर लोकांची संख्या १ लाख इतकी नसून ती फक्त १९३२५ इतकी आहे.

२) दारिद्र्य रेषेखालील कुटुंब गणना-२००२ नुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण ७१३८६ दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे आहेत.

३) इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार घरकुल लाभार्थ्याला जागा घेण्यासाठी रक्कम रुपये २०,०००/- इतके अनुदान ५०:५० टक्के या प्रमाणात केंद्र व राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येते.

४) ग्रामपंचायत पालकरवाडी, पंचायत समिती वेंगुर्ले व सिंधुदुर्ग जिल्ह्याची दारिद्र्य रेषेखालील संख्या, घरकुल पात्र लाभार्थ्यांची संख्या दर्शविणारे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे.

| तालुका/जिल्हा/ ग्रां.पं. | एकूण दा.रे. संख्या | एकूण बेघर संख्या | सन २०१३-२०१४ अखेर लाभ दिलेले | शिल्लक बेघर | जागा नसलेले | जागा असलेले |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रा.पं.पालकरवाडी | १९५ | ४९ | ३१ | १८ | १८ | ० |
| पं.स.वेंगुर्ला | ७४२५ | १३८६ | ६०७ | ७७९ | ५०७ | २७२ |
| जिल्हा सिंधुदुर्ग | ७१३८६ | १९३२५ | ११९५६ | ७३६९ | २५२५ | ४८४४ |

१) ज्यांच्याकडे जमीन नाही अशा लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार रु.२० हजार अनुदान देण्याची तरतूद आहे. तथापि, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा असल्याने जागेचे शासकीय/बाजारभाव हे जास्त आहेत. त्यापेक्षा जागा खरेदीसाठी मिळणारे अनुदान हे अल्प आहे.

२) जिल्ह्यातील वेंगुर्ला, मालवण व देवगड या तालुक्यातील बराच भाग CRZ खाली येत असलेने तेथे बांधकाम करता येत नाही.

३) जिल्ह्यातील बरीचशी जमीन ही सामाईक/तुकडे पध्दतीची असून सहहिस्सेदारांची परवानगी मिळत नसलेने जागा उपलब्ध होत नाही.

तसेच समितीस शासनाकडून उपरोक्त मुद्याची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्याची घरकुल योजना शासन निर्णय दिनांक १५/११/२००८ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक ९/६/२०१० च्या शासन निर्णयान्वये योजनेची अंमलबजावणी करण्यासंबंधात सविस्तर आदेश देण्यात आलेले आहेत.

सदर योजनेंतर्गत २६९ चौरस फुटाचे घरकुल बांधून देण्यात येते. सदर योजना रमाई आवास योजना म्हणून राबविण्यात येत असून सदर योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्यामार्फत राबविण्यात येते. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी एकूण ४३१ घरकुले मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी २५३ पूर्ण झाली असून १७६ प्रगतीपथावर आहेत. २ घरकुले रद्द करण्यात आली आहेत. या लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा उपलब्ध नाही अशा लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करता येत नाहीत. तथापि, शासनामार्फत जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात प्रस्ताव विचाराधीन आहे.

या संदर्भात ग्रामविकास विभागाने माहिती दिली की,

१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात बेघर लोकांची संख्या १ लाख इतकी नसून ती केवळ १९३२५ इतकी आहे.

२) सन २००२ च्या सर्व्हेनुसार दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे ७१३८६ इतकी आहेत.

३) इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे जागा घेण्यासाठी सध्या रु.२०,०००/- इतके अनुदान ५०:५० टक्के या प्रमाणात केंद्र व राज्य शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाते.

४) ज्यांच्याकडे जमीन नाही अशा लाभार्थ्यांना जमीन खरेदीसाठी रक्कम रु.५०,०००/- एवढी रक्कम देण्याकरिता पंडित दीनदयाल उपाध्याय योजना प्रस्तावित आहे.

५) जिल्ह्यातील वेंगुर्ला, मालवण व देवगड तालुक्यातील बराचसा भाग हा CRZ खाली येत असल्याने बांधकाम करता येत नाही.

६) जिल्ह्यातील बरीचशी जमीन ही सामाईक/तुकडे पध्दतीची असून सह हिस्सेदारांची परवानगी मिळत नसल्याने जागा उपलब्ध होत नाही.

७) सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा असल्याने जागेचे, शासकीय व खुल्या बाजारातील भाव हे जास्त आहेत. जागा खरेदीसाठी मिळणारे अनुदान हे अत्यंत अल्प आहे.

तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्याची रमाई घरकुल योजना शासन निर्णय दि. १५/११/२००८ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. तसेच दि.९/३/२०१० च्या शासन निर्णयान्वये योजनेची अंमलबजावणी करण्यासंबंधात सविस्तर आदेश देण्यात आलेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी एकूण ४३१ घरकुले मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी २५३ घरे पूर्ण झाली असून १७६ प्रगतीपथावर आहेत. २ घरकुले रद्द करण्यात आली आहेत. त्या लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा नाही अशा लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करता येत नाहीत. यास समाजकल्याण आयुक्तालयाने दिलेल्या अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली.

जिल्हा परिषद सिंधुदुर्ग अंतर्गत ग्रामपंचायत पालकरवाडी ता.वेंगुर्ला येथील भेटीच्या वेळी समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १६ जून, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी आपला दुसरा अहवाल सादर करुन पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या :-

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला भेट दिली असता भेटीच्या वेळी जिल्ह्यात १९३२५ लोक बेघर असल्याचे समितीस आढळून आले. शासनाच्या विविध विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजना जसे इंदिरा आवास व रमाई आवास योजना इ. अस्तित्वात असूनही बेघर कुटुंबांची संख्या लक्षणीय आढळून आली. जिल्ह्यामध्ये बरीचशी जमीन ही सामायिक/तुकडे पध्दतीची असून सह हिस्सेदारांची परवानगी मिळत नसल्यामुळे जागा उपलब्ध होत नाही आणि बहुतांश भाग सीआरझेड अंतर्गत असल्यामुळे बांधकाम करता येत नाही, ही अडचण समिती समक्ष मांडण्यात आली.

संपूर्ण राज्यात थोड्या अधिक फरकाने हीच परिस्थिती आढळून येते. इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे लाभार्थ्यांला ग्रामीण भागात जमीन विकत घेण्यासाठी रु.२०,०००/- अनुदानामध्ये जमीन उपलब्ध होत नाही. सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणात राज्याच्या अर्थमंत्र्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना जाहिर केलेली आहे. सदरहू योजनेची अंमलबजावणी लवकरच सुरु होणार असल्याबाबत विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले आहे.

राज्यातील बेघर लोकांना घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी अस्तित्वात असलेल्या योजनांमध्ये खालील बदल करावेत अशी शिफारस समिती शासनास करित आहे.

१) राज्यात शासकीय योजनांमधून घरकुल मंजूर करताना ज्या लाभार्थ्याकडे स्वत:ची जागा नाही त्यांना शासनाच्या खर्चाने जागा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्याबाबत व जागेअभावी कोणी व्यक्ती बेघर राहू नये यासाठी स्वयंस्पष्ट व सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करण्यासंदर्भात विभागाने तातडीने कार्यवाही करावी.

२) जे लाभार्थी शासनाच्या जमिनीवर अतिक्रमण करुन १० वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून वास्तव्य करीत आहेत. अशा लाभार्थ्यांना ग्रामपंचायतीकडून ८ (अ) चा उतारा त्याच्या नावाने उपलब्ध करुन देण्याबाबत सत्वर व तातडीने कार्यवाही करुन त्यांना त्याच जागेवरील घरकुलास मंजूरी व बांधकाम करण्यासंदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा.

३) तामिळनाडू राज्यामध्ये अंमलात असलेल्या घरकुल योजनेमध्ये २-३ मजल्यांची योजना आहे. त्याच धर्तीवर राज्यात २-३ मजल्यांच्या घरकुलाची योजना राबविता येऊ शकते किंवा कसे याचा शासनाने सर्वंकष अभ्यास करुन निर्णय घ्यावा.

४) ग्रामीण भागात घरकुलाच्या लाभार्थ्यांना १-२ गुंठे जमीन विकत घेऊन घर बांधण्यासाठी मुंबई जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ मधील तरतूदीनुसार खरेदी खत करता येत नाही. अत: सदरहू अधिनियमात शासनाने योग्य ती सुधारणा करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी.

५) बहुतांश वेळा संबंधित ग्रामपंचायतीच्या गावठाणाचा विस्तार झालेला नसतो त्यामुळे घरकुल मंजूर करत असताना अडचणी उद्‌भवतात. या प्रकरणी गावठाण हद्द वाढविण्याबाबत संबंधित विभागांनी शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठवावेत व शासनाने त्यास सत्वर मान्यता द्यावी.

६) सिंधुदुर्ग जिल्ह्यात घरकुल मंजूर असूनही केवळ जागेअभावी घरकुल बांधता येत नाही अशा बेघर व्यक्तींकरिता संबंधित व्यक्तींना घरकुलासाठी जागा उपलब्ध करुन त्या-त्या गावांतील उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीवर अथवा खाजगी व्यक्तींकडून विकत घेऊन प्रचलीत शासन निर्णयात बदल करुन सदर बेघर व्यक्तींचे घरकुल पूर्ण करण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

उक्त शिफारशींप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत अवगत करण्यात यावी, अशीही शिफारस समिती करीत आहे."

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

१) शासन निर्णय क्रमांक इंआयो-२०१५/प्र.क्र.२००/योजना-१० ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ३० डिसेंबर, २०१५ अन्वये इंदिरा आवास योजनेचा एक भाग म्हणून ज्या लाभार्थ्यांकडे स्वत:ची जागा नाही. अशा लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनांतर्गत घरकुल बांधणेसाठी जागा खरेदीसाठी ५०,०००/- आर्थिक सहाय्य अदा करता येईल अशी तरतुद करणेत आलेली आहे.

२) अ) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास २०१६/प्र.क्र.१७/पं.रा-४, बांधकाम भवन, मुंबई, दि.१८ जुलै, २०१६ चे शासन परिपत्रकान्वये ग्रामपंचायत हद्दीतील इमारत बांधकामावर कर आकारणीचे अधिकार ग्रामपंचायतीला देण्यात आलेले आहे. सदर आदेशामुळे केलेले बांधकाम अधिकृत, अनधिकृत ठरत नाही.

ब) या निर्णयामुळे इमारत बांधकामास मंजुरी देण्याचे अधिकार महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-२०१५/प्र.क्र.३९/पं.रा.-४, दि.११ डिसेंबर, २०१५ च्या पत्रान्वये महसुल विभागाकडे गेलेले आहेत. त्यामुळे नमुद केलेल्या जमिनीमध्ये घरकुलाच्या बांधकाम संदर्भात निर्णय घेण्याची बाब महसुल विभागाशी संबंधित आहे. सदर बाब जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही करणेची संबंधित नाही.

३) शासन निर्णय क्रमांक इंआयो-२०१५/प्र.क्र.२००/योजना-१० ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक ३० डिसेंबर, २०१५ मधील “ब” अन्वये मोठ्या ग्रामपंचायती व शहरालगतच्या ग्रामपंचायतीमधे जागेचे दर व उपलब्धता याचा विचार करता २ किंवा ३ लाभार्थ्यांच्या संमत्तीने २ किंवा ३ मजली इमारत बांधणेसाठी प्रती लाभार्थी ५०,०००/- रुपये पर्यंत अर्थ सहाय्य जागा खरेदीकरीता शासनाने मान्यता दिलेली आहे.

४) सदरचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने शासन स्तरावर कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

५) सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये गावठान क्षेत्र नसल्याने ग्राम पंचायत/महसुल गावासाठी गावठान क्षेत्र होणे अपेक्षित आहे. याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

६) सिंधुदुर्ग जिल्ह्यात घरकुल मंजूर असूनही केवळ जागे अभावी घरकुल बांधता येत नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये जमिनीची मालकी अनेक व्यक्तींची असते. एका ७/१२ मध्ये अनेक मालक असतात, परिणामी त्यातील एकाद्याने खरेदी वा बक्षिसपत्राने जमिन द्यावयाची झालेस तुकडे बंद असल्यामुळे अशा जमिनीचे खरेदी खत/बक्षिसपत्र होत नाही याचा विचार होवून शासन स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

१) ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसल्याने घरकुलाच्या लाभापासून वंचित आहेत अशा घरकुल पात्र कुटुंबांना प्रति ५०० चौ.फुट स्वत:ची जागा खरेदीसाठी रु.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय देण्यासाठी दि.३०.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये “पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजना” सुरु करण्यात आली आहे.

२) महसूल व वन विभागाशी संबंधित आहे. यासंदर्भात दिनांक १४.१२.२०१५ च्या पत्रान्वये अवगत केले आहे.

३) इंदिरा आवास योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या जून, २०१३ च्या मार्गदर्शक तत्वामधील परिच्छेद ३.२.१ मध्ये सर्वसाधारणपणे, या योजनेखाली केवळ वैयक्तिक इमारतींचे बांधकाम हाती घेता येऊ शकेल. खासकरुन, जेव्हा लाभार्थी पसंत करतील तेव्हा, बहुमजली (G+२) घर बांधण्यास परवानगी देता येऊ शकेल. जेथे जमिनीची किंमत खूपच जास्त आहे अशा दाट वस्तीच्या ठिकाणी, प्रत्येक मजला एका कुटुंबास देऊन बहुमजली इमारतीचे बांधकाम करण्यास परवानगी आहे.

त्याअनुषंगाने पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेच्या दि.३०.१२.२०१५ च्या शासन निर्णयामध्ये मोठ्या ग्रामपंचायती तसेच शहरा शेजारील ग्रामपंचायतीमध्ये जागेचे जास्त दर व जागेची कमी उपलब्धता विचारात घेता, ५०० चौ.फुटापर्यंत जागेत स्थानिक प्राधिकरणाच्या बांधकामाच्या नियमावलीनुसार दोन किंवा तीन लाभार्थ्यांच्या संमतीने दोन मजली (G+१) किंवा तीन मजली (G+२) इमारत बांधण्यासाठी प्रति लाभार्थी रु.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य जागा खरेदीसाठी तरतूद करण्यात आली आहे.

४) महसूल व वन विभागाशी संबंधित आहे. त्यासंदर्भाने दि.१४.१२.२०१५ च्या पत्रान्वये अवगत केले आहे.

५) महसूल व वन विभागाशी संबंधित विषय आहे.

६) शासकीय जमिनीची मालकी तसेच विल्हेवाट लावणे ही बाब महसूल व वन विभागाशी संबंधित आहे. ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसल्याने घरकुलाच्या लाभापासून वंचित आहेत अशा घरकुल पात्र कुटूंबांना स्वत:ची जागा उपलब्ध करुन देण्याकरीता पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजना राज्य शासनाने दि.३०.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत ग्रामपंचायत हद्दीबाहेरील अकृषक निवासी प्रयोजनासाठी सक्षम नियोजन प्राधिकरणाने मंजूरी दिलेल्या जागेचा समावेश करण्यात आला आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेच्या सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात दुसरा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पंचायत समिती, वेंगुर्ले येथे जागा उपलब्ध नसलेल्या बेघर लोकांना घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत या परिच्छेदाच्या अनुषंगाने अधिक माहिती द्यावी. यावर सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, दिनांक ३०.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये “पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना” सुरु करण्यात आली असुन ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुलास पात्र असलेल्या मात्र घरकुल बांधकामासाठी स्वतःची जागा नसल्याने घरकुलाच्या लाभापासून वंचित कुटुंबांना स्वतःची जागा खरेदी करण्यासाठी ५० हजार रुपयापर्यंतचे अर्थसहाय्य देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या योजनेस प्रतिसाद मिळण्यास सुरुवात झाली आहे. सुरुवातीच्या काळात बऱ्याच वेळेस जागा मिळविण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यानंतर सातत्याने पाठपुरावा करुन लाभार्थ्यांना शासनाच्या या योजनेचा लाभ घेण्याबाबत कळविण्यात आले. गावठाण हद्दीतील जागा सुलभरित्या मिळू शकतील, या संदर्भातील हा शासन निर्णय आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, घरकूल मंजूर झाल्यानंतर ५० हजार रुपये दिले जातात काय, यावर सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, जी.पी.एल. असते. त्यानुसार एखाद्या जिल्हा परिषदेमध्ये १० लाभार्थी असतील तर त्यांनी प्रथम जागा घ्यायची त्यानंतर त्यांना घरकुल मंजूर केले जाते. यावर समितीने अशी विचारणा केली की, एखाद्या व्यक्तीला जागा घ्यावयाची असली तरी त्याला जागा खरेदी करताच येत नाही. शासनाने आर्थिक सहाय्य केले तरी, जागाच नसेल तर मग काय करणार, याबाबत शासन काही करणार आहे काय, शासन घरकुल घेण्यासाठी १ लाख रुपये देणार, मात्र १ गुंठे जमीन घेण्यास परवानगी देणार नाही. त्यावेळेस तत्कालिन माननीय महसूल मंत्री यांनी सभागृहात असे जाहीर केले होते की, जे लोक २० वर्षापासून शासनाच्या कोणत्याही जागेवर राहत असतील त्यांना त्या ठिकाणी घरकूल बांधण्यास परवानगी दिली जाईल. ती जागा त्यांच्या नावे केली जाईल. त्यानंतर “ तुकडा बंदी तुकडा जोड ” कायद्यात दुरुस्ती करण्याबाबतचे बिल आणले, त्यामध्ये १ गुंठे जमीन खरेदी करता येईल अशी तरतूद प्रस्तावित करण्यात आली. यावर सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या संदर्भात महसूल विभागासमवेत पत्र व्यवहार करण्यात आला आहे. याबाबतच्या कायद्यात सुधारणा झाल्यानंतर ते विधेयक दोन्ही सभागृहांमध्येही संमत करण्यात आले त्यानंतर त्या विधेयकाबाबतची सद्यःस्थिती माहीत नाही. हा महसूल विभागाशी संबधित विषय असल्याने शासनाने याबाबत त्यांच्या समवेत ३ वेळा पत्र व्यवहार केला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, शासनाने त्यांच्याकडून याबाबतचे उत्तर घेऊन समितीला माहिती दिली पाहिजे, शासनाने महसूल विभागाशी समन्वयाने हा प्रश्न सोडविला पाहिजे होता. शासनाने याबाबत महसूल विभागाकडे पाठपुरावा केला आहे का, या समितीच्या प्रश्नावर सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, शासन सातत्याने त्यांच्या संपर्कात आहे. यावर समितीने याबाबतची शासनाची भूमिका विचारली असता सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी माहिती दिली की, समितीच्या म्हणण्यानुसार तशी त्यांची भूमिका नाही. यावर समितीने विचारणा केली की, महसूल विभागाच्या अधिका-यांचे याबाबत काय म्हणणे आहे यावर प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांनी समितीस माहिती दिली की, सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी त्यांचे मुद्दे सांगावेत तसेच ते कोणत्या अधिकाराने बोलत आहेत ते देखील सांगावे. यावर सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, घरकुलासाठी लागणा-या जागेकरिता शासकीय जमीन किंवा गावठाणातील जमीन उपलब्ध करुन देणे, त्यासाठी वापरलेली जागा नियमित करुन देणे व तुकडा बंदी तुकडा जोड कायद्यानुसार १ गुंठे जागा घेण्याबाबत रजिस्ट्रेशनमध्ये येणारी अडचण असे मुद्दे आहेत. या मुद्यांच्या अनुषंगाने सर्वप्रथम समितीला हे सांगावयाचे आहे की, संबंधित अधिका-यांनी माहिती नसताना जे वक्तव्य केलेले आहे ते वस्तुनिष्ठ नाही. शासनाने तुकडा बंदी, तुकडा जोड कायद्यात दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी सुधारणा केलेली आहे. त्यानुसार अंतिम प्रारुपानुसार रिजनल प्लानमध्ये रहिवासी भाग असेल तर अशा भागात तुकडा बंदी विषयक निर्बंध लागू राहणार नाहीत. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, यामध्ये ग्रामीण व शहरी भाग असा फरक केलेला आहे काय, यावर प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांनी समितीस विदित केले की, ग्रामीण भागात रिजनल प्लान असतो तर शहरी भागात महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात डेव्हलपमेंट प्लान असतो. रिजनल प्लानमध्ये रहिवासी भागात, वाणिज्यिक भागात किंवा औद्योगिक भागात जागा असेल तेथे तुकडा बंदी विषयक निर्बंध लागू राहणार नाहीत अशी सुधारणा केलेली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, शासनाचा मुद्दा समितीच्या लक्षात आला आहे. मात्र आपला नियम १० एकरापुरता मर्यादित आहे. एखाद्या

गावात निम्म्याहून अधिक क्षेत्र शेतीमध्ये असल्यास त्यालाही गावठाण गृहीत धरणे गरजेचे आहेत. यादृष्टीने काही सुधारणा करता येईल का ते पहावे. यावर प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांनी समितीस विदित केले की, नियम १२१ व १२२ अन्वये गावातील कोणता भाग गावठाण म्हणून जाहीर करावयाचा याबाबतचे तसेच हद्दीच्या विस्ताराबाबतचेही अधिकार जिल्हाधिका-यांना आहेत. रिजनल प्लानमध्ये रहिवाशी भाग अधिकही असू शकतो. त्यात शेत जमीनही येऊ शकते. आपण कशा पध्दतीने प्लान तयार करतो. त्यावर ते अवलंबून असते. रिजनल प्लानमध्ये रहिवासी भागात, वाणिज्यिक भागात किंवा औद्योगिक भागात जागा असेल तेथे तुकडा बंदी विषयक निर्बंध लागू राहणार नाहीत, अशी सुधारणा केलेली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, मात्र खालच्या स्तरावरील अधिकारी हे मान्य करीत नाहीत. त्यांचा असा समज आहे की, हा निर्णय शहरी भागापुरता लागू झालेला आहे. हा निर्णय ग्रामीण भागाला लागू नाही, त्यामुळे याबाबत नव्याने परिपत्रक निर्गमित केले पाहिजे असे समितीला वाटते. इंदिरा आवास योजनेंतर्गत किंवा अन्य योजनांतर्गत घरकुलासाठी ५० हजार रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य देण्यात येते. मात्र गावठाणातील जागेचे दर जास्त असतात. इंदिरा आवास योजनेंतर्गत वा अन्य योजनांतर्गत घरकुल बांधण्यासाठी ते दर परवडत नाहीत. रहिवासी विभागाच्या बाहेर जागा घ्यावयाची झाल्यास अनेक अडचणी असतात. यावर प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांनी समितीस विदित केले की, रिजनल प्लानमध्ये एखादा भाग ना विकास किंवा शेती क्षेत्र म्हणून दाखविला असेल तर तेथे रहिवासी क्षेत्र अनुज्ञेय करता येत नाही. रहिवासी क्षेत्रातच विकास केला पाहिजे. त्यामुळे समितीने सांगितलेल्या बाबींबाबत संबंधितांकडून विचार केला पाहिजे. घरकुलासाठी दर अपुरे पडत असतील तर त्या दरात रहिवासी क्षेत्रात जागा विकत घेणे शक्य नसल्यास हे दर वाढविण्याबाबत संबंधित विभागाने विचार केला पाहिजे. यावर सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, शासनाने याबाबत वारंवार पाठपुरावा केलेला आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना राज्य शासनाची आहे. तिला सहकार्य मिळत नाही. या योजनेस केंद्र शासनाकडून मागच्या वर्षी १० हजार रुपयांचे अर्थ सहाय्य मिळाले होते, ते या वर्षी मिळालेले नाही. यावर समितीने मत व्यक्त केले की, ५० हजार रुपयांमध्ये जागा मिळतच नाही. स्वतःच्या मालकीची जागा असेल तर फार्म हाऊस बांधता येईल. मात्र दुस-यांची जमीन विकत घ्यावयाची झाली तर तिचे कागदपत्र नावावर होत नाहीत. समजा एखाद्या २-३ एकर जागेचे कागदपत्र सर्वांच्या नावाने करावयाचे झाले तरी अशी अडचण येते की, अशी जमीन रहिवासी विभागात आणावयाची झाल्यास किमान २५ एकर इतके क्षेत्र असले पाहिजे. गावाच्या बाहेर घरकुल द्यावयाचे असेल तर महसूल विभागाचा नियम अडचणीचा आहे, त्यामुळे ही योजना थांबली आहे. यावर सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ५०० चौरस फूटाकरिता ५० हजार रुपये दिले जातात. ही रक्कम कमी नाही. यावर समितीने पृच्छा केली की, २-३ लाभार्थी एकत्र येऊन त्यांना घरकूल बांधता येते काय, सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले. यावर असे मत व्यक्त केले की, लोक जागा विकत घेण्यास तयार आहेत. मात्र त्यांना एक गुंठा देखील जागा विकत घेता येत नाही, ही मोठी अडचण आहे. रहिवासी भाग सोडून बाहेर जागा घ्यावयाचे म्हटले तरी त्यांना घेता येत नाही. या करिता महसूल विभागातील अधिकाऱ्यांशी आपण समन्वयाने मार्ग काढला पाहिजे हा प्रश्न सोडविण्यासाठी नियोजन केले पाहिजे. यावर सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, गायरान जमिनीच्या संदर्भात उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सार्वजनिक प्रयोजन गृहीत धरलेले आहे. त्याची व्याख्या विस्तृत केली तर शासनाला त्याचा उपयोग करता येईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, ५० वर्षापासून त्या जागेवर लोक राहत आहेत. ग्राम पंचायतीमध्ये भोगवटदार असल्याची नोंद आहे. यावर प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) यांनी समितीस विदित केले की, गावात अन्य जमीन उपलब्ध असल्यास गावठाण विस्ताराची योजना राबवली पाहिजे व तेथे या लोकांचे स्थलांतर केले पाहिजे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, गावातील गायरान जमीन गावठाणात आली तर यामधून मार्ग निघू शकेल. सिंधुदूर्ग जिल्ह्यात देखील महसूल व वन विभागाची काही ठिकाणी अडचणीची जागा आहे. गेल्या १०-१५ वर्षापासून तेथे लोक वास्तव्य करीत आहेत. त्यांनी घरकुल बांधले असुन ग्रामपंचायतीकडून कर देखील आकारला जातो. आवास योजनेतून त्यांना घरकुल मंजूर झाले आहे, मात्र पटटा त्यांच्या नावावर केलेला नाही. प्रमाणपत्र न दिल्यामुळे हे लोक वंचित आहेत. यावर सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, केंद्र शासनाची सूचना आहे की, लाभार्थ्यांना घर नसेल तर शासनाने प्राधान्याने जागा उपलब्ध करुन द्यावी. तसेच जागा उपलब्ध नसल्यास त्यांना संपादित करुन द्यावी. लाभार्थ्यांना जमीन नियमित करुन द्यावी किंवा जागा विकत घेण्याची परवानगी द्यावी. यावर प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, महसूल विभागाच्या जमिनीवर अतिक्रमण असल्यास शासनाचे स्पष्ट धोरण आहे. दिनांक १ जानेवारी, १९९५ पूर्वी अतिक्रमण झाले असेल तर त्यांना नियमानुकूल करता येते. ही तरतूद गायरान जमिनीव्यतिरिक्त अन्य जमिनीकरिता लागू होते. मात्र उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार गायरान जमिनीला ही तरतूद लागू नाही.

**क्रमांक : ३**

सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, २-३ मजल्याच्या घरकुलाची योजना राबविण्यास शासनाने संमती दिलेली आहे. एखाद्या ठिकाणी जमिनीची किंमत अधिक असेल तर तेथे ३ लाभार्थी एकत्र येऊन जमीन विकत घेऊ शकतात. प्रत्येकी ५० हजार या प्रमाणे दीड लाख रुपये शासनाकडून दिले जातात. त्या मधून लाभार्थी जमीन विकत घेऊ शकतात. शासनाने असे करण्यास परवानगी दिलेली आहे.

**क्रमांक : ४**

प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांनी समितीस माहिती दिली की, दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी या संदर्भात शासनाने सुधारणा केलेली आहे.

**क्रमांक : ५**

प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांनी समितीस माहिती दिली की, ज्या ठिकाणी मागणी असेल तेथे गावठाण विस्ताराचा कार्यक्रम राबवावा लागेल. या संदर्भात प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याबाबत शासन विचार करेल.

**क्रमांक : ६**

सह सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, शासकीय जमिनीचा विषय असल्यामुळे तो महसूल विभागाशी संबंधीत आहे. लोक शेत जमीन विकत घेण्यास तयार आहेत. तुकडे बंदीचा निर्णय झाल्यामुळे सर्वांना जमीन मिळू शकते. ज्यांना घर नाही त्यांना शेतात एक गुंठा जागेवर घर बांधण्याची परवानगी दिली तर हा विषय सुटू शकेल. मात्र शेत जमिनीच्या संदर्भात अद्याप निर्णय झालेला नाही. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने महसूल विभागाशी चर्चा करावी. रिजनल झोनमधील एक गुंठा जमीन खरेदी करण्याची तरतूद आहे काय, यावर प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांनी समितीस विदित केले की, रहिवासी वापराकरिता रिजनल प्लानमध्ये जमीन ठेवलेली असते. अशा शेत जमिनीकरिता तुकडे बंदीचे निर्बंध लागू होणार नाहीत. यलो झोन, आरपी झोनमध्ये बरीचशी शेत जमीन आहे. शासनाने अशी सुधारणा केली आहे की, आर.पी.झोनमध्ये रहिवासी भागात शेत जमीन दाखवलेली असेल तर अशा जमिनीला तुकडे बंदीचे निर्बंध लागू राहणार नाहीत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, यासाठी ती जमीन यलो झोनमध्ये आली पाहिजे. यावर सह सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या संदर्भात समिती तयार केलेली असुन शासन प्रयत्नशील आहे. या समितीने यलो झोन किंवा रहिवाशी भागामध्ये जमीन आयडेंटीफाय केली पाहिजे. लहान ले आऊट तयार केले पाहिजे. १५-२० घरांचे किंवा १० घरांचे ले आऊट तयार केले पाहिजेत. या लेआऊटला तेथील जिल्हाधिका-यांची मंजुरी घेतली पाहिजे. हे प्लॉटस प्रत्येक लाभार्थ्याला विकत द्यावेत, यामुळे हा प्रश्न सुटू शकेल.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथे भेट देवून सन २०१०-११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान सिंधुदुर्ग जिल्ह्यातील इंदिरा आवास योजना, रमाई घरकुल योजना इत्यादी घरकुल योजना जागेअभावी प्रभावीपणे अंमलात येत नसल्याची बाब अधोरेखित झाली. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या आधी माहे मार्च, २०१५ मध्ये राज्याच्या वित्त मंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना जाहीर केलेली होती. यासंदर्भात समितीने अत्यंत महत्वपूर्ण अशा शिफारशी शासनास केल्या. त्यात प्रामुख्याने जागेअभावी कोणी व्यक्ती घरकुलापासून वंचित राहू नये, शासनाच्या जमिनीवर १० वर्षापेक्षा अधिक काळापासून अतिक्रमण करुन वास्तव्य करीत असणाऱ्या लाभार्थ्यांना ८ अ चा उतारा देऊन त्याच जागेवरील घरकुलास मंजूरी द्यावी असा शासनाने निर्णय घ्यावा. तसेच इतर राज्यांमधील २-३ मजल्यांच्या घरकुलांचा अभ्यास करणे, घरकुलासाठी जागा खरेदी करत असताना त्यासाठी महाराष्ट्र धारण जमीनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ यामध्ये यथोचित सुधारणा करणे, घरकुल मंजूर करीत असताना घरकुलाच्या जागेपर्यंत गावठाणांचा विस्तार झालेला नसतो त्याप्रकरणी गावठाणाची हद्द वाढविण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशा महत्वपूर्ण शिफारशी समितीने केल्या.

समाजातील वंचित, मागास घटकातील बेघर व्यक्तींना, कुडाच्या झोपडीत राहणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या मालकीचे स्वत:चे घर बांधता यावे याकरीता शासनामार्फत इंदिरा आवास योजना, रमाई घरकुल योजना, शबरी आवास योजना व सद्य:स्थितीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अशा प्रकारच्या योजना राबविल्या जातात. कल्याणकारी राज्यात राज्य शासनाचे अन्न, वस्त्र व निवारा पुरविणे हे आद्य व प्राथमिक कर्तव्यच होय. घरकुल योजनेतील लाभार्थ्यांच्या प्रतिक्षा यादीतील लाभार्थी त्यांच्या प्राथम्यक्रमाने अनुदानास पात्र होत असतो, परंतु ज्या लाभार्थ्यांना घरकुल बांधण्याकरीता जागाच नाही अशा लाभार्थ्यांना जागा खरेदी करण्याकरीता

राज्य शासनाने दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजी शासन निर्णय क्रमांक इंआयो-२०१५/प्र.क्र.२००/योजना-१० **(परिशिष्ट ४.१)** अनुसार ५०,०००/- रुपयांच्या मर्यादेत अनुदान देण्याची योजना सुरु केली. कालांतराने इंदिरा आवास योजनेचे स्वरुप बदलून शासनाने प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) सुरु करण्याचा निर्णय घेतला व परिशिष्ट ४.१ वरील शासन निर्णय अधिक्रमित करुन दिनांक १४ जुलै, २०१७ रोजी प्रआयो-२०१७/प्र.क्र.६०/योजना-१० **(परिशिष्ट ४.२)** निर्गमित करुन प्रधानमंत्री आवास योजनेतील बदललेले निकष इत्यादींचा विचार करुन सर्वंकष शासन निर्णय निर्गमित केल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. सदर शासन निर्णयानुसार २ किंवा ३ मजल्यांची इमारत बांधून घरकुलाच्या लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते. परंतु, ३० डिसेंबर, २०१५ ते माहे जून, २०१७ या कालावधीत **सदरहू योजनेचा लाभ किती लाभार्थ्यांनी घेतला आहे. सदरहू योजनेकरीता उक्त कालावधीत किती निधी देण्यात आला व त्यापैकी किती खर्च झाला याचा शासनाने आढावा घेवून शासनाचा उद्देश सफल झाला किंवा कसे याचा वस्तुनिष्ठ अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ या अधिनियमातील तरतुदींमुळे घरकुलाकरीता ५०० चौ.फुटांची जागा विकत घेणे शक्य नव्हते. त्यामुळे सदरहू अधिनियमात सुधारणा करण्याबाबतची शिफारस शासनाने स्विकारुन तत्संबंधित विधेयक विधानमंडळाने संमत केल्यानंतर महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१५ दिनांक १ डिसेंबर, २०१५ पासून राज्यात अंमलात आलेला आहे **(परिशिष्ट ४.३)** संबंधित अधिनियमात अशा प्रकारची सुधारणा झाल्यामुळे ग्रामीण भागातील अंतिम प्रादेशिक योजनेमध्ये निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा इतर कोणत्याही अकृषिक वापरासाठी नेमून दिलेल्या कोणत्याही जमिनीस सदरहू अधिनियमाच्या कलम ७, ८ आणि ८ अअ मधील तरतुदींची बाधा असणार नाही. अशाप्रकारची सुधारणा केल्यामुळे घरकुलाच्या लाभार्थ्यांना अंतिम प्रादेशिक योजनेत अर्थात त्या गावाच्या गावठाण क्षेत्रात घरकुल खरेदी करता येणार आहे. याबाबत समिती अत्यंत समाधान व्यक्त करते. परंतु, त्याचबरोबर घरकुलाच्या लाभार्थ्यांला जर अंतिम प्रादेशिक योजनेच्या किंवा त्या गावाच्या गावठाण क्षेत्रात खरेदी करण्यासाठी जागाच उपलब्ध नसेल तर अशा गावठाणाबाहेरची जागा त्याला महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ या अधिनियमाच्या तरतुदींची बाधा असल्यामुळे खरेदी करता येत नाही ही अडचण सोडविण्याकरीता केवळ **घरकुलांकरीता उक्त अधिनियमात यथोचित सुधारणा करणे किंवा इतर योग्य ती कार्यवाही शासनाने करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.**

ग्रामीण भागातील अनेक बेघर लोक झोपड्या बांधून गायरान अथवा शासकीय जागेवर अतिक्रमण करुन अनेक वर्षापासून राहात आहेत. अशी व्यक्ती घरकुलाच्या प्रतिक्षा यादीवर असून केवळ तिच्या नावावर जागा मालकीची नसल्यामुळे व ८ अ चा उतारा नसल्यामुळे त्यांना घरकुल मंजूर होऊ शकत नाही. अशा व्यक्तींचे अतिक्रमण नियमानुकूल करुन घेण्याबाबत समितीची शिफारस असल्यामुळे ग्रामविकास विभागाने दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी महसूल विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. ग्रामविकास विभागाचा सदरहू प्रस्ताव महसूल विभागाकडे प्रलंबित असून त्यावर शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही त्यावर महसूल व वन विभागाने तातडीने निर्णय घ्यावा. तसेच महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास २०१६/प्र.क्र.१७/पं.रा-४, बांधकाम भवन, मुंबई, दि.१८ जुलै, २०१६ **(परिशिष्ट ४.४)** चे शासन परिपत्रकान्वये ग्रामपंचायत हद्दीतील इमारत बांधकामावर कर आकारणीचे अधिकार ग्रामपंचायतीला देण्यात आलेले आहे. सदर आदेशामुळे केलेले बांधकाम अधिकृत, अनधिकृत ठरत नाही. सदरहू निर्णयामुळे इमारत बांधकामास मंजुरी देण्याचे अधिकार महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-२०१५/प्र.क्र.३९/पं.रा.-४, दि.११ डिसेंबर, २०१५ **(परिशिष्ट ४.५)** च्या पत्रान्वये महसुल विभागाकडे गेलेले आहेत. त्यामुळे नमुद केलेल्या जमिनीमध्ये घरकुलाच्या बांधकामासंदर्भात निर्णय घेण्याची बाब महसुल विभागाशी संबंधित आहे अशी माहिती समितीस प्राप्त झाली. त्याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सार्वजनिक प्रयोजनाशिवाय इतर बाबींसाठी गायरान जमिनीचा वापर जसे घरकुलासाठी अतिक्रमण नियमित करणे इत्यादी कारणांसाठी करता येणार नाही अशी माहिती महसूल विभागाच्या सचिवांकडून समितीस प्राप्त झाली. **यासंदर्भात शासनाने सर्व कायदेशीर बाबी तपासून ग्रामीण भागातील वंचित व मागासलेल्या बेघर कुटुंबांना हक्काचा निवारा उपलब्ध करुन देण्याकरीता प्रतिकुटुंब ५०० चौ.फुट मर्यादित जागा नियमानुकूल करण्याबाबत साकल्याने विचार करुन सहानुभूतीपूर्वक निर्णय घ्यावा त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील बेघर व असहाय्य कुटुंबातील कोणतेही कुटुंब घरकुल योजनेपासून वंचित राहणार नाही यासाठी सत्वर पावले उचलून तत्संबंधात सर्वंकष कार्यवाही करुन प्रत्येक बेघर व असहाय्य कुटुंबातील व्यक्तींना घरकुलाचा लाभ देण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी तसेच ग्रामविकास विभागाने महसूल व वन विभागाकडे पाठविलेल्या प्रकरणावर तातडीने निर्णय घ्यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

### पाचवी ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित विषय शिकविण्यासाठी स्वतंत्र तज्ज्ञ शिक्षक उपलब्ध करून देण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी मौजे मठ-तालुका वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग या गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देवून पाहणी केली असता समितीच्या निदर्शनास आले की, या शाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी आहे. तसेच पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित विषय शिकविण्यासाठी स्वतंत्र तज्ज्ञ शिक्षक उपलब्ध नसून एकच शिक्षक सर्व विषयांच्या अध्यापनाचे काम करीत आहेत. परिणामी येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. याबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली व खालील मुद्यांची माहिती मागविली.

जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळा क्र.१ मठ, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग या शाळेला समितीने भेट दिली असता तेथे विद्यार्थ्यांची पट संख्या कमी असून तेथे पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित हा विषय एकच शिक्षक शिकविताना आढळून आला. स्वतंत्र तज्ज्ञ शिक्षक उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासनाची काय भूमिका आहे.

समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्याची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळा मठ नं.१, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग ही इ. १ ली ते ७ वी पर्यंतची शाळा आहे. इ. ६ वी ते ८ वी चे वर्ग असतील तर दि.१३ डिसेंबर, २०१३ चे शासन निर्णयानुसार ३ पदवीधर शिक्षक मंजूर होतात. जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळा मठ नं.१ येथे इ. ६ वी व ७ वी असे दोनच वर्ग आहेत. त्यामुळे शाळेला १ भाषा विषयासाठी व १ समाजशास्त्र विषयासाठी अशी २ पदवीधर शिक्षक पदे मंजूर आहेत. सदर दोन्ही पदे भरलेली आहेत. इ.८ वी चा वर्ग नसल्यामुळे विज्ञान व गणित विषयासाठीचे तिसरे पदवीधर शिक्षक पद मंजूर नाही. पंचायती राज समितीच्या भेटीच्या दिवशी १ पदवीधर शिक्षक हे हृदयविकाराची शस्त्रक्रिया झाल्याने रजेवर होते. व एकच शिक्षक अध्यापन करताना आढळला.

समितीस शासनाकडून उपरोक्त मुद्याची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधून ३० सप्टेंबर रोजीच्या पटावर शिक्षकांचे पदांची पद निश्चिती केली जाते. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील दिनांक १३ डिसेंबर, २०१३ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१३-१४ साठीची शिक्षक निश्चिती केलेली आहे. या शाळेत इ.१ ते ५ साठी २, इ.६ ते ७ साठी २ पदवीधर शिक्षक अशी एकूण ४ पदे मंजूर आहेत.

विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी आपला दुसरा अहवाल सादर करून पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या.

"सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला समितीने भेट दिली असता मौजे मठ, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथील जिल्हा परिषद प्रशालेमध्ये इ.५ वी ते इ.७ वी विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित हा विषय एकच शिक्षक शिकविताना आढळून आला. सदरहू बाबतीत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतल्यानंतर समितीच्या निदर्शनास आले की, संपूर्ण राज्यात तज्ज्ञ शिक्षकांची कमतरता आहे. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची गळती होत आहे. बरीचशी मुले खाजगी शाळांमध्ये जातात. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांचीही अत्यंत दुरवस्था आहे. तेथील पटसंख्या कमी असल्याने बऱ्याच शाळा बंद पडण्याच्यामार्गावर आहेत असे भेटीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले आहे.

उपरोक्त बाबी संदर्भात समिती खालीलप्रमाणे शिफारस करीत आहे :-

(१) प्राथमिक शाळांमधील शिक्षक भरतीचे अधिकार जिल्हा परिषदांना आहेत. त्यांचा वापर करून सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेने रिक्त पद भरतीची कार्यवाही एक महिन्याच्या आत करण्याबाबत विभागाने आदेशीत करावे.

(२) राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांतील विद्यार्थ्यांसाठी तीन राज्यस्तरीय चाचण्यांचे केलेल्या आयोजनानंतर त्याचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन करून घेण्यात यावे व अशा शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थापन केलेल्या सचिवांच्या कार्याचा आढावा घेण्यात यावा.

(३) खाजगी शाळांमधील शिक्षक निवडणुकीसाठी वेळ काढून प्रचार करतात, निवडणुकीत भाग घेतात इ. त्यामुळे त्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर तसेच शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होऊन त्यांचा शैक्षणिक विकास खुंटतो. अशा राजकारणात भाग घेणाऱ्या शिक्षकांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक प्रचलीत शासन धोरणात बदल करून त्याअनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करावा.

(४) याबाबतीत संपूर्ण राज्यात विज्ञान व गणित शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या किती आहे व शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे किती शिक्षकांची आवश्यकता आहे याचा आढावा घेण्यात यावा व या रिक्त पदांची भरती कालबध्द कार्यक्रम हाती घेवून किती कालावधीत पूर्ण केली जाणार आहे, याबाबतची माहिती शालेय शिक्षण विभागाने समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी.

उपरोक्त नमूद केलेल्या शिफारशींच्या अनुषंगांने विभागाने तातडीने कार्यवाही करून समितीला केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात पाठविण्यात यावा."

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

(१)शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र.पीआरई २००६/(४७६७)/प्राशि-१, दिनांक १६ डिसेंबर, २००६ अन्वये सन २००९-१० या वर्षापासून प्राथमिक शिक्षक सेवक भरती प्रक्रिया केंद्रीय भरती पूर्व निवड परीक्षेद्वारे करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. मा.शिक्षण संचालक (प्राथ.), म.रा.पुणे व मा.आयुक्त, परीक्षा परिषद, पुणे यांचे स्तरावर उमेदवार निवडीची प्रक्रीया केली जाते. निवड यादीप्रमाणे जिल्हास्तरावर संबंधित उमेदवारांचे कागदपत्रांची तपासणी करून मुलाखती घेवून नियुक्ती दिली जाते.

(२)सदरची कार्यवाही शासन स्तरावरून होणे आवश्यक असलेने या कार्यालयाकडील पत्र क्र. सिंजिप/शिक्षण/प्राथ/प्रशा १/१९७७/१५, दिनांक २४-०८-२०१५ ने मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, म.रा., पुणे यांना कळविणेत आलेले आहे.

(३)सदरची कार्यवाही शासन स्तरावरून होणे आवश्यक असलेने या कार्यालयाकडील पत्र क्र. सिंजिप/शिक्षण/प्राथ/योजना ५/२२८१/१५, दिनांक ०१-०९-२०१५ ने मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, म.रा., पुणे यांना कळविणेत आलेले आहे.

(४)सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या शाळातून विज्ञान व गणित विषय शिकवू शकणाऱ्या विज्ञान शाखेच्या पदवीधर शिक्षकांची संख्या ३२ आहे. आठवीचे वर्ग जोडलेल्या शाळांची संख्या ५६ आहे. विज्ञान व गणित शिकवू शकणाऱ्या या ३२ शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणीत नियुक्ती देता येईल.

जिल्हा परिषद शाळामधून सद्यस्थितीत उपशिक्षकांची ८३ पदे रिक्त आहेत. शासन स्तरावरून केंद्रीय भरती प्रक्रियेद्वारे भरावयाच्या शिक्षण सेवकातून विज्ञान विषयाच्या पदवीधर शिक्षकांची नियुक्ती करून विज्ञान व गणित शिकविणाऱ्या शिक्षकांचा अनुशेष भरून काढता येईल.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-**

(१)डी.एड.ए.सीईटी-२०१० मधील उमेदवारांच्या पुनर्पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या २७ जणांना सिंधुदुर्ग जिल्ह्यात आस्थापना देण्यात आलेली आहे.

(२)शासन निर्णय दि.२२-०६-२०१५ अन्वये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. सदर शासन निर्णयानुसार वर्षभरात पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन-१ व संकलित मूल्यमापन-२ अशा तीन चाचण्यांचे आयोजन करणे तसेच त्रयस्थ संस्थांच्या सहभागाने मूल्यमापन करणे व शासन निर्णय दि.१०-०७-२०१५ अन्वये राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षण प्रथम भाषा व गणित याविषयांचे मराठी, इंग्रजी व उर्दू माध्यमांच्या अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार शाळांना याबाबत येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(३) महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ४२ च्या तरतुदीनुसार शिक्षकास व्यवस्थापन वर्गाच्या पूर्वपरवानगीने स्थानिक, जिल्हा किंवा राष्ट्रीय तसेच महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुका स्वत: भाग घेणार असल्यास लढविता येतात. तथापि, सदर शिक्षक स्वत: निवडणूक लढविण्याऐवजी अन्य निवडणुकीत सहभागी होत असल्यास त्यास प्रतिबंध करण्यासंदर्भात आवश्यक ती दुरुस्ती उक्त नियमावलीमध्ये करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) सन २०१३-१४ च्या संच मान्यतेनुसार उच्च प्राथमिक शाळांतील पदवीधर शिक्षकांची १४०७८ पदे रिक्त आहेत. त्यापैकी एक तृतीयांश पदे ही गणित व विज्ञान शिकवण्यासाठी आवश्यक आहेत. राज्यातील ७ ठिकाणी डायटमध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाशी करार करुन B.Sc. (गणित/विज्ञान) हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. गतवर्षी ५६० व यावर्षी ५६० असे ११२० शिक्षक दोन वर्षीय गणित/विज्ञान अभ्यासक्रम पूर्ण करीत आहेत. आगामी वर्षात ३३ डायटमध्ये हा अभ्यासक्रम सुरू होत आहे, त्यामुळे दरवर्षी २६४० शिक्षक हा अभ्यासक्रम पूर्ण करतील व गणित/विज्ञान विषयाची गरज भागविणे शक्य होईल.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात दुसरा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

**क्रमांक : १**

सदरहू साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यात सध्या प्राथमिक शिक्षकांची १५ पदे रिक्त आहेत. राज्यातील रिक्त शिक्षकांच्या संख्येच्या तुलनेत सिंधुदुर्ग जिल्हयात रिक्त असलेली १५ पदे जास्त नाहीत. शिक्षकांच्या भरती प्रक्रियेत गुणवत्ता आणण्यासाठी विभागाकडून संगणकावर आधारित पोर्टल तयार करण्यात येत आहे. त्या अंतर्गत शिक्षकांची भरती प्रक्रिया ऑनलाईन होणार आहे. मंत्रिमंडळासमोर हा प्रस्ताव आहे. या प्रस्तावाला मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर सर्वत्र वेळेत पदे भरण्याची प्रक्रिया पार पाडली जाईल.

**क्रमांक : २**

राज्यातील सर्व मान्यता प्राप्त शाळांतील विद्यार्थ्यांसाठी तीन राज्यस्तरीय चाचण्यांचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन करून घेण्यात यावे व अशा शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थापन केलेल्या सचिवांच्या कार्याचा आढावा घेण्यात यावा, अशी समितीने शिफारस केली होती, याबाबत पुढे काय कार्यवाही केली आहे, यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, सिंधुदुर्ग जिल्ह्याची शैक्षणिक कामगिरी चांगली आहे. या जिल्ह्यात एकूण ८ तालुके आहेत, यापैकी ७ तालुके हे शैक्षणिकदृष्ट्या प्रगत आहेत. उर्वरित ८ वा तालुका सुध्दा शैक्षणिकदृष्ट्या प्रगत झाल्याचे जाहीर होणार आहे. त्या त्या वेळी शैक्षणिक मूल्यमापन होत रहावे म्हणून “सरल” नावाची संगणक प्रणाली तयार केली आहे. या प्रणाली अंतर्गत प्रत्येक शाळेतील, प्रत्येक विद्यार्थ्याचा वर्षातून तीन वेळा चाचण्यांच्या माध्यमातून शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यात येणार आहे आणि त्याचे राज्य पातळीवर विश्लेषण करण्यात येणार आहे. समितीच्या निदर्शनास आणून देण्यात येते की, शैक्षणिकदृष्ट्या प्रगत असलेल्या एकूण २० तालुक्यांपैकी ७ तालुके हे एकट्या सिंधुदुर्ग जिल्हयातील आहेत. यावरून निदर्शनास येईल की, सिंधुदुर्ग जिल्ह्याने अपेक्षित शैक्षणिक गुणवत्ता जवळजवळ पूर्ण केली आहे.

**क्रमांक : ३**

खाजगी शाळांतील शिक्षक निवडणुकीसाठी वेळ काढून प्रचार करतात. निवडणुकीत भाग घेतात. त्यामुळे शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर तसेच शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होऊन त्यांचा शैक्षणिक विकास खुंटतो. अशाप्रकारे राजकारणात भाग घेणा-या शिक्षकांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक प्रचलित शासन धोरणात बदल करून शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत समितीने शिफारस केली होती. सदरहू शिफारशीच्या संदर्भात विभागाने काय कार्यवाही केली आहे, यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, स्थानिक स्वराज्य संस्थातील शिक्षकांना निवडणुकांचा प्रचार करण्यास अशा

निवडणुकीत भाग घेण्यास परवानगी नाही. परंतु, खाजगी शिक्षण संस्थातील अनुदानित शिक्षकांना असे बंधन नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, राजकारणात भाग घेणा-या खाजगी शाळांमधील शिक्षकांना प्रतिबंध घालण्यासाठी आवश्यक प्रचलित शासन धोरणात बदल करून सुधारित शासन निर्णय किती दिवसांत निर्गमित करण्यात येईल, यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, या शिफारशीच्या अनुषंगाने विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येईल. परंतु यापूर्वी ज्या शिक्षकांच्या बाबतीत जे निर्णय दिलेले आहेत ते मागे घेणे सोपे नाही. पुढे समितीने असे मत व्यक्त केले की, खाजगी शाळेतील शिक्षक असले तरी त्यांना शासनाकडून पगार दिला जातो. इतर कर्मचा-यांना जी बंधने आहेत तीच खाजगी शाळांतील शिक्षकांना सुध्दा लागू पाहिजेत. खाजगी शाळांतील शिक्षकांनी एका बाजूला नोकरी करायची आणि दुस-या बाजूला राजकारण करायचे, प्रचाराला जायचे, निवडणुकीत भाग घ्यायचा हा एक प्रकारे शासनाच्या पैशाचा दुरुपयोग आहे. यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, समिती जे सांगत आहे ते योग्य आहे. एक म्हणजे ही बाब ऑफीस ऑफ प्रॉफीट या कक्षेत येता कामा नये, हे लक्षात घेतले पाहिजे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, खाजगी शाळेत काम करणा-या शिक्षकांना पगार, पेन्शन वा इतर सर्व सवलती लागू आहेत. ते शासनाचे फायदे घेऊन राजकारण करतात. समितीच्या मते शिक्षकांनी सेवेत असताना असे करणे योग्य नाही. यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, या सर्व मुद्यांचा समावेश करून विभागाच्या वतीने एक प्रस्ताव तयार करण्यात येईल. असा प्रस्ताव तयार करण्यासाठी विभागाला एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागणार नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, खाजगी शाळांतील अनेक शिक्षक एका बाजुला निवडणुकांमध्ये उमेदवारी मिळवून निवडून येतात आणि पदाधिकारी म्हणून काम करतात तसेच दुसऱ्या बाजुला नोकरी सुध्दा करतात, वास्तविक पाहता शिक्षक हे शिक्षक मतदारसंघातून निवडणूक लढवू शकतात. त्यामुळे खाजगी शाळांतील शिक्षक सेवेत असताना त्यांना नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद या निवडणूका लढविण्यास प्रतिबंध केला पाहिजे, शिक्षक मतदारसंघ हा केवळ शिक्षकांसाठी राखीव आहे. शिक्षकांच्या संघटनामध्ये या शिक्षकांनी पदाधिकारी म्हणून काम केले तर ठीक आहे. परंतु त्यांनी राजकारण करता कामा नये किंवा निवडणुकीत भाग घेता कामा नये. खाजगी शाळांतील शिक्षक हे जिल्हा परिषद, नगरपरिषद, महापालिका, विधानसभा इत्यादी निवडणुकांनमध्ये सहभाग होऊ शकतात, हे थोडेसे खटकणार आहे. शिक्षकांना स्वत:चे प्रश्न मांडण्यासाठी विधानपरिषद सभागृहात जागा राखीव आहे. परंतु सध्या खाजगी संस्थातील शिक्षकांकडून मात्र गैरवापर सुरू आहे. यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ३ लाख आणि खाजगी अनुदानित शाळांमध्ये २ लाख ८५ हजार शिक्षक आहेत. ३ लाख शिक्षकांना कोणतेही अधिकार नाहीत, परंतु अनुदानित शाळांतील २ लाख ८५ हजार शिक्षकांना निवडणुकांमध्ये सहभाग घेण्याचा अधिकार आहे. यावर आळा घालण्यासाठी एक महिन्याच्या आत प्रस्ताव तयार करण्यात येईल. यावर समितीने मत व्यक्त केले की, या संदर्भातील त्रुटी दूर करून योग्य तो प्रस्ताव विभागाच्या वतीने तयार करण्यात यावा. जे शासनाकडून पगार वा मानधन घेत असतील, मग ते शिक्षक असोत किंवा अन्य कर्मचारी असोत, त्यांनी निवडणूक प्रचार वा निवडणुकीत भाग घेता कामा नये. जर त्यांना निवडणूक प्रचार करायचा असेल किंवा निवडणूक लढवायची असेल तर त्यांनी अगोदर नोकरीचा राजीनामा दिला पाहिजे. समितीचे असे स्पष्ट मत आहे की, शासकीय कर्मचा-यांनी सेवेत असताना निवडणूक लढविता कामा नये किंवा प्रचार करता कामा नये. पुणे महापालिकेतील शिक्षक एका बाजूला शासनाचा पगार घेत असताना दुस-या बाजुला निवडणूक प्रचार प्रक्रियेत भाग घेतात. अशा शिक्षकांवर काही तरी कारवाई केली पाहिजे. त्यांनी निवडणूक प्रचारात किंवा निवडणूक प्रक्रियेत भाग घेता कामा नये यावर कुठे तरी बंधन आणले पाहिजे. एखादी व्यक्ती खाजगी संस्थेत शिक्षक आहे आणि ती व्यक्ती जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत निवडून आल्यानंतर, विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी मतदान अधिकारी म्हणून काम पाहते. एका पक्षाच्या वतीने निवडून आलेला शिक्षक जर मतदान अधिकारी म्हणून काम पाहत असेल तर यामध्ये प्रामाणिकता कशी असू शकेल, समितीने हा प्रकार निदर्शनास आणून दिल्यानंतर सुध्दा निवडून आलेल्या एका शिक्षकाची मतदान अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, त्याला कायद्याचे बंधन नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, शेती महामंडळाचे कर्मचारी कोणत्याही निवडणुकीत सहभाग घेऊ शकतात. हे कर्मचारी निवडणूक कामाला कसे जातात, शेती महामंडळाच्या कर्मचा-यांना शासनाकडून पगार मिळतो आणि ते म्हणतात आम्ही शासकीय कर्मचारी नाही, ही फार मोठी गफलत आहे. यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस माहिती दिली की, शिक्षकांच्या बाबतीत काही प्रश्न असतील तर त्याचे उत्तर देण्यात येईल. परंतु आपण इतर विभागाच्या कर्मचा-यांबाबत सांगत असाल तर सामान्य प्रशासन विभागाचे सचिव या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकतील.

**क्रमांक : ४**

या शिफारशीसंदर्भात समितीने विचारणा केली की, राज्यात विज्ञान व गणित शिकविणा-या शिक्षकांची संख्या किती आहे व शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे किती शिक्षकांची आवश्यकता आहे याचा आढावा घेण्यात यावा व रिक्त पदांची भरती कालबध्द कार्यक्रम हाती घेऊन किती कालावधीत पूर्ण केली जाणार आहे, यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, शिक्षणामध्ये जो बदल होत आहे त्याचा हा एक भाग आहे. राज्यात शिक्षण हक्क कायदा येण्यापूर्वी पदवीधर शिक्षक असे एक पद होते. शाळांमध्ये अशी चार पदे मंजूर असायची. त्यातील एक पद पदवीधर शिक्षक असायचे. हे पदवीधर शिक्षक मराठी किंवा इतिहास विषय घेऊन पदवीधर झालेले असले तरी त्यांनी गणित आणि इंग्रजी विषय शिकवावेत अशी अपेक्षा होती. ही अपेक्षा बरोबर नव्हती. शिक्षण हक्क कायद्यानुसार उच्च प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक पदवीधर असावेत अशी अट होती. या तीन पदवीधर शिक्षकांपैकी एक शिक्षक गणित आणि विज्ञान विषय घेऊन पदवीधर झालेले असावेत अशी अट होती. सध्या तसे पदवीधर शिक्षक शाळेमध्ये नाहीत. म्हणजे आपल्याकडे योग्य विषयाचे शिक्षक नाहीत. सध्या जे शिक्षक उपलब्ध आहेत त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. जेव्हा मोठे संरचनात्मक बदल होत असतात तेव्हा अस्तित्वात असलेल्या कर्मचा-यांना नोकरीवरून न काढता त्यांना प्रशिक्षण देऊन काम करता येईल. त्याप्रमाणे जे शिक्षक बारावीला गणित आणि विज्ञान विषय घेऊन उत्तीर्ण झालेले आहेत, परंतु पदवीधर नाहीत, त्यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानाच्या माध्यमातून प्रशिक्षण देऊन गणित आणि विज्ञान विषय शिकविणा-या शिक्षकांची गरज भागविण्याचा प्रयत्न करीत आहोत. अशाप्रकारे येत्या दोन-तीन वर्षात पूर्ण पदे भरली जातील आणि ते ते विषय शिकविणारे शिक्षक उपलब्ध होतील अशी व्यवस्था करीत आहोत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, आपण लेखी निवेदनात नमूद केले आहे की, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानकडून २६४० शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे, परंतु आपली मागणी १४ हजार ७८ शिक्षकांची आहे. यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस माहिती दिली की, १४ हजार ७८ रिक्त पदांपैकी एक-तृतीयांश विज्ञान आणि गणित शिक्षकांची आवश्यकता आहे, म्हणजे ही संख्या पाच हजार होते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, आपण आता २६४० शिक्षकांना प्रशिक्षण देणार आहात. उर्वरित पदांचे काय यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, आम्ही दोन बॅचमध्ये प्रशिक्षण देणार आहोत, यावर समितीने विचारणा केली की, आपण बॅच चालूच ठेवणार आहात काय या समितीच्या प्रश्नावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, आपणास अजून एक बॅच चालू ठेवावी लागेल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, हा दोन वर्षाचा कोर्स आहे. दोन बॅच म्हणजे चार वर्षे होतील. एका बाजूला शिक्षण हक्क कायद्यानुसार स्कील ट्रेण्ड स्टाफ पाहिजे म्हणून आपण त्यांना परवानगी दिली. दुसऱ्या बाजूला पावसाळ्यात छत्र्या उगवतात त्याप्रमाणे बीएड आणि डीएड कॉलेज उघडली जात आहेत. परंतु त्या प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध नाहीत मग बेरोजगारी आली, आंदोलने आली, आपण जो ॲक्शन प्लान तयार करीत आहात त्याप्रमाणे पात्रता निकष कोण पूर्ण करते, यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, बारावी (सायन्स) उत्तीर्ण असणा-यांना प्रशिक्षणासाठी रिक्रूट करण्यात येते. यावर समितीने विचारणा केली की, या संदर्भातील धोरण शासनाने केव्हा तयार केले, १४ हजार शिक्षकांतील एक तृतीयांश शिक्षक हे गणित आणि विज्ञान शिकविणारे पाहिजेत हे केव्हा लक्षात आले तसेच महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, सन २०१० ते २०१७ पर्यंत या ७ वर्षाच्या कालावधीत किती विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केले आहे, या समितीच्या प्रश्नावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, खरे म्हणजे ही गरज अगोदरच लक्षात यावयास पाहिजे होती, परंतु शिक्षण हक्क कायदा आल्यापासून ही गरज प्रकर्षाने जाणवली. जवळपास २० लाख विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केले. यावर पुढे समितीने विचारणा केली की, आपण हा अनुशेष कसा भरून काढणार आहात, या सात वर्षात प्रशासनाला कोणी सूचना दिल्या नाहीत काय, ही चूक कोणामुळे झाली, यास कोण जबाबदार आहे आणि त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात. यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी समितीस विदित केले की, आपले राज्य पुरोगामी आहे. शिक्षण हक्क कायदा हा भारत सरकारचा आहे. कायदा झाला तरी तो कर्मचारी पातळीवर पोहोचण्यास वेळ लागतो. यामध्ये एखादा अधिकारी असा भाग नाही. विचार पातळीवर पोहोचण्यास वेळ लागतो.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथे भेट देवून सन २०१०-११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळा क्रमांक १ मठ, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथे स्वतंत्र तज्ञ शिक्षक नेमला नसल्याची बाब उघडकीस आली. समितीने जिल्ह्यातील शाळांमध्ये किती स्वतंत्र तज्ञ शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत याबाबत माहिती घेतली असता सद्यस्थितीत उपशिक्षकांची ८३ पदे रिक्त असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. त्याअनुषंगाने समितीने शिक्षकांची रिक्त पदे भरणे, राज्यातील शाळांतील विद्यार्थ्यांसाठीच्या

तीन राज्यस्तरीय चाचण्यांचे त्रयस्थ संस्थांमार्फत मुल्यमापन करणे, जिल्हा परिषद शिक्षकांप्रमाणे अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षकांना राजकारणात भाग घेण्यापासून प्रतिबंध करणे व स्वतंत्र तज्ञ शिक्षक पदांचा आढावा घेऊन ती भरणे आदि शिफारशी शासनास केल्या होत्या. उक्त शिफारशींच्या अनुषंगाने अनुपालनाद्वारे समितीस प्राप्त झालेल्या माहितीनुसार शासनाने डी.एड. ए.सी.ई.टी. २०१० मधील पात्र २७ उमेदवार सिंधुदुर्ग जिल्ह्यात नेमले असल्याची माहिती समितीस देण्यात आली आहे. **परंतु समितीस प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार उपशिक्षकांची ८३ रिक्त पदे पाहता जिल्ह्यातील शिक्षकांच्या रिक्त पदांचा आढावा घेऊन आवश्यक तेवढे शिक्षक सिंधुदुर्ग जिल्ह्यात नियुक्त करण्यात यावेत अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने राज्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व्हावी याकरीता वार्षिक तीन राज्यस्तरीय चाचण्यांचे त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करुन घेण्यात यावे अशी शिफारस केली होती. समितीच्या शिफारशीनुसार शासनाने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची सन २०१५-१६ पासून अंमलबजावणी करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक शैगुवी २०१५/(८०/१५) एस.डी.६, दिनांकित २२ जून, २०१५ **(परिशिष्ट ५.१)** निर्गमित केला असल्याची तसेच राज्यातील एकूणच शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता ही बाब राज्य शासनाला चिंतेची वाटल्यावरुन शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णय क्रमांक राप्रधो-२२१५/प्र.क्र.६९/२०१५/प्रशिक्षण, दिनांकित १० जुलै, २०१५ **(परिशिष्ट ५.२)** निर्गमित करुन राज्यस्तरिय अध्ययन संपादणुक सर्वेक्षण (SLAS) प्राथमिक व माध्यमिक स्तरावर करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केला असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ हा दिनांक १ एप्रिल, २०१० पासून देशभरात लागू झाल्याच्या पार्श्वभुमीवर शासनाने सदरहु निर्णय निर्गमित केला आहे. **त्याअनुषंगाने राज्यामध्ये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात आलेला प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासनाने प्रभावीपणे अंमलात आणावा व राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता व दर्जा वाढविण्यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यातील शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता ही राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांतील सुमारे तीन लाख व खाजगी अनुदानित शाळांतील दोन लाख पंच्याऐंशी हजार शिक्षकांच्या अध्यापनावर अवलंबून आहे ही बाब कोणीही नाकारु शकत नाही. या पार्श्वभुमीवर राज्यातील खाजगी शाळांतील शिक्षकांना महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ४२ च्या तरतुदीनुसार शिक्षकास व्यवस्थापन वर्गाच्या पुर्वपरवानगीने स्थानिक, जिल्हा किंवा राष्ट्रीय तसेच महाराष्ट्र विधानपरिषदेच्या निवडणूकांत स्वत: भाग घेणार असल्यास लढविता येतात. तथापि, सदर शिक्षक स्वत: निवडणूक लढविण्याऐवजी अन्य निवडणूकीत सहभागी होतो. त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होते. याउलट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील शिक्षकांना निवडणूका लढविता येत नाहीत किंवा निवडणूकीत सहभागी होता येत नाही. त्यामुळे शिक्षकांच्या एका संवर्गाला एक व दुसऱ्या संवर्गाला दुसरा नियम लावणे चुकीचे आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. खाजगी अनुदानित शाळांतील शिक्षकांना राज्याच्या एकत्रित निधीतून वेतन, भत्ते, निवृत्ती वेतन या सर्व सोयी-सुविधा देत असताना इतर शासकीय कर्मचाऱ्यांना वेगळा व शिक्षकांना वेगळा नियम लावणे देखील तेवढेच चुकीचे आहे. त्याचबरोबर भारताच्या संविधानाने शिक्षक या राज्यातील मोठ्या व संघटित संवर्गाला विधानपरिषदेमध्ये देखील प्रतिनिधीत्व दिलेले आहे जे इतर कोणत्याही संवर्गाला देण्यात आलेले नाही. यासंदर्भात शिक्षकांचा निवडणूकीतील सहभाग हा इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे जी बाब महाराष्ट्र नागरीसेवा नियमाद्वारे अवलंबिली जाते त्या प्रमाणे शिक्षक देखील हा शासकीय कर्मचारी असल्याने त्यास महाराष्ट्र नागरीसेवा नियमातील तरतुदीत नमुद केल्याप्रमाणे शिक्षकांचा देखील निवडणुकीत भाग घेणे, प्रसार/प्रचार करणे इत्यादी बाबी समानतेच्या न्यायाने अवलंबिणे आवश्यक आहे. **त्यानुसार विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केल्याप्रमाणे निवडणुकीत भाग घेणे, प्रचार करणे, किंवा निवडणूक लढवण्यापूर्वी शिक्षकाने अगोदर नोकरीचा राजीनामा देणे अनिवार्य करुन खाजगी अनुदानित शाळांतील शिक्षकांना इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे निवडणूकांमध्ये सहभाग घेण्यापासून मज्जाव करण्याचा विभागाकडे आधीपासून विचाराधीन असलेला प्रस्ताव तातडीने मान्य करावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला विनाविलंब पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

संपूर्ण राज्यात विज्ञान व गणित शिकविणाऱ्या तज्ञ शिक्षकांची १४,०७८ रिक्त पदे हा आणखी एक अतिशय गंभीर विषय आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंमलात येण्यापूर्वी शाळांमध्ये पदवीधर शिक्षक असे एक पद होते. हे पदवीधर शिक्षकच ते जरी मराठी किंवा इतिहास विषय घेऊन पदवीधर झालेले असले तरी ते गणित आणि इंग्रजी विषय शिकवत असत. शिक्षण हक्क कायद्यानुसार उच्च प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक पदवीधर असणे आवश्यक आहे त्याचबरोबर तीन पदवीधर शिक्षकांपैकी एक गणित आणि विज्ञान विषय घेऊन पदवीधर झालेले असले पाहिजेत अशी अट आहे. सद्यस्थितीमध्ये राज्यात शिक्षण हक्क कायद्यानुसार गणित आणि विज्ञान विषय घेऊन पदवीधर झालेले शिक्षक नाहीत ही संख्या सुमारे ५००० एवढी असल्याची माहिती समितीस साक्षीदरम्यान प्राप्त झाली. शालेय शिक्षण सचिवांनी नमूद केल्याप्रमाणे शिक्षण हक्क कायद्यासारखे

मोठे संरचनात्मक बदल होत असताना अस्तित्वात असलेल्या शिक्षकांना नोकरीवरुन न काढता त्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक असते या मताशी समिती सहमत आहे. परंतु यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून गणित आणि विज्ञान विषय शिकविणाऱ्या शिक्षकांना जे प्रशिक्षण शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात येत आहे त्या प्रशिक्षणाचा दर्जा देखील तपासणे समितीला आवश्यक वाटते. **सदरहु दोन वर्षाचे प्रशिक्षण योग्य पध्दतीने केले जात आहे किंवा कसे याची देखील तपासणी करणे समितीला आवश्यक वाटते व अशी तपासणी शालेय शिक्षण विभागाने करुन संबंधित शिक्षकांना प्रशिक्षित करुन गणित व विज्ञान या विषयाचे प्रशिक्षणाद्वारे आकलन होऊन त्यांची विद्यार्थ्यांना शिकविण्याची योग्यता आहे किंवा नाही याची खात्री करुनच त्यांची नियुक्ती करण्यासंदर्भात कार्यवाही करावी व या संदर्भात संपूर्णपणे आढावा घेऊन पात्र व प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध करुन देण्यासंदर्भात एक सर्वंकष आराखडा करुन तो अंमलात आणावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

### पंचायत समिती, कुडाळ मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी २० टक्के रकमेपेक्षा कमी खर्च केल्याबाबत

समितीने सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी कुडाळ पंचायत समितीस भेट दिली. भेटीच्या वेळी मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी २० टक्के पेक्षा कमी खर्च झालेला असल्याने शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक वर्षी २०% रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्याचे बंधन आहे. समाजकल्याणासाठी रक्कम रुपये ५,५०,०००/- एवढी रक्कम खर्च करणे गरजेचे असताना आपण फक्त रक्कम रुपये २,४५,१६६/ एवढीच रक्कम खर्च केली आहे. २० टक्के रक्कम खर्च करणे बंधनकारक आहे असे समितीने मत प्रतिपादन केले.

समितीने साक्षीच्या वेळी गट विकास अधिकारी यांच्याकडून खालील मुद्यांची माहिती मागविली.

शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक वर्षी २०% रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्याचे बंधन आहे. समाजकल्याणासाठी रक्कम रुपये ५,५०,०००/- एवढी रक्कम खर्च करणे गरजेचे असताना आपण फक्त रक्कम रुपये २,४५,१६६/ एवढीच रक्कम खर्च केली आहे. उर्वरित रक्कम खर्च न करण्याचे कारणे काय, शासन निर्णयाची अंमलबजावणी का करण्यात आली नाही.

समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

पंचायत समिती सेस अनुदानातून मागासवर्गीय उन्नतीसाठी सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकामध्ये एकूण ५,५०,०००/- इतकी तरतूद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात पंचायत समितीला प्राप्त झालेल्या रक्कमेमधून मागील अनुशेषासह खर्च करावयाची रक्कम रुपये ५,००,०६९/- इतकी होती. त्यामधून १० कामे मंजूर केलेली होती. त्यापैकी २ कामे पूर्ण करुन त्यावर एकूण रक्कम रु.२,४५,१६६/- इतका खर्च सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात करण्यात आलेला आहे. उर्वरित कामे मुदतीत पूर्ण न झाल्याने सदर आर्थिक वर्षात खर्च होवू शकलेला नाही.

मार्च २०११ अखेर रक्कम रुपये २,५४,९०३/- अनुशेष शिल्लक होता व सन २०११-२०१२ मध्ये करावयाचा २०% खर्च रक्कम रुपये ३,५४,९४२/- अशी एकूण एकंदर ६,०९,८४५/- इतका खर्च करावयाचा होता. त्यापैकी पुढील ३ कामांवर रक्कम रुपये १,२८,९९८/- इतका खर्च करण्यात आला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

१) आवळेगाव-चव्हाणवाडी पायवाट कॉंक्रीटीकरण करणे रक्कम रु.४०,०००/-

२) आवळेगाव-चव्हाणवाडी रस्त्यालगत संरक्षण भिंत बांधणे रक्कम रु.४०,०००/-

३) कसाल-हरिजनवाडी रस्त्यालगत संरक्षण भिंत बांधणे रक्कम रु.४८,९९८/-

तसेच मागासवर्गीयांच्या घरदुरुस्तीसाठी प्रत्येकी १०,०००/- प्रमाणे २५ लाभार्थ्यांना रक्कम रु.२,५०,०००/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. अशाप्रकारे एकूण रक्कम रु.३,७८,९९८/- खर्च करण्यात आलेला असून रु.२,३०,८४७/- अनुशेष शिल्लक आहे. सन २०११-१२ मधील अनुशेष रक्कम रु.२,३०,८४७/- व सन २०१२-२०१३ मध्ये करावयाचा खर्च रु.४,४५,०००/- अशी एकूण रक्कम रु.६,७५,८४७/- इतकी रक्कम अनुशेषासह खर्च करावयाची होती. त्यापैकी खालील नमूद कामे हाती घेण्यात आलेली होती. कालेली चव्हाणवाडी विहिर दुरुस्ती करणे रक्कम रु.४६,५०६/- इतका खर्च करण्यात आला आहे. तसेच मागासवर्गीय २६१ लाभार्थ्यांना सौर कंदील पुरवठा करण्यात आला असून त्यावर रक्कम रु.६,२८,४८८/- एवढा खर्च करण्यात आला आहे. अशाप्रकारे एकूण एकंदर रक्कम रु.६,७४,९९४/- एवढा मागासवर्गीय उन्नतीसाठी खर्च करण्यात आलेला आहे. म्हणजचे सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षात मागील अनुशेषासह खर्च १००% करण्यात आलेला आहे.

समितीस शासनाकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

पंचायत समिती कुडाळ यांस सेस अनुदानातून मागासवर्गीय उन्नतीसाठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकाप्रमाणे एकूण रक्कम रु.५,५०,०००/- इतकी तरतूद करणेत आली होती. परंतु प्रत्यक्षात पंचायत समितीला प्राप्त झालेल्या रक्कमेमधून मागील अनुशेषासह खर्च करावयाची रक्कम रु.५,००,०६९/- इतकी होती. त्यामधून १० कामे पंचायत समितीने मंजूर केली.

त्यापैकी ०२ कामे पूर्ण करुन त्यावर एकूण रक्कम रु.२,४५,१६६/- इतका खर्च सन २०१०-११ या आर्थिक वर्षात करणेत आलेला आहे. उर्वरित कामे मुदतीत पूर्ण न झाल्याने सदर आर्थिक वर्षात खर्च होवू शकलेला नाही. तथापि, शिल्लक अनुशेषासह सोबत जोडलेल्या परिशिष्ठाप्रमाणे शासन निर्णयानुसार पंचायत समितीने तरतूद करुन सन २०१४-१५ अखेर १००% खर्च केलेला आहे.

**मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी पंचायत समिती कुडाळ उत्पन्नाच्या २०% खर्चाबाबतची माहिती**

**(सन २०१०-११ ते २०१४-१५)**

| अ. क्र. | वर्ष | मागील अनुशेष | पं.स.चे प्रत्यक्ष उत्पन्न | २०% प्रमाणे येणारी रक्कम | मागील अनुशेषासह खर्च करावयाची रक्कम | प्रत्यक्ष खर्च केलेली रक्कम | शिल्लक अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१०-११ | १५४९२९ | १७२५७०० | ३४५१४० | ५०००६९ | २४५१६६ | २५४९०३ |
| २ | २०११-१२ | २५४९०३ | १७७४७१४ | ३५४९४२ | ६०९८४५ | ३७८९९८ | २३०८४७ |
| ३ | २०१२-१३ | २३०८४७ | २२२०३६६ | ४४५००० | ६७५८४७ | ६७५००८ | ९९२ |
| ४ | २०१३-१४ | ९९२ | ४४२०००० | ८८४००० | ८८४९९२ | ८८०००० | १०००० |
| ५ | २०१४-१५ | १०००० | १६०२७६० | ३२०५५२ | ३३०५५२ | ९६९२४६ | निरंक |

समितीने साक्षीच्या वेळी हा प्रश्न प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये अनुभवास येतो. समाजकल्याण विभागाचे पैसे सर्वच जिल्ह्यांमध्ये अखर्चित राहण्याचे कारण काय आहे, मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवरील खर्च हा त्याच आर्थिक वर्षात झाला पाहिजे. या समितीच्या म्हणण्यावर, मागासवर्गीयांच्या कल्याण्यासाठी राखून ठेवलेला निधी किती वर्षात खर्च करावयाचा याचा शासन अभ्यास करीत आहे. सर्वसाधारणपणे निधी मिळाल्यानंतर तो पुढील आर्थिक वर्षामध्ये खर्च करणे शक्य होते. कारण सगळी प्रक्रिया ही डिसेंबर नंतरच सुरू होते. हा सर्व निधी पंचायत समितीच्या अंतर्गतच असतो. त्यास पदाधिकाऱ्यांची मान्यता आवश्यक असते असा त्यावर विभागीय सचिवांनी समितीसमोर खुलासा केला.

विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी आपला दुसरा अहवाल सादर करुन पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या.

"राज्यातील सर्व जिल्हा परिषदांनी शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक वर्षी २० टक्के रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि, सदर निधी खर्च होण्यास ४ वर्षाचा कालावधी लागणे ही गंभीर बाब आहे. कारण ज्या आर्थिक वर्षासाठी निधी मंजूर झालेला असता तो त्याच आर्थिक वर्षात खर्च होणे आवश्यक असते व तो न झाल्यास त्या मागासवर्गीय लाभार्थ्यांवर अन्याय केल्यासारखे होईल. याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे असे समितीचे मत झाले आहे.

या संदर्भात समितीच्या निदर्शनास आले की, कमी अधिक प्रमाणात संपूर्ण राज्यातील जिल्हा परिषदा त्या त्या आर्थिक वर्षात मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी निधी खर्च करीत नाहीत. ज्या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याच आर्थिक वर्षात तो खर्च करणे आवश्यक आहे व तो अखर्चित राहिल्यास त्याबाबतची कारणमिमांसा संयुक्तीक असणे गरजेचे आहे अशाप्रकारचे कडक स्वरुपाचे परिपत्रक ग्रामविकास विभागाने एक महिन्याच्या आत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना निर्गमित करावे अशी समिती शिफारस करीत आहे."

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०१४/११३/३, दि.१७/०७/२०१५ च्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातील राखून ठेवलेला २०% निधी त्याच वर्षी किंवा लगतच्या पुढील आर्थिक वर्षाअखेरच खर्च करण्यात येत आहे. यासंबंधाने जिल्हा परिषद स्तरावरुन जा.क्र.सिंजिप/सकवि/लेखा-२/पीआरसीप/१८८३/१६, दि.३१/१२/२०१६ अन्वये सर्व पंचायत समित्यांना कळविण्यात आलेले आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-**

वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.१००२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.६ जून, २००८ अन्वये एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी पूर्णपणे खर्च करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेवून, अखर्चित राहिलेला निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षाअखेर खर्च करण्याची अनुमती दिल्याच्या अनुषंगाने या विभागामार्फत शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१४/११३/३, दि.१७/०७/२०१५ अन्वये जिल्हा परिषदेने त्यांच्या स्वउत्पन्नातील राखून ठेवलेल्या २०% निधी त्याच वर्षी किंवा लगतच्या पुढील आर्थिक वर्षाअखेरच खर्च करण्यासंबंधीच्या सुचना सर्व जिल्हा परिषदांना दिल्या आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेच्या सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात दुसरा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. ज्या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध करुन दिलेला आहे त्याच आर्थिक वर्षात तो खर्च करणे आवश्यक आहे. तो निधी अखर्चित राहिल्यास त्याबाबतची कारणमिमांसा संयुक्तिक असणे गरजेचे आहे, अशा प्रकारचे कडक स्वरुपाचे परिपत्रक ग्रामविकास विभागाने एका महिन्याच्या आत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना निर्गमित करावे अशी समितीने शिफारस केली होती या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, अनेक वेळा जिल्हा परिषदेच्या सेस फंडातील निधी अखर्चित राहतो. जिल्हा परिषदेच्या उत्पन्नातून राखून ठेवण्यात आलेली रक्कम अखर्चित राहिली तर ती रक्कम पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्याचे नियोजन केले जाते काय, यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातून राखून ठेवलेला २० टक्के निधी त्याच वर्षी किंवा लगतच्या पुढील आर्थिक वर्षा अखेरच खर्च करण्यासंबंधी दिनांक १७.०७.२०१५ रोजी परिपत्रक काढून जिल्हा परिषदांना तशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, अखर्चित राहिलेला निधी पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यात येतो काय, यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी होकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समजा, यावर्षी १८ टक्के निधी खर्च झाला तर उर्वरित २ टक्के निधी पुढील आर्थिक वर्षात खर्च केला जातो असे शासनाचे म्हणणे आहे. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथे भेट देवून सन २०१०-११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान जिल्हा परिषदेच्या सेस अनुदानातून मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांकरीता राखून ठेवलेला २० टक्के निधी ज्या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध करुन दिलेला असतो तो त्याच वर्षी खर्च करणे आवश्यक असताना देखील सन २०१०-११ या वर्षाचा सदर निधी खर्च होण्यास ४ वर्षाचा कालावधी लागल्यामुळे तो अखर्चित राहिल्याची कारणमिमांसा संयुक्तीक असणे गरजेचे आहे अशाप्रकारचे कडक स्वरुपाचे परिपत्रक ग्रामविकास विभागाने एक महिन्याच्या आत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना निर्गमित करावे अशी समितीने शिफारस केली होती.

यासंदर्भात जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला व अखर्चित राहिलेला निधी खर्च करण्यासाठी दिनांक ३० जून पूर्वी अनुमती घेण्याची अट शिथिल करण्याबाबत वित्त विभागाने शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०.०२/ प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांकित ६ जून, २००८ **(परिशिष्ट ६.१)** निर्गमित केला आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातून राखून ठेवलेला २० टक्के निधी त्याच वर्षी किंवा लगतच्या पुढील आर्थिक वर्षा अखेरच खर्च करण्यासंबंधी ग्रामविकास विभागाने दिनांक १७.०७.२०१५ रोजी परिपत्रक **(परिशिष्ट ६.२)** काढून तशा सूचना देण्यात आल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. **सदरहु परिपत्रकान्वये जिल्हा परिषदांनी मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांकरीता आर्थिक वर्षाच्या आधी मुक्त केलेला व पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहिलेला निधी त्याच वर्षात खर्च करावा व विहित मुदतीत खर्च न झाल्यास त्याचे योग्य नियोजन व योग्य वेळी समायोजन न केल्यास सर्व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे परिपत्रक पुन:श्च निर्गमित करावे व यासंबंधीचा शासन स्तरावर वेळोवेळी आढावा घ्यावा. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट " अ "

## शासनाचे आदेश व परिपत्रक

**(परिशिष्ट २.१)**

निराधार, परित्यक्ता व विधवांच्या मुलींच्या विवाहाकरीता अनुदानाबाबत.

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१२/प्र.क्र.२२०/का-२

नवीन प्रशासकीय इमारत, ३रा मजला,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: १५ फेब्रुवारी, २०१४

वाचा —

१) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.८१/२००१/मविधो-२०००/प्र.क्र.४२९/का-२, दि.२५.५.२००१.

२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.९३/का-२, दि.३०.९.२०११.

प्रस्तावना —

शासन निर्णय दिनांक २५.५.२००१ मधील योजना क्र.3 निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अनुदान या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान रु.२०००/- वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत सर्वकष विचार करुन शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय—

शासन निर्णय, दिनांक २५.५.२००१ मधील योजना क्र.3 निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अनुदान ही योजना रद्द करुन, शासन निर्णय दिनांक ३०.९.२०११ अन्वये कार्यान्वित शुभमंगल सामुदायिक विवाह योजनेची व्याप्ती वाढवून, ती केवळ शेतकरी / शेतमजूर यांच्यासाठी न ठेवता, अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागासप्रवर्ग वगळता अन्य प्रवर्गातील रुपये एक लक्षपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या निराधार / परित्यक्ता आणि विधवा महिलांच्या केवळ दोन मुलींच्या विवाहाकरीता शासन निर्णय दिनांक ३०.९.२०११ मधील

इतर अटी / शर्तीनुसार मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेची अंमलबजावणी दिनांक १.१.२०१४ पासून करण्यात येईल.

२. वरील योजना पूर्णत: जिल्हा नियोजन समितीमार्फत राबविण्यात यावी व त्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेत दरवर्षी तरतूद करुन जिल्हा नियोजन समितीस निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. या योजनेसाठी निधी जिल्हा नियोजन समितीस उपलब्ध करुन दिलेलया निधीतूनच भागविण्यात यावा. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये शुभमंगल सामुदायिक विवाह / नोंदणीकृत विवाह योजना या योजनेसाठी जिल्हास्तरीय कार्यान्वयन यंत्रणेच्या मागणीनुसार पुनर्विनियोजनाने जादा निधी देण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्या सचिव, जिल्हा नियोजन समिती यांना नियोजन विभागामार्फत कळविण्यात येईल.

३. सदर आदेश नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.इटीएस/१४८१, दिनांक ३०.९.२०१३ आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९४/१३/व्यय-६, दिनांक २०.२.२०१३ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने आणि मंत्रीमंडळाने दिनांक २९.१.२०१४ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२१५१५४७१७०४३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahendra Babusing Hajari

Digitally signed by Mahendra Babusing Hajari
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Women & Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Mahendra Babusing Hajari
Date: 2014.03.01 16:32:53 +05'30'

(म.बा. हजारी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई.

५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद, विधान भवन, मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई.
१०. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
११. सर्व विभागीय आयुक्त,
१२. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, वांद्रे, मुंबई.
१५. सचिव, बालहक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
१६. व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, वांद्रे, मुंबई.
१७. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह)
१९. महासंचालक, कै.वसंतराव नाईक कृषी स्वावलंबन मिशन, अमरावती.
२०. सर्व आयुक्त, महानगरपालिका / नगरपालिका,
२१. महालेखापाल (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), ½, मुंबई / नागपूर.
२२. ग्रथांलय, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२३. सर्व जिल्हाधिकारी,
२४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२५. सर्व विभागीय आयुक्त, महिला व बाल विकास,
२६. सर्व जिल्हा विवाह नोंदणी निबंधक,
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / ठाणे.
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
३०. निवड नस्ती, का-२

**(परिशिष्ट २.२)**

"शुभमंगल सामूहिक / नोंदणीकृत विवाह योजना" सुधारीत स्वरुपात जिल्हा नियोजन विकास समिती मार्फत राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.९३/का.२
नवीन प्रशासकीय भवन, ३रा मजला,
मादम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३० सप्टेंबर, २०११.

**वाचा** :- शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.संकीर्ण-२००८/प्र.क्र.५५/का.२,दि. ७ मे, २००८.

प्रस्तावना :- महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयातील शेतकऱ्यांच्या / शेतमजुरांच्या मुलींच्या सामुहिक विवाहासाठी "शुभमंगल सामूहिक विवाह योजना" शासनामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शेतकरी /शेतमजूर कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी आवश्यक असलेल्या मंगळसूत्र व इतर वस्तूंची खरेदी करण्यासाठी प्रती जोडपे रु.१०,०००/- एवढे अनुदान देण्यात येते व सामुहिक विवाह आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस प्रती जोडप्यामागे रु.२,०००/- एवढे प्रोत्साहनात्मक अनुदान विवाहाचे आयोजन, विवाह समारंभाचा तद्नुषंगिक खर्च तसेच विवाह नोंदणी शुल्क या होणारा खर्च भागविण्यासाठी देण्यात येते. सदर योजनेबाबत नियोजन व वित्त विभागाने दिलेल्या निर्देशानुसार जिल्हयाच्या स्तरावर योजना राबविण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना, इ. च्या अनुषंगाने घेतलेल्या आढाव्याच्यावेळी योजनेच्या गुणवत्तेबाबत काही सुधारणा करुन सुधारीत "शुभमंगल सामूहिक / नोंदणीकृत विवाह योजना" संपूर्णपणे "जिल्हा नियोजन विकास समिती" (DPDC) मार्फत राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयातील शेतकऱ्यांच्या / शेतमजुरांच्या मुलींच्या सामुहिक किंवा नोंदणीकृत विवाहासाठी "शुभमंगल सामूहिक विवाह योजना" राबविण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ७ मे, २००८ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आदेशातील अटी व शर्तीमध्ये या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. :-

(१) राज्यात सदर सुधारित **"शुभमंगल सामूहिक / नोंदणीकृत विवाह योजना"** संपूर्णपणे "जिल्हा नियोजन विकास समिती" (DPDC) मार्फत राबविण्यात यावी. सदर योजनेच्या अनुदानास पात्र ठरण्यासाठी **वार्षिक कमाल उत्पन्न मर्यादा रुपये एक लाख इतकी राहील,** अशा कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी प्रती जोडपे रु.१०,०००/- एवढे अनुदान वधुच्या आईच्या नावाने, आई हयात नसल्यास वडीलांच्या नावाने व आई-वडील दोन्हीही हयात नसल्यास वधूच्या नावाने देण्यात येईल. तसेच सामुहिक विवाह आयोजित

करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस प्रती जोडप्यामागे रु.२,०००/- एवढे प्रोत्साहनात्मक अनुदान विवाहाचे आयोजन, विवाह समारंभाचा तद्नुषंगिक खर्च तसेच विवाह नोंदणी शुल्क यावर होणारा खर्च भागविण्यासाठी खालील अटी-शर्तीवर देण्यात यावा.:-

(i) या योजनेअंतर्गत सामुहिक विवाहाचे आयोजन करणाऱ्या स्वयंसेवी संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक राहील. संस्था नोंदणी अधिनियम १८६० (The Societies Registration Act, १८६०) किंवा सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० (The Bombay Public Trust Act, १९५०) अंतर्गत नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था किंवा महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम, १९६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था यांच्यामार्फतच राबविण्यात यावी.

(ii) जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाला कमी वेळात कागदपत्रांची छाननी करणे, जोडप्यांची पात्रता निश्चित करणे इत्यादि शक्य व्हावे, याकरीता एका स्वयंसेवी संस्थेस एका सोहळयात <u>किमान ५ व कमाल १०० जोडप्यांचा</u> समावेश करण्याची परवानगी राहील. १०० जोडप्यांच्या वर समावेश असलेल्या विवाह सोहळयासाठी अनुदान अनुज्ञेय राहणार नाही; कारण १०० पेक्षा मोठे समारंभ आयोजित करणाऱ्या संस्थांची स्वत:ची आर्थिक क्षमता चांगली असणे अपेक्षित आहे.

(iii) एका स्वयंसेवी संस्थेने वर्षात **<u>दोनदाच</u>** सामूहिक विवाह समारंभ आयोजित करता येतील, त्यापेक्षा जास्त विवाह सोहळे आयोजित केल्यास त्यासाठी कोणतेही शासकीय अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

(iv) स्वंयसेवी संस्थेने / लाभार्थ्यांनी खालील बाबींचे **<u>एकत्रित प्रमाणपत्र</u>** किंवा दाखला संबंधित सक्षम प्राधिकारी असलेले तहसिलदार, तलाठी किंवा ग्रामसेवक यांच्याकडून घेऊन अर्जासोबत सादर करावा.

१. कोणत्या गावाचा रहिवाशी आहे, त्या पत्त्याबाबत ग्रामसेवक / तलाठीचा दाखला.

२.किमान वय (१८ किंवा २१ वर्षे) असणेबाबत जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा तलाठी / ग्रामसेवकाचा दाखला.

३.सक्षम प्राधिकारी - तलाठी / तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला.

(v) स्वयंसेवी संस्थेने वरीलप्रमाणे सर्व बाबींचा **<u>एकत्रित दाखला</u>** / सर्व कागदपत्रे विवाह सोहळयाच्या <u>किमान १ महिना अगोदर</u> जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास अर्जासह सादर करणे आवश्यक राहील.

(vi) या योजनेअंतर्गत वधूचे कुटुंबाचे **<u>वार्षिक उत्पन्न रुपये एक लाखपेक्षा जास्त असल्यास</u>** <u>अनुदानासाठी पात्र राहणार नाही.</u> स्वयंसेवी संस्थेने वधुची आई, आई हयात नसल्यास वडील व आई-वडील दोन्हीही हयात नसल्यास वधूच्या नावाने असलेल्या त्यांचा बँक खाते क्रमांक, बँक शाखा याबाबतचा तपशिल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत वधुच्या आईच्या नावाने, आई हयात नसल्यास वडीलांच्या नावाने व आई-वडील दोन्हीही हयात नसल्यास वधूच्या नावाने सबंधीत बँकेच्या शाखेमध्ये त्यांच्या खात्यात सरळ रुपये १०,०००/-ची रक्कम जमा करावी व पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात बँकींग Electronic Transfer Facility ने किंवा इतर मार्गाने त्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात यावी. थोडक्यात रु.१०,०००/- अनुदानाची रक्कम स्वयंसेवी संस्थेमार्फत न देता, सरळ बँक खात्यात जमा करावी.

(vii) विवाह सोहळ्यात भाग घेतलेल्या जोडप्यांचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करणे, आणि विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे संबंधित स्वयंसेवी संस्थेस बंधनकारक राहील. तसेच, व्हिडीओ रेकॉर्डिंग व विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर केल्यानंतर स्वयंसेवी संस्थेस प्रती जोडप्यामागे रु. २०००/- एवढे प्रोत्साहनात्मक अनुदान अदा करण्यात यावे.

(viii) या योजनेंतर्गत अनुदान मिळण्यासाठीं अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील दांपत्ये पात्र राहणार नाही. कारण, त्यांच्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच आदिवासी विकास विभागामार्फत स्वतंत्र योजना राबविण्यात येत आहेत.

**इतर अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच राहतील, त्या खालीलप्रमाणे :-**

(i) वधू ही महाराष्ट्रातील संबंधित जिल्हयाची स्थानिक अधिवासी (Domiciled) असावी.

(ii) विवाह सोहळयाचे दिनांकास वराचे वय २१ वर्षे व वधूचे वय १८ वर्षे यापेक्षा कमी असू नये. वयाबाबत जन्म नोंदणी प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परिक्षा प्रमाणपत्र किंवा जन्माचा स्थानिक प्राधिका-याने दिलेला दाखला किंवा वैद्यकीय अधिका-यांचे वयाबाबतचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

(iii) वधू-वरांना त्यांच्या प्रथम विवाहासाठीच हे अनुदान अनुज्ञेय असेल. सदरचे अनुदान पुर्नविवाहाकरीता अनुज्ञेय राहणार नाही. तथापि वधू, विधवा किंवा घटस्फोटीत असल्यास तिच्या पुर्नविवाहासाठी अनुदान अनुज्ञेय राहील.

(२) **याशिवाय, या सुधारीत "शुभमंगल सामुहिक / नोंदणीकृत विवाह योजने"** अंतर्गत जे जोडपे सामुहिक विवाह सोहळयात सहभागी न होता, सरळ विवाह नोंदणी कार्यालयात (Office of the Registrar of Marriage) जावून नोंदणीकृत विवाह (Registered Marriage) करतील, त्यांना ही रुपये १०,०००/-(अक्षरी रुपये दहा हजार) इतके अनुदान देण्यात यावे. या योजनेचा मुख्य हेतू आहे की, गरीब शेतकरी, शेतमजूर यांच्यावर विवाहाच्या सोहळयांचा आर्थिक बोजा पडू नये, त्यासाठी त्यांनी कर्ज घेऊ नये, या दृष्टीने **"नोदणीकृत विवाह"**(Registered Marriage) सर्वोत्तम उपाय आहे. यासाठी जोडप्यांना कोणत्याही स्वयंसेवी संस्थेवर अवलंबून राहण्याची गरज राहत नाही, व सामुहिक विवाह सोहळयाच्या

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत वधुच्या आईच्या नावाने, आई हयात नसल्यास वडीलांच्या नावाने व आई-वडील दोन्हीही हयात नसल्यास वधूच्या नावाने सबंधीत बँकेच्या शाखेमध्ये त्यांच्या खात्यात सरळ रुपये १०,०००/-ची रक्कम जमा करावी व पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात बँकीग Electronic Transfer Facility ने किंवा इतर मार्गाने त्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात यावी. थोडक्यात रु.१०,०००/- अनुदानाची रक्कम स्वयंसेवी संस्थेमार्फत न देता, सरळ बँक खात्यात जमा करावी.

(vii) विवाह सोहळ्यात भाग घेतलेल्या जोडप्यांचे <u>व्हिडीओ रेकॉर्डिंग करणे</u>, आणि **<u>विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे</u>** संबंधित स्वयंसेवी संस्थेस बंधनकारक राहील. तसेच, व्हिडीओ रेकॉर्डिंग व विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर केल्यानंतर स्वयंसेवी संस्थेस प्रती जोडप्यामागे रु. २०००/- एवढे प्रोत्साहनात्मक अनुदान अदा करण्यात यावे.

(viii) या योजनेंतर्गत अनुदान मिळण्यासाठीं अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील दांपत्ये पात्र राहणार नाही. कारण, त्यांच्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच आदिवासी विकास विभागामार्फत स्वतंत्र योजना राबविण्यात येत आहेत.

**इतर अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच राहतील, त्या खालीलप्रमाणे :-**

(i) वधू ही महाराष्ट्रातील संबंधित जिल्हयाची स्थानिक अधिवासी (Domiciled) असावी.

(ii) विवाह सोहळयाचे दिनांकास वराचे वय २१ वर्षे व वधूचे वय १८ वर्षे यापेक्षा कमी असू नये. वयाबाबत जन्म नोंदणी प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परिक्षा प्रमाणपत्र किंवा जन्माचा स्थानिक प्राधिका-याने दिलेला दाखला किंवा वैद्यकीय अधिका-यांचे वयाबाबतचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

(iii) वधू-वरांना त्यांच्या प्रथम विवाहासाठीचे हे अनुदान अनुज्ञेय असेल. सदरचे अनुदान पुर्नविवाहाकरीता अनुज्ञेय राहणार नाही. तथापि वधु, विधवा किंवा घटस्फोटीत असल्यास तिच्या पुर्नविवाहासाठी अनुदान अनुज्ञेय राहील.

(२) **याशिवाय, या सुधारीत "शुभमंगल सामुहिक / नोंदणीकृत विवाह योजने"** अंतर्गत <u>जे जोडपे सामुहिक विवाह सोहळयात सहभागी न होता, सरळ विवाह नोंदणी कार्यालयात (Office of the Registrar of Marriage) जावून नोंदणीकृत विवाह (Registered Marriage) करतील, त्यांना ही रुपये १०,०००/-(अक्षरी रुपये दहा हजार) इतके अनुदान देण्यात यावे.</u> या योजनेचा मुख्य हेतू आहे की, गरीब शेतकरी, शेतमजूर यांच्यावर विवाहाच्या सोहळयांचा आर्थिक बोजा पडू नये, त्यासाठी त्यांनी कर्ज घेऊ नये, या दृष्टीने **"नोदणीकृत विवाह"**(Registered Marriage) सर्वोत्तम उपाय आहे. यासाठी जोडप्यांना कोणत्याही स्वयंसेवी संस्थेवर अवलंबून राहण्याची गरज राहत नाही, व सामुहिक विवाह सोहळयाच्या

तारखेची वाट बघण्याची गरज राहत नाही. त्यांना स्वतःहून विवाह नोंदणी कार्यालयामध्ये जाऊन लग्न करता येते, तसेच अगदी साध्या सोहळयात व कमी खर्चात नोंदणीकृत विवाह करता येतो.

अशा जोडप्यांना सरळ रु. १०,०००/- इतके आर्थिक सहाय्य त्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करुन देण्यात यावे. ज्या जोडप्यांना <u>फक्त नोंदणीकृत</u> विवाह करावयाचा आहे त्यांना <u>सामुहिक</u> विवाह सोहळयात सामील होणे बंधनकारक राहणार नाही व नोंदणीकृत विवाह केल्यानंतरही त्यांना पूर्ण अनुदान मिळेल.

सामुहिक विवाहाप्रमाणेच लाभार्थ्यांनी या योजनेअंतर्गत अनुदानास पात्र ठरण्यासाठी अर्जासोबत - १) कोणत्या गावाचा रहिवाशी आहे, त्या पत्त्याबाबत ग्रामसेवक / तलाठीचा दाखला , २) किमान वय (१८ किंवा २१ वर्षे) असणेबाबत जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा तलाठी / ग्रामसेवकाचा दाखला, ३) तलाठी / तहसिलदार यांनी दिलेला रु.१ लाखाच्या आत असलेल्या उत्पन्नाचा दाखला या बाबींचे एकत्रित प्रमाणपत्र, तसेच ४) विवाह नोंदणी अधिकाऱ्याने दिलेले विवाह नोंदणी प्रमाणपत्र संबंधित सक्षम प्राधिकारी असलेले तहसिलदार, तलाठी किंवा ग्रामसेवक व विवाह नोंदणी अधिकारी यांच्याकडून घेऊन सादर करणे आवश्यक राहील.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांनी त्यांचा बँक खाते क्रमांक, बँक शाखा याबाबतचा तपील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत संबंधीत बँकेच्या शाखेमध्ये रक्कम जमा करावी व पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात बँकींग Electronic Transfer Facility ने किंवा इतर मार्गाने त्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात यावी.

नोंदणीकृत विवाह करण्यासाठी खर्च कमी असल्यामुळे, व नोंदणीकृत विवाह करण्याची प्रक्रिया सुलभ असल्याने, सदर खर्च जोडप्यांनी किंवा त्यांच्या कुटुंबियांनी स्वतः करणे आवश्यक राहील, विवाह नोंदणीकृत करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेची गरज राहणार नाही. थोडक्यात नोंदणीकृत विवाह प्रकरणात कोणत्याही स्वयंसेवी संस्थेस रु.२०००/- अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. या योजनेत नोंदणीकृत विवाह झाल्यानंतर लगेच अनुदान वाटप करण्यात यावे. अनुदान मिळण्यासाठी सामुहिक विवाह सोहळ्यात सहभागी होणे आवश्यक राहणार नाही. या नवीन योजनेस, व विशेषतः नोंदणीकृत विवाहास अनुदान, या बाबीला सर्व जिल्हा अधिकाऱ्यांनी जास्तीत-जास्त प्रसिध्दी द्यावी.

४. राज्यात वरील योजना पूर्णतः जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत राबविण्यात यावी व त्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेत दरवर्षी तरतूद करुन जिल्हा नियोजन विकास समितीस निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. या योजनेसाठी निधी जिल्हा नियोजन व विकास समितीस उपलब्ध करुन दिलेल्या निधीतूनच भागविण्यात यावा.

सदर आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५१३/११/व्यय-६, दिनांक २५.८.२०११ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या WWW.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 201110031615547001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(शं.शा.पढाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्री / राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (नियोजन), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभागाचे अमुस/प्रधान सचिव/सचिव, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह)
महासंचालक, कै.वसंतराव नाईक कृषी स्वावलंबन मिशन, अमरावती.
महालेखापाल (लेखा व परीक्षा) महाराष्ट्र -१/२, मुंबई /नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकाही अधिकारी.
सर्व जिल्हा विवाह नोंदणी निबंधक.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
निवडनस्ती/ का.२

**(परिशिष्ट ३.१)**

सार्वजनिक आरोग्य विभागातील महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ वैद्यकिय अधिकारी (वेतन श्रेणी रु१५६००-३९१००+ ग्रेड पे रुपये ५४००) ची रिक्त पदे मुलाखतीद्वारे भरण्याकरिता मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन परिपत्रक, क्रमांकः मवैअ २०१५/प्र.क्र. ७३९/निमं/सेवा ३
१०वा मजला, गो.ते.रुग्णालय आवार,
नवीन मंत्रालय, मुंबई - ०१
दिनांक : २४ जून,२०१६.

वाचा - १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः मवैअ १००७/प्र.क्र.३०७/सेवा-३, दिनांक १०.६.२००९.

२) शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : संकीर्ण २०१५/प्र.क्र. १२/निवडमंडळ, दिनांक २६.२.२०१६.

प्रस्तावना -

उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक-१ येथील शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१००, ग्रेड वेतन रुपये ५४००) या संवर्गातील वैद्यकिय अधिकारी गट - अ दर्जाची पदे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोग कक्षेतून वगळून ती स्वतंत्र निवडमंडळामार्फत भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरुन अनुक्रमांक-२ येथील शासन परिपत्रकान्वये सद्यस्थितीत औरंगाबाद व अमरावती विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बुलढाणा, आकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ आणि नागपूर विभागातील वर्धा अश्या १४ आत्महत्याग्रस्त जिल्हयातील वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त असलेली पदे मुलाखतीद्वारे (Walk in Interview) भरण्याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे राज्यातील वैद्यकीय अधिकारी गट-अ दर्जाची पदे मुलाखतीद्वारे (Walk in interview) भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक-

१. उपरोक्त १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१००, ग्रेड वेतन रुपये ५४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ दर्जाची पदे मुलाखतीद्वारे (Walk in interview) भरण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून सदर प्रक्रिया राबविण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे आहेत :-

२. जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे समिती नेमण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ | - | सचिव |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| जिल्हा समाज कल्याण अधिकारी | - | सदस्य |
| जिल्हा शल्य चिकित्सक | - | सदस्य |
| जिल्हा आरोग्य अधिकारी | - | सदस्य |
| सहायक आयुक्त, आदिवासी विकास विभाग | - | सदस्य |

३. शासनातर्फे वैद्यकीय अधिकारी गट-अ पदावरील निवड प्रक्रियेपुर्वी त्या-त्या वेळी जी रिक्त पदे असतील त्यांची प्रवर्गनिहाय (खुला, अज, अजा, इमाव, विमाप्र, भज-अ, भज-ब, भज-क, भज-ड इत्यादी भरावयाच्या पदांची संख्या निश्चित करुन तसेच समांतर आरक्षणासाठी पदसंख्या निश्चित करुन संपूर्ण राज्यात प्रवर्गनिहाय भरावयाच्या पदांची संख्या निश्चित करण्यात येईल व तद्नंतर पद भरतीकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल.

४. समुपदेशनासाठी आरोग्य संस्थांमधील विशेषज्ञांची रिक्त पदे, एकही वैद्यकीय अधिकारी कार्यरत नसलेली प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि एक वैद्यकिय अधिकारी उपलब्ध आहे अशा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी समुपदेश घेण्यात यावे.

५. समितीने जाहिरातीनुसार प्रवर्गनिहाय आणि आरक्षणानुसार रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन समितीने उमेदवारांची शैक्षणिक अर्हता (एमबीबीएस/ विशेषज्ञत्व), अनुभव, वय, प्रवर्ग इत्यादी बाबींची तपासणी करुन त्याआधारे पुढील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या निकषानुसार उमेदवारांचे गुणांकन करावे.

| अ.क्र. | तपशिल | एमबीबीएस शैक्षणिक अर्हता धारकांसाठी गुणांचे प्रमाण (weightage) | पदव्युत्तर पदवी/ पदविका शैक्षणिक अर्हताधारकंसाठी गुणांचे प्रमाण (weightage) |
|---|---|---|---|
| १ | पदवी परीक्षेच्या सर्व वर्षांमध्ये मिळालेले सरासरी गुण | ६०% (जास्तीत जास्त ६० गुण) | लागू नाही. |
| २ | पदव्युत्तर पदविका किंवा पदव्युत्तर पदवी परीक्षेमध्ये मिळालेले सरासरी गुण | लागू नाही. | ६०% (जास्तीत जास्त ६० गुण) |
| ३ | शासन सेवेत वैद्यकीय अधिकारी या पदावर अस्थायी किंवा बंधपत्रित स्वरुपात केलेली एकूण सेवा | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाही ला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| ४ | शासन सेवेत नसल्यास पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन झालेले एकूण वर्ष | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| | एकूण गुण | १०० | १०० |

७. गुणांकनानुसार विहीत कार्यपध्दतीद्वारे पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी व निवड मंडळ कक्षास सादर करावी.

८. समितीने सादर केलेल्या गुणवत्ता यादीनुसार उमेदवारास आरोग्य संस्थेमध्ये रिक्त पदाच्या ठिकाणी पसंतीनुसार नियुक्ती मिळण्याकरीता समुपदेशन घेण्यात यावे.

९. समितीने सादर केलेली गुणवत्ता यादी आणि उमेदवारांच्या नियुक्तीकरीता दर्शविलेली पसंती याची तपासणी करुन उमेदवारास रिक्त पदावर नियुक्तीचे आदेश शासनामार्फत काढण्यात यावेत.

१०. नियुक्ती आदेशानंतर लगेचच सेवार्थ प्रणालीमध्ये संबंधित वैद्यकिय अधिकारी यांची नोंद होईल व वेतन सुरु होईल याची दक्षता घेण्यात यावी.

११. नवनियुक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी मुख्यालयी राहणे अत्यावश्यक राहील व वेतन हे

बायोमेट्रीक हजेरीशी संलग्न असेल.

१२. एकूण रिक्त पदांच्या ७५% एवढया मर्यादेत पदे भरण्यास मुभा राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०६१७१८३४५९१९१७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Rambhaji Dahiphale

Digitally signed by Vivek Rambhaji Dahiphale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, cn=Vivek Rambhaji Dahiphale
Date: 2016.06.24 17:10:54 +05'30'

( वि.र.दहिफळे )
निवडमंडळाचे सदस्य सचिव तथा सह सचिव
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा. मंत्री ( सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव
४. प्रधान सचिव (आरोग्य) यांचे स्वीय सहायक.
५. संचालक, आरोग्य सेवा , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. सर्व उप संचालक, आरोग्य सेवा मंडळे.
८. सर्व जिल्हाशल्य चिकित्सक.
९. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी.
१०. निवड नस्ती ( निवडमंडळ ).
११. निवडनस्ती (सेवा ३)

**(परिशिष्ट ३.२)**

महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट अ (वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४००) तसेच रुग्णसेवा कर्मचाऱ्यांच्या (गट ब ते ड) मधील जिल्हा अंतर्गत बदल्यांचे अधिकार प्रत्यावर्तीत करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बदली-१३१४/प्र.क्र.५१९/सेवा-२
गो.ते.रुग्णालय इमारत संकुल, १० वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक : ३० नोव्हेंबर, २०१६

वाचा :

१) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः बदली-१३१४/प्र.क्र.५१९/सेवा-२, दिनांक ६ डिसेंबर, २०१४

प्रस्तावना :

सार्वजनिक आरोग्य विभागातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार शासनस्तरावर आहेत. त्यामुळे स्थानिक निकड विचारात घेऊन संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे वैद्यकीय अधिकाऱ्यांची बदली करु शकत नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधी शासनस्तरावर याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करीत असतात. तसेच मा.मंत्रीस्तरावर बैठका तसेच विधीमंडळातही याबाबत चर्चा उपस्थित होते. सदर अधिकार किमान जिल्हास्तरापुरते जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांच्या समितीस प्रदान केल्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा अधिक प्रभावीपणे व आवश्यकतेनुसार वापरता येतील. यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे बदलीचे तसेच त्यासोबतच रुग्णसेवा कर्मचाऱ्यांच्या (Para Medical Staff) बदलीचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीस सोपविण्याबाबत निर्णय घेण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट अ (वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४००) तसेच रुग्णसेवा कर्मचाऱ्यांच्या ( Para Medical Staff ) ( गट ब ते ड ) जिल्हा अंतर्गत बदल्यांचे अधिकार पुढे नमूद करण्यात आलेल्या समितीस पुढील शासन आदेशापर्यंत प्रदान करण्यात येत आहेत :-

१) जिल्हाधिकारी - अध्यक्ष
२) मुख्य कार्यकारी अधिका. जिल्हा परिषद - सदस्य
३) जिल्हा समाज कल्याण अधिकारी - सदस्य

| | |
|---|---|
| ४) जिल्हा शल्य चिकित्सक | - सदस्य |
| ५) जिल्हा आरोग्य अधिकारी | - सदस्य सचिव |
| ६) सहायक आयुक्त, आदिवासी विकास विभाग | - सदस्य |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६११३०१४०७३५९३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe51 89556b7e85d5896bbb81496f403bfc58ac3e, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2016.11.30 16:22:25 +05'30'

(वि. पुं. घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. मा. मंत्री (सा.आ.) / मा. राज्यमंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव,
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,
५. आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई,
६. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण सोसायटी, मुंबई,
७. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
८. जिल्हा अधिकारी (सर्व),
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
१०. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व),
११. सह संचालक, आरोग्य सेवा (सर्व),
१२. उप संचालक, आरोग्य सेवा (सर्व),
१३. जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व),
१४. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व),
१५. जिल्हा समाज कल्याण अधिकारी (सर्व),
१६. सहायक आयुक्त, आदिवासी विकास विभाग (सर्व),
१७. मुख्य प्रशासकीय अधिकारी (सर्व),
१८. सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहायक,
२०. निवड नस्ती (सेवा - २)

**(परिशिष्ट ३.३)**

शासकीय वैद्यकीय/आयुर्वेद महाविद्यालयातील तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत उमेदवारांच्या सेवा नियमित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः एलईसी-१४१४/प्र.क्र. २५/वैसेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग,मुंबई-४०० ००१,
तारीख : २२ ऑक्टोबर,२०१६.

प्रस्तावना :-

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गापैकी सहायक प्राध्यापक या कनिष्ठतम संवर्गात मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. त्यामुळे सहयोगी प्राध्यापक व तद्नंतर प्राध्यापक या वरिष्ठ पदांवर पदोन्नतीने नियुक्ती करण्यासाठी पर्याप्त संख्येत उमेदवार उपलब्ध होत नाहीत. याचा रुग्णसेवेवर व विद्यार्थी हितावर विपरीत परिणाम होत असून भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार अध्यापकीय संवर्गातील पदे भरलेली नसल्यामुळे विद्यार्थ्यांची मंजूर संख्या व एकूणच महाविद्यालयाची मान्यता धोक्यात येऊ शकते. शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांच्या बाबतीत देखील अशीच स्थिती असून त्या महाविद्यालयांसाठीही ही समस्या गंभीर बनली आहे. त्यामुळे भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेच्या मानकांची पुर्तता करणे कठीण होत आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये यांच्याशी संलग्नित आरोग्य प्रशिक्षण केंद्रात प्रदीर्घ काळापासून स्त्री वैद्यकीय अधिकारी या महत्त्वाच्या संवर्गात नियमित नियुक्त्या होऊ शकल्या नाहीत. सर ज.जी. समूह रुग्णालये, मुंबई यांच्या अधिपत्याखालील रक्तपेढी विभागात कनिष्ठ सहायक प्राध्यापकांची पदे मंजूर असली तरी ती नियमित स्वरुपात भरण्यात आली नाहीत.

खाजगी वैद्यकीय व्यवसाय व खाजगी रुग्णालयांच्या वाढत्या संख्येमुळे निर्माण झालेली स्पर्धा यामुळे उच्च अर्हता धारण करण्या-या अनुभवी डॉक्टरांची सेवा अध्यापनासाठी व रुग्णसेवेसाठी प्राप्त करुन घेणे शासनास दुरापास्त होत आहे. या सर्व बाबींचा विचार करुन शासकीय वैद्यकीय व आयुर्वेद महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्नित आरोग्य प्रशिक्षण केंद्र यातील स्त्री वैद्यकीय अधिकारी तसेच कनिष्ठ सहायक प्राध्यापक, रक्तपेढी विभाग या

संवर्गातील विभागीय निवडमंडळ पुरस्कृत उमेदवार म्हणून तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या सेवा नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये तसेच आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालये यांच्या आस्थापनेवर विभागीय निवडमंडळ पुरस्कृत उमेदवार म्हणून तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत असलेल्या खालील संवर्गातील उमेदवारांच्या तात्पुरत्या सेवा दिनांक २४.१०.२०१६ पासून अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतील एक विशेष बाब म्हणून नियमित करण्यास शासनाची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पात्र उमेदवारांची संख्या |
|---|---|---|
| १ | सहायक प्राध्यापक (वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये) | १५९ |
| २ | सहायक प्राध्यापक (आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालये) | २४ |
| ३ | कनिष्ठ सहायक प्राध्यापक, रक्तपेढी विभाग (सर ज.जी.समूह रुग्णालये, मुंबई) | ०४ |
| ४ | स्त्री वैद्यकीय अधिकारी (शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांशी संबंधित आरोग्य प्रशिक्षण केंद्रे) | ०५ |
| | एकूण | १९२ |

२. उपरोक्त प्रमाणे सेवा नियमित करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे व त्यांची पदस्थापना याबाबतचा तपशील या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र-अ मध्ये नमूद करण्यात आला आहे.

३. विवरणपत्र-अ मध्ये नमूद उमेदवारांच्या सेवा या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र-ब मधील अटीं व शर्तींच्या अधीन राहून नियमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय दिनांक ४/१०/२०१६ रोजी संपन्न झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०२११७१५५८२११३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digambar Shankar Kinge

Digitally signed by Digambar Shankar Kinge
DN: CN = Digambar Shankar Kinge, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Medical Education Department
Date: 2016.10.22 16:30:50 +05'30'

दि.शं.किनगे
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव,महाराष्ट्र राज्य,
२. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
३. मा. राज्य मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
४. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा/लेख व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
५. उपसचिव, मा. मुख्य सचिव कार्यालय,
६. संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई,
७. संचालक, आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय/आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालये,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
११.संबंधित जिल्हा कोषागार, अधिकारी,
१२.सर्व संबंधित उमेदवार (अधिष्ठाता मार्फत)
१३.सर्व कार्यासने, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.निवड नस्ती/वैसेवा-३

**(परिशिष्ट ४.१)**

पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा
खरेदी अर्थसहाय योजना सुरू करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः इंआयो-२०१५/प्र.क्र.२००/योजना-१०
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: ३० डिसेंबर, २०१५

प्रस्तावना ६

इंदिरा आवास योजना १९८९ पासून डिसेंबर, १९९५ अखेरपर्यंत जवाहर रोजगार योजनेची उपयोजना म्हणून राबविली जात होती. त्यानंतर दि.१.१.१९९६ पासून ही योजना स्वतंत्रपणे केंद्र पुरस्कृत योजना म्हणून राबविण्यात येत आहे. ग्राम विकास विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

इंदिरा आवास योजनेचा एक भाग म्हणून ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील बेघरांपैकी ज्यांना स्वतःची जागा नाही अशा कुटूंबाकरिता जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भातील योजनेस केंद्र शासनाने सन २०१०-११ पासून मान्यता दिली आहे. ही योजना केंद्र पुरस्कृत असून त्यामध्ये केंद्र व राज्य हिस्सा ५०:५० % असा आहे. सन २०१३-१४ या वर्षापासून या योजनेतंर्गत घरकुलाच्या जागेसाठी प्रत्येक लाभार्थ्यास जागा खरेदी करण्यासाठी रू.२०,०००/- (केंद्र रू.१०,०००/- व राज्य रू.१०,०००/-) अनुज्ञेय आहे. लाभार्थ्यास जागा खरेदीसाठी रू.२०,०००/- अथवा प्रत्यक्ष खर्चाची रक्कम यापैकी जी कमी असेल एवढे आर्थिक सहाय्य देण्यात येते. तथापि, सद्यस्थितीत राज्यातील ग्रामीण भागातील जागेचे दर विचारात घेता रू.२०,०००/- मध्ये घरकुलासाठी जागा खरेदी करण्यास अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे प्रत्यक्षात या योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या नगण्य आहे. जागे अभावी इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांची संख्या दोन लाखाच्या वर आहे.

त्यामुळे केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेच्या निधीचा राज्य शासनास पूर्ण क्षमतेने उपयोग करून घेता येत नाही.

त्याचप्रमाणे सामाजिक न्याय विभागाची रमाई आवास योजना, आदिवासी विकास विभागाची शबरी आवास योजना ह्या राज्य पुरस्कृत योजनेमध्ये देखील मोठया प्रमाणात पात्र लाभार्थी केवळ जागा अभावी घरकुल योजनेचा लाभ देता येणे शक्य होत नाही.

ग्रामीण घरकुल योजनेतील लाभार्थ्यांकडे घरकुलासाठी जागा नाही असे लाभार्थी सार्वजनिक क्षेत्र किंवा नातेवाईक, मित्रमंडळ यांच्या घरात आसरा घेतात परंतु जागेची मालकी त्यांच्या नावावर नसते. या बाबी विचारात घेऊन घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसलेल्या दारिद्रय रेषेखालील कुटूंबांना जागा खरेदीसाठी अतिरिक्त अर्थसहाय उपलब्ध व्हावे यासाठी घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय§

केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजना व राज्य पुरस्कृत अन्य योजनेतील दारिद्रय रेषेखालील घरकुल पात्र लाभार्थी केवळ जागे अभावी घरकुलाच्या लाभ मिळण्यापासून वंचित आहेत, ही बाब विचारात घेता सन २०१५-१६ पासून दारिद्रय रेषेखालील भूमिहीन बेघर कुटूंबांना घरकुल बांधकामास जागा खरेदी करण्यासाठी "पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" या नावाने योजनेस मान्यता देण्यात येत आहे. ही योजना इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना व शबरी आवास योजना या योजनेतील दारिद्रय रेषेखालील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभधारकांना लागू राहील.

केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेतील दारिद्रय रेषेखालील भूमिहीन कुटुंबांना जागा खरेदी करण्यासाठी केंद्र शासनामार्फत रू.१०,०००/- व या योजनेअंतर्गत रू.४०,०००/- असे एकूण रू.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

रमाई आवास योजना व शबरी आवास योजना या राज्य पुरस्कृत घरकुल योजनेतील दारिद्रय रेषेखालील घरकुल पात्र भूमिहीन कुटुंबांना जागा खरेदी करण्यासाठी या योजनेअंतर्गत रू.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

"पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना"ही दारिद्रय रेषेवरील (APL) लाभधारकांसाठी लागू राहणार नाही.

जागेची उपलब्धता

(अ) इंदिरा आवास योजनेअंतर्गत २० चौ.मी. घरकुलाचे बांधकाम करण्याच्या सूचना आहेत. या व्यतिरिक्त शौचालय व घरकुलाच्या सभोतालची जागा गृहीत धरल्यास साधारणपणे ५०० चौ.फूट जागेमध्ये घरकुलाचे बांधकाम करणे शक्य आहे. त्यानुसार घरकुल बांधकामासाठी ५०० चौ.फूटापर्यंत जागा प्रति लाभार्थी खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(ब) मोठया ग्रामपंचायती तसेच शहरा शेजारील ग्रामपंचायतीमध्ये जागेचे जास्त दर व जागेची कमी उपलब्धता विचारात घेता, ५०० चौ.फूटापर्यंत जागेत स्थानिक प्राधिकरणाच्या बांधकामाच्या नियमावलीनुसार दोन किंवा तीन लाभार्थ्यांच्या संमतीने दोन मजली (G+1) किंवा तीन मजली (G+2) इमारत बांधण्यासाठी प्रति लाभार्थी रू.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य जागा खरेदीसाठी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील (अ) व (ब) मध्ये प्रत्यक्ष जागेचे क्षेत्रफळ हे प्रति लाभार्थी ५०० चौ.फूटापर्यंत असल्यामुळे जागेची किंमत व रू.५०,०००/- यापेक्षा जे कमी असेल तेवढे अर्थसहाय लाभार्थ्यांस देण्यात येईल. जागेची किंमत रू.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास व त्यावरील रक्कम लाभार्थी स्वत: देण्यास तयार असल्यास त्यास या योजनेचा लाभ देण्यात येईल.

इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर या योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील भूमिहीन बेघर लाभार्थ्यांना जागा खरेदी करण्यासाठी अनुदान देण्याकरिता सर्व साधारण प्रवर्गाकरिता ग्राम विकास विभागाच्या नियतव्ययातून, अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक

योजनेतून व अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता आदिवासी विकास विभागाच्या जन जाती क्षेत्र उपयोजना व जन जाती क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येईल. राज्यातील सर्व ग्रामीण घरकुल योजना या विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत राबविण्यात येत असल्याने अशा सर्व योजनांचे नियंत्रणाचे काम ग्राम विकास विभाग नोडल विभाग म्हणून काम करेल.

घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसलेल्या इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना व शबरी आवास योजनेतील दारिद्रय रेषेखालील भूमिहीन बेघर कुटूंबांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे-

| | |
|---|---|
| गट विकास अधिकारी | अध्यक्ष |
| नायब तहसिलदार | सदस्य |
| उप अभियंता | सदस्य |
| तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख | निमंत्रक |
| उप निबंधक (नोंदणी) | निमंत्रक |
| City Survey officer | निमंत्रक |
| सहायक प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय) | निमंत्रक |
| विस्तार अधिकारी (समाज कल्याण) | निमंत्रक |
| विस्तार अधिकारी (पंचायत) | सदस्य सचिव |

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल-

| | |
|---|---|
| अ | जागा हस्तांतरण योग्य असल्याबाबत खात्री करणे. |
| ब | जागेचे दर प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करून निश्चित करणे. |
| क | लाभार्थ्यांच्या नावे खरेदी प्रक्रिया पार पाडण्यासाठी समन्वय साधणे. |
| ड | लाभार्थ्यास रू.५०,०००/- च्या मर्यादेत म्हणजेच जागेची प्रत्यक्ष किंमत व रू.५०,०००/- यापेक्षा जे कमी असेल त्याप्रमाणे मोबदला उपलब्ध करून देणे. यामध्ये स्टॅम्प डयूटी व जागा हस्तांतरणासाठी नियमाप्रमाणे येणारा खर्च समाविष्ट असेल. |
| इ | खरेदी केलेल्या जागेची ग्रामपंचायत दप्तरी व सक्षम प्राधिकरणाकडे नोंद घेणे. |

जागेची निवड- जागेची निवड करतांना पुढील बाबी विचारात घेण्यात याव्यात-

| | |
|---|---|
| १ | ग्रामपंचायत अंतर्गत गावठाण हद्दीत येणारी जागा व गावठाण हद्दीबाहेरील अकृषक निवासी प्रयोजनासाठी सक्षम नियोजन प्राधिकरणाने मंजूरी दिलेल्या जागा |
| २ | जागा निवडतांना समितीने आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उदा. पाणी पुरवठा, रस्ता, सार्वजनिक सुविधा उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी. |
| ३ | निवडलेल्या जागेस लाभार्थ्याची सहमती असावी. |

जागा खरेदी प्रक्रिया

| | |
|---|---|
| १ | लाभार्थ्याने जागेची निवड केल्यानंतर जागा हस्तांतरण योग्य व जागेची किंमत याची शहानिशा समिती करेल. |
| २ | लाभार्थी जागा मालका बरोबर विक्री करार (Agreement to sale) करेल. |
| ३ | वरील बाबींची पूर्तता झाल्यावर जागेचा देय निधी लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यामध्ये जमा करण्यास समिती मान्यता देईल. |
| ४ | जागेसाठी देय निधी लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यामध्ये जमा करण्यापूर्वी लाभार्थ्यांकडून प्रतिज्ञापत्र प्राप्त करून घेण्यात येईल |
| ५ | समिती जागेची प्रत्यक्ष खरेदी करतांना समन्वय करेल. |
| ६ | लाभार्थी जागेची किंमत जागा मालकास अदा करेल व प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया (Sale deed) पार पाडेल. |
| ७ | खरेदीनंतर लाभार्थ्याच्या नावे सदर जागेची नोंद ग्रामपंचायत, City Survey व इतर सक्षम प्राधिकणाकडे समितीमार्फत केली जाईल. जागेची नोंद प्राधान्याने लाभधारकाच्या पत्नीच्या नावे किंवा सयुक्त नावाने घेण्यात येईल. |
| ८ | जागा खरेदीची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ग्रामसभेपुढे अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. |

जागा लाभार्थ्यांच्या नावावर हस्तांतरीत झाल्यानंतर व सक्षम प्राधिकरणाची बांधकामास मान्यता घेतल्यानंतर लाभार्थ्यांस घरकुल बांधकामाचे अनुदान योजनेच्या निकषाप्रमाणे एक महिन्यात मंजूर करण्यात यावे.

निधीचे व्यवस्थापन

"पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" ही योजना सर्व घरकुल योजनेतील दारिद्रय रेषेखालील पात्र लाभार्थ्यांसाठी असली तरी संबंधित प्रशासकीय विभागाकडून त्या-त्या वित्तीय वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेत लाभार्थ्यांची संख्या निश्चित करण्यात येईल.

या योजनेअंतर्गत राज्य शासनाकडील निधी संबंधित विभागाकडून "राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना" यांचे अधिनस्त स्वतंत्र बँक खात्यात जमा केला जाईल. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रस्ताव विचारात घेऊन या बँक खात्यातून निधी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे स्वतंत्र बँक खात्यात वर्ग करण्यात येईल. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सदरचा निधी लाभार्थ्यांना अदा करण्यासाठी गट विकास अधिकारी यांचेकडे जागा खरेदीसाठी आवश्यकतेप्रमाणे सुपूर्द करतील. जागा खरेदी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून केंद्र हिस्साची रू.१०,०००/- ची प्रतिपुर्ती (Reimbursement) प्राप्त करून घेण्यासाठी "राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना" यांचेकडून केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल.

राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे राज्यस्तरावरील समन्वयन करण्यासाठी ग्राम विकास विभाग समन्वय विभाग म्हणून काम करेल.

"पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" कार्यान्वयन (Operational Guidelines) सबंधिच्या मार्गदर्शन सूचना सविस्तरपणे निर्गमित करण्यात येतील.

सदर शांसन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२२३११३३०८३८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

V Giriraj

Digitally signed by V Giriraj
DN: c=IN, o=All India Service, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=V Giriraj
Date: 2015.12.30 16:03:31 +05'30'

(वि.गिरीराज)
प्रधान सचिव, ग्राम विकास

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव

३) मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक
४) मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक
५) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव
६) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव, नियोजन/वित्त/सामाजिक न्याय/ आदिवासी विकास/ गृहनिर्माण विभाग/पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
७) महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई (पाच प्रतींसह)
८) महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर (पाच प्रतींसह)
९) सर्व विभागीय आयुक्त
१०) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर
११) सर्व जिल्हाधिकारी
१२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
१३) सर्व उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय
१४) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना, सिडको भवन (दक्षिण कक्ष), सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.
१५) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
१६) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१७) उप कोषागार अधिकारी, बेलापूर, नवी मुंबई.
१८) वित्त विभाग (व्यय-१५) व ( अर्थ-१७) मंत्रालय मुंबई-३२.
१९) नियोजन विभाग (१४८१/१४४४), मंत्रालय, मुंबई-३२
२०) अप्पर संचालक, प्रकल्प आखणी व एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष,
२१) कार्यासन अधिकारी, वित्त-७, वित्त-१, योजना-१, योजना-२, योजना-५ व योजना-७, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
२२) निवड नस्ती.

**(परिशिष्ट ४.२)**

पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा
खरेदी अर्थसहाय योजना सुरू करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०१७/प्र.क्र.६०/योजना-१०
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: १४ जुलै, २०१७.

वाचा :- (१) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.इंआयो-२०१५/प्र.क्र.२००/योजना-१०, दिनांक ३० डिसेंबर, २०१५.
(२) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.पीएमएवाय-जी-२०१६/प्र.क्र.३३३/योजना-१० दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६.

प्रस्तावना-

केंद्र शासनाने इंदिरा आवास योजनेचे स्वरूप बदलून प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने सदरची योजना राज्यात राबविण्याचा निर्णय संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. इंदिरा आवास योजना ऐवजी प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) असा नावात झालेला बदल, बदलेले लाभार्थी निवडीचे निकष, जागा उपलब्ध करून देण्याच्या योजनेत झालेले बदल तसेच राज्य शासनाच्या विविध विभागांच्या घरकुल योजनांचे बदलेले निकष यासर्व बाबी विचारात घेऊन "पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" च्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णय अधिक्रमित करून सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत अन्य ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र लाभार्थी केवळ जागे अभावी घरकुलाच्या लाभ मिळण्यापासून वंचित आहेत, ही बाब विचारात घेऊन "पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" सुरु करण्यात आली आहे. ही योजना केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) व राज्य पुरस्कृत

ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभधारकांना लागू राहील.

केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या कुटुंबांना जागा खरेदी करण्यासाठी रू.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

जागेची उपलब्धता

(अ) प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत २५ चौ.मी. घरकुलाचे बांधकाम करण्याच्या सूचना आहेत. या व्यतिरिक्त इतर मुलभुत सुविधा यासाठी घरकुलाच्या सभोतालची जागा गृहीत धरल्यास साधारणपणे ५०० चौ.फूट जागेमध्ये घरकुलाचे बांधकाम करणे शक्य आहे. त्यानुसार घरकुल बांधकामासाठी ५०० चौ.फूटापर्यंत जागा प्रति लाभार्थी खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(ब) मोठया ग्रामपंचायती तसेच शहरा शेजारील ग्रामपंचायतीमध्ये जागेचे जास्त दर व जागेची कमी उपलब्धता विचारात घेता, ५०० चौ.फूटापर्यंत जागेत स्थानिक प्राधिकरणाच्या बांधकामाच्या नियमावलीनुसार दोन किंवा तीन लाभार्थ्यांच्या संमतीने दोन मजली (G+१) किंवा तीन मजली (G+२) इमारत बांधण्यासाठी प्रति लाभार्थी रू.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य जागा खरेदीसाठी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील (अ) व (ब) मध्ये जर प्रत्यक्ष जागेचे क्षेत्रफळ हे प्रति लाभार्थी ५०० चौ.फूटापर्यंत असल्यास प्रत्यक्ष जागेची किंमत किंवा रू.५०,०००/- यापैकी जे कमी असेल तेवढे अर्थसहाय लाभार्थ्यांस देण्यात येईल. जागेची किंमत रू.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास व त्यावरील रक्कम लाभार्थी स्वत: देण्यास तयार असल्यास त्यास या योजनेचा लाभ देण्यात येईल.

प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा खरेदी करण्यासाठी अनुदान देण्याकरिता सर्व साधारण

प्रवर्गाकरिता ग्राम विकास विभागाच्या नियतव्ययातून, अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक योजनेतून व अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता आदिवासी विकास विभागाच्या जन जाती क्षेत्र उपयोजना व जन जाती क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच अन्य राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना संबंधित विभागाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. राज्यातील सर्व ग्रामीण घरकुल योजना या विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत राबविण्यात येत असल्याने अशा सर्व योजनांचे नियंत्रणाचे काम ग्राम विकास विभाग हा राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण या शिखर यंत्रणेमार्फत काम करेल.

घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसलेल्या केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) व अन्य राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे-

| | |
|---|---|
| गट विकास अधिकारी | अध्यक्ष |
| नायब तहसिलदार | सदस्य |
| उप अभियंता | सदस्य |
| तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख | निमंत्रक |
| उप निबंधक (नोंदणी) | निमंत्रक |
| City Survey officer | निमंत्रक |
| सहायक प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय) | निमंत्रक |
| विस्तार अधिकारी (समाज कल्याण) | निमंत्रक |
| विस्तार अधिकारी (पंचायत) | सदस्य सचिव |

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल-

| | |
|---|---|
| अ | जागा हस्तांतरण योग्य असल्याबाबत खात्री करणे. |
| ब | जागेचे दर प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करून निश्चित करणे. |
| क | लाभार्थ्यांच्या नावे खरेदी प्रक्रिया पार पाडण्यासाठी समन्वय साधणे. |

| | |
|---|---|
| ड | लाभार्थ्यास रू.५०,०००/- च्या मर्यादेत म्हणजेच जागेची प्रत्यक्ष किंमत व रू.५०,०००/- यापेक्षा जे कमी असेल त्याप्रमाणे मोबदला उपलब्ध करून देणे. यामध्ये स्टॅम्प डयूटी व जागा हस्तांतरणासाठी नियमाप्रमाणे येणारा खर्च समाविष्ट असेल. |
| इ | खरेदी केलेल्या जागेची ग्रामपंचायत दप्तरी व सक्षम प्राधिकरणाकडे नोंद घेणे. |

जागेची उपलब्धता-

| | |
|---|---|
| १ | जिल्हाधिकारी वा शासनाकडून उपलब्ध झालेल्या शासकीय / संपादित जागा |
| २ | ग्रामपंचायत अंतर्गत गावठाण हद्दीत येणारी जागा व गावठाण हद्दीबाहेरील निवासी प्रयोजनासाठी सक्षम नियोजन प्राधिकरणाने मंजूरी दिलेल्या जागा |

जागेची निवड करतांना पुढील बाबी विचारात घेण्यात याव्यात-

| | |
|---|---|
| १ | जागा निवडतांना समितीने आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उदा. पाणी पुरवठा, रस्ता, सार्वजनिक सुविधा उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी. |
| २ | निवडलेल्या जागेस लाभार्थ्याची सहमती असावी. |

जागा खरेदी प्रक्रिया

| | |
|---|---|
| १ | लाभार्थ्याने जागेची निवड केल्यानंतर जागा हस्तांतरण योग्य व जागेची किंमत याची शहानिशा समिती करेल. |
| २ | लाभार्थी जागा मालका बरोबर विक्री करार (Agreement to sale) करेल. |
| ३ | जागेसाठी देय निधी लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यामध्ये जमा करण्यापूर्वी लाभार्थ्यांकडून प्रतिज्ञापत्र प्राप्त करून घेण्यात येईल. |
| ४ | वरील बाबींची पूर्तता झाल्यावर जागेचा देय निधी लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यामध्ये जमा करण्यात येईल. |
| ५ | समिती जागेची प्रत्यक्ष खरेदी करतांना समन्वय करेल. |
| ६ | लाभार्थी जागेची किंमत जागा मालकास अदा करेल व प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया (Sale deed) पार पाडेल. |
| ७ | खरेदीनंतर लाभार्थ्याच्या नावे सदर जागेची नोंद ग्रामपंचायत, City Survey व इतर सक्षम प्राधिकणाकडे समितीमार्फत केली जाईल. जागेची नोंद प्राधान्याने लाभधारकाच्या पत्नीच्या नावे किंवा संयुक्त नावाने घेण्यात येईल. |
| ८ | जागा खरेदीची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ग्रामसभेपुढे अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. |

जागा लाभार्थ्यांच्या नावावर हस्तांतरीत झाल्यानंतर व सक्षम प्राधिकरणाची बांधकामास मान्यता घेतल्यानंतर लाभार्थ्यांस घरकुल बांधकामाचे अनुदान योजनेच्या निकषाप्रमाणे मंजूर करण्यात यावे.

निधीचे व्यवस्थापन

"पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" ही योजना सर्व घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांसाठी असली तरी संबंधित प्रशासकीय विभागाकडून त्या-त्या वित्तीय वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेत लाभार्थ्यांची संख्या निश्चित करण्यात येईल.

या योजनेअंतर्गत राज्य शासनाकडील निधी संबंधित विभागाकडून "राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण" यांचे अधिनस्त स्वतंत्र बँक खात्यात जमा केला जाईल.

निधीचे वितरण

(अ) लाभार्थ्यांने गावठाण हद्दीतील जागा अथवा गावठाण हद्दीबाहेरील निवासी प्रयोजनासाठीची सक्षम प्राधिकरणाने मंजूर केलेली जागा खरेदी करण्यास सहमती दर्शविल्यास व समितीने याबाबतची शहानिशा केल्यानंतर जागा खरेदीसाठी निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यात जमा करण्यात येईल. राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचेकडून सदर योजनेसाठी PFMS (Public Financial Management System) प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर या योजनेचा निधी PFMS प्रणालीव्दारे लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यात थेट जमा करण्याची कार्यवाही केली जाईल.

(ब) जिल्हाधिकारी यांचेकडून गाव पुनर्वसन अंतर्गत तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ अंतर्गत नियम २७ अन्वये शासकीय जमीन निवासी वापराकरिता प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) आणि राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांकरिता उपलब्ध करून दिली गेल्यास सदर शासकीय जमिनीचा / संपादित जमीनीचा

मोबदला/कब्जा हक्क रक्कम निकषाप्रमाणे संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमा करतील.

उपरोक्त (अ) आणि (ब) मध्ये जागेची किंमत प्रति लाभार्थी रू.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास त्यावरील रक्कम लाभार्थी / लाभार्थ्यांनी भरणे बंधनकारक राहील.

राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे राज्यस्तरावरील समन्वयन करण्यासाठी ग्राम विकास विभाग समन्वय विभाग म्हणून काम करेल.

सदरचा शासन निर्णय अनौपचारिक संदर्भ, सामाजिक न्याय विभाग क्र.०५/बांधकामे, दि.१६.६.२०१७, आदिवासी विकास विभाग क्र.१३/का.१७, दि.३.३.२०१७, नियोजन विभाग क्र.७८/१४४४, दि.२१.३.२०१७ व वित्त विभाग क्र.२४१/२०१७/ व्यय-१५, दि.५.४.२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०७१४१५५५५६४४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Gupta

Digitally signed by Aseem Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Gupta
Date: 2017.07.14 16:48:09 +05'30'

(असीम गुप्ता)
सचिव, ग्राम विकास विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व विधानसभा व विधान परिषद सदस्य

६) मा.मुख्य सचिव, यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
८) महालेखापाल (लेखापरीक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
१०) महालेखापाल (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३) अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (सर्व)
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य जीवनन्योती अभियान, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई
१८) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सी.बी.डी.,बेलापूर, नवी मुंबई
१९) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२१) ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व सह/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२२) उप सचिव, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२३) उप सचिव, नियोजन (का.१४११ व १४१४) व वित्त विभाग (का.व्यय-१५ व अर्थ-१७) मंत्रालय, मुंबई
२४) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
२५) सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
२६) अतिरिक्त संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
२७) निवड नस्ती (कार्यासन योजना-१०)

**(परिशिष्ट ४.३)**

RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक १(२)] शुक्रवार, जानेवारी १, २०१६/पौष ११, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक २

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.—महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. | १-२ |

दिनांक ३० डिसेंबर २०१५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

नि. ज. जमादार,<br>सचिव,<br>महाराष्ट्र शासन,<br>विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९४७ चा ६२. ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९४७ चा अधिनियम क्रमांक ६२ यामध्ये कलम ८ब समाविष्ट करणे.

२. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम याच्या कलम ८अ नंतर पुढील कलम जादा दाखल करण्यात येईल :— १९४७ चा ६२.

विवक्षित क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या जमिनीस कलमे ७, ८ आणि ८अअ लागू नसणे.

"८ब. महानगरपालिका किंवा नगरपरिषदांच्या सीमांमध्ये स्थित असलेल्या जमिनीस किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये नियुक्त केलेल्या किंवा घटित केलेल्या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या किंवा नवीन नगरविकास प्राधिकरणाच्या अधिकारितेमध्ये स्थित असलेल्या जमिनीस आणि तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये तयार करण्यात आलेल्या यथास्थिति, प्रारूप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेमध्ये निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा इतर कोणत्याही अकृषिक वापरासाठी नेमून दिलेल्या कोणत्याही जमिनीस कलमे ७, ८ आणि ८अअ मधील कोणतीही बाब लागू होणार नाही : १९६६ चा महा. ३७. १९६६ चा महा. ३७.

परंतु, कोणतीही व्यक्ती, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१५ अंमलात आल्याच्या दिनांकापूर्वी अधिसूचित केलेल्या प्रमाणक्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र असलेल्या, उपरोक्त विनिर्दिष्ट क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या जमिनीच्या कोणत्याही खंडाचे, असा खंड, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ या अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये, नियोजन प्राधिकरणाने किंवा, यथास्थिति, जिल्हाधिकाऱ्याने मंजूर केलेला पोट-विभाग किंवा रेखांकन यामुळे निर्माण झाला असल्याखेरीज, हस्तांतरण करणार नाही.". २०१६ चा महा. २. १९६६ चा महा. ३७.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

**(परिशिष्ट ४.४)**

ग्रामपंचायतींच्या हद्दीतील मिळकतींवर कर
आकारणी करुन वसुली करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः पंरास २०१६/प्र.क्र.१७/पंरा-४
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१
तारीखः १८ जुलै, २०१६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम १२४ अन्वये ग्रामपंचायतीला असणाऱ्या कर आकारणी व वसुलीचे अधिकार संदर्भात शासनाने तातडीने परिपत्रक निर्गमित करुन जनमानसात व जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर करण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधितांना कळविण्यात यावे अशी पंचायत राज समितीने शिफारस केली आहे. त्यानुषंगाने ग्रामपंचायतींच्या हद्दीतील मिळकतींवर कर आकारणी करुन वसुली करणे याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

परिपत्रक :-

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम १२४ व त्याअंतर्गत महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६० यांमधील तरतुदींनुसार गावाच्या सीमेतील इमारती (मग त्या कृषी आकारणीस अधीन असोत किंवा नसोत) व जमिनी (ज्या कृषी आकारणीस अधीन नाहीत) यावर ग्रामपंचायतीस कर बसविण्याचा अधिकार आहे. त्यानुषंगाने ग्रामपंचायत हद्दीतील मिळकतींवर विहीत पद्धतीने कर आकारणी करुन कर वसुली करण्याबाबत तसेच, याकरिता करपात्र मिळकतींच्या नोंदी ग्रामपंचायतीकडील नमुना नं. ८ म्हणजेच, कर आकारणी नोंदवहीमध्ये करण्याबाबत तरतूद आहे.

उक्त तरतुदीनुसार ग्रामपंचायत हद्दीतील ज्या इमारतींनी विहीत पद्धतीने बांधकाम परवानगी घेतलेली असो अथवा नसो अशा इमारतींची ग्रामपंचायतीकडील नमुना नं. ८ म्हणजेच, कर आकारणी नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात येऊन विहीत पद्धतीने कर आकारणी करुन कर वसुलीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच, नमुना नं. ८ म्हणजेच कर आकारणी नोंदवहीमध्ये इमारतीची नोंद घेतल्यामुळे अनधिकृत/अतिक्रमित/अवैध इमारती/बांधकाम अधिकृत होत नाही, याची नोंद घ्यावी.

सदर सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांनी त्यांच्या अधिनस्त संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी व ग्रामपंचायती यांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही केली जाईल व विहीत नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१६०७१८११४२१३३६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R Bankar

Digitally signed by Sanjay R Bankar
DN: CN = Sanjay R Bankar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = RDD
Reason: I am approving this document
Date: 2016.07.18 14:08:41 +05'30'

(संजय बनकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. मा. मंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव
५. सर्व विभागीय आयुक्त
६. सर्व सह सचिव/उप सचिव (ग्रामविकास विभाग, मंत्रालय)
७. सर्व उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय
८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
९. सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
१०. सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि/ग्रापं)
११. कक्ष अधिकारी (संग्राम कक्ष) (ग्रा.वि.व ज.सं.वि.) बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई.
१२. कक्ष अधिकारी (माहिती तंत्रज्ञान कक्ष) (ग्रा.वि.व ज.सं.वि.) बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
१३. निवडनस्ती कार्यासन पंरा-४

**(परिशिष्ट ४.५)**

ग्रामीण क्षेत्रातील इमारत बांधकाम परवानगी देण्याबाबत

## महाराष्ट्र शासन
### ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः व्हिपीएम-२०१५/प्र.क्र.३९/पं.रा-४
बांधकाम भवन, २५, मर्झबान मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
तारीख: ११ डिसेंबर, २०१५

वाचा :-

१) महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४३)

२) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम अधिसूचना क्र.व्हिपीएम-२०१५/प्र.क्र.३९/पं.रा-४, दिनांक १६ मे, २०१५

प्रस्तावना :-

महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४३) हा दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार मध्ये प्रसिध्द करण्यात आला आहे. या अधिनियमातील प्रकरण दोन हे (कलम २ ते ४) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील सुधारणांबाबत असून त्याअन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ५२, ५३ व १७६ मध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. सदर करण्यात आलेल्या सुधारणांबाबतचा निर्णय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्याचे शासनाचे विचाराधिन होते.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४३) मधील महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ५२ मध्ये पोट-कलमे (१) आणि (२) याऐवजी पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील:-

(१) ज्या गावाकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदीन्वये प्रारुप प्रादेशिक योजना किंवा अंतिम प्रादेशिक योजना प्रसिध्द करण्यात आली असेल अशा कोणत्याही गावामध्ये, कोणतीही व्यक्ती-

(एक) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१०) च्या अर्थांतर्गत त्या गावाच्या गावठाण क्षेत्रात, विहित रितीने, पंचायतीची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय;

(दोन) त्या गावाच्या इतर क्षेत्रात, जिल्हाधिका-याची किंवा ज्याच्याकडे जिल्हाधिका-याचे अधिकार सोपविण्यात आले असतील अशा, तहसिलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या इतर कोणत्याही अधिका-याची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय,-

कोणतीही इमारत उभारणार नाही किंवा पुन्हा उभारणार नाही अथवा उभारण्यास किंवा पुन्हा उभारण्यास सुरुवात करणार नाही.

(१अ) ज्या गावाकरीता प्रारुप प्रादेशिक योजना किंवा अंतिम प्रादेशिक योजना प्रसिध्द करण्यात आली नसेल अशा गावामध्ये, कोणतीही व्यक्ती, विहित रीतीने पंचायतीची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय, कोणतीही इमारत उभारणार नाही किंवा पुन्हा उभारणार नाही अथवा उभारण्यास किंवा पुन्हा उभारण्यास सुरुवात करणार नाही.

(२) पंचायत समिती स्तरावर पदस्थापित केलेल्या, राज्य शासनाच्या नगर रचना अधिका-याची किंवा, पंचायत समितीच्या स्तरावर असा अधिकारी पदस्थापित करण्यात आला नसेल त्याबाबत जिल्हा परिषद स्तरावरील नगर रचना अधिका-याच्या पुर्व परवानगी घेतल्यानंतरच, पंचायत, या प्रयोजनार्थ केलेल्या अर्जावरुन, पोट-कलम (१) किंवा, यथास्थिती, पोट-कलम (१अ) अन्वये कोणतीही परवानगी देईल.

(२अ) जर पंचायतीने असा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, क़िवा पंचातीकडून तत्संबंधी कोणतीही मागणी करण्यात आल्यास, त्याबाबतीत अर्जदाराकडून उत्तर मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, यापैकी जे नंतर घडेल तेव्हा, तत्संबंधी तिची परवानगी अथवा नकार कळविला नाही तर, उक्त साठ दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीनंतरच्या लगेचच पुढच्या दिवशी अर्जदाराला अशी परवानगी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल:

परंतु, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींना किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये तयार केलेल्या कोणत्याही उपविधींना किंवा विनियमांना अनुसरुन, संबध्द विकास नियंत्रण विनियमांचे किंवा, यथास्थिती प्रारुप अंतिम प्रादेशिक योजनेचे काटेकार पालन करुन कोणतीही इमारत उभारण्यात किंवा पुन्हा उभारण्यात येईल अथवा उभारण्यास किंवा पुन्हा उभारण्यास सुरुवात करण्यात येईल, या शर्तीस अधीन राहून, अशी परवानगी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल:

परंतु, आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकाचे उल्लंघन करुन कोणतीही उभारणी किंवा पुन्हा उभारणी अथवा उभारणीस किंवा पुन्हा उभारणीस सुरुवात ही, अनधिकृत विकासकाम असल्याचे मानण्यात येईल.

(२ब) पोट-कलम (१) किंवा, यथास्थिति, (१अ) खालील शर्तीवर परवानगी देणाऱ्या, किंवा परवानगी नाकारण्याबद्दलच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही अर्जदारास, तिला तो

आदेश कळविल्याच्या दिनांकापासून चाळीस दिवसांच्या आत, जिल्हा परिषद येथे पदस्थापित केलेल्या, नगररचना विभागाच्या जिल्हा प्रमुखाकडे अपील दाखल करता येईल. ते अपील, विहित करण्यात येईल, अशा नमुन्यात असेल आणि त्यासोबत विहित करण्यात येईल अशी न्यायालय-फी भरलेली असेल. अशा जिल्हा प्रमुखास, अपीलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अपील प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत, संमत केलेल्या आदेशाद्वारे, एकतर ते अपील बिनशर्तपणे किंवा त्याला योग्य वाटतील अशा शर्तींना अधीन राहून, मान्य करता येईल अथवा ते अपील फेटाळता येईल. अशा अपिलावरील जिल्हा प्रमुखाचा निर्णय अंतिम असेल आणि तो सर्व संबंधितांवर बंधनकारक असेल.

(२क) कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयामध्ये, आदेशामध्ये किंवा हुकूमनाम्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ याच्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून, महराष्ट्र ग्रामपंचायत (ग्राम क्षेत्रांचा विस्तार) नियम, १९६७ निरसित होतील.

(२ड) महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ याच्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून, या कलमाअन्वये नियम तयार केले जाईपर्यंत, इमारती उभारण्यासाठी किंवा पुन्हा उभारण्यासाठी परवानगी देण्याच्या संबंधात, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २० च्या पोट-कलम (४) अन्वये तयार केलेले महाराष्ट्र प्रादेशिक योजनांच्या संबंधातील प्रमाणीकृत विकास नियंत्रण व प्रवर्तन विनियम लागू असतील.";

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ५२ च्या पोट-कलम (३) मध्ये "पोट-कलम (१) किंवा (२)" या मजकुराऐवजी, " पोट-कलम (१), (अ), (२), (२अ) किंवा (२ब)" हा मजकूर दाखल करण्यात आला आहे.

३. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ५३ मधील, पोट-कलम (१) मध्ये, "गावाच्या सीमेतील" या मजकुराऐवजी "गावाच्या गावठाण क्षेत्राच्या सीमेतील" हा मजकूर दाखल करण्यात आला आहे.

४. वर नमूद करण्यात आलेल्या सुधारणा या दिनांक १५ मे, २०१५ पासून अंमलात आलेल्या आहेत.

५. वरील सुधारणांमधील कलम ५२(२) नुसार पंचायत समिती स्तरावरील नगररचना अधिकारी व कलम ५२ (२ब) नुसार जिल्हा परिषद स्तरावरील नगररचना अधिका-याची नियुक्तीच्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ येथील दिनांक १६ मे, २०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये कलम ५२(२) अन्वये बांधकाम परवानगी देण्याबाबत आवश्यक पुर्व परवानगी घेणे याकरीता पुढील आदेश होईपर्यंत जिल्हास्तरीय

नगर रचना अधिकारी यांची पंचायत समिती स्तरावरील पदसिध्द नगर रचना अधिकारी म्हणून व कलम ५२(२ब) अन्वये अपिल संदर्भात निर्णय घेणेसाठी विभागीय स्तरावरील सह संचालक यांची जिल्हा परिषद स्तरावरील पदसिध्द नगर रचना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२१११२२७१२०४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Girish Dinkar Bhalerao

Digitally signed by Girish Dinkar Bhalerao
DN: CN = Girish Dinkar Bhalerao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Reason: I am approving this document
Date: 2015.12.11 17:38:12 +05'30'

गिरीश भालेराव
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व जिल्हे)

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी प्रस्तुतचा शासन निर्णय आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व पंचायत समिती, ग्रामपंचायती यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

प्रत माहितीसाठी:-

१. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
३. विभागीय आयुक्त, पुणे / कोकण / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर
४. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे
५. सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, सर्व जिल्हे
६. कार्यासन अधिकारी, संगणक कक्ष, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
७. निवडनस्ती (पं.रा-४), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मुंबई.

**(परिशिष्ट ५.१)**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची
राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१५-१६
पासून अंमलबजावणी करणेबाबत.

महाराष्ट्रशासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः शैगुवि २०१५/(८०/१५)एस.डी.६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२
तारीख:२२ जून, २०१५

<u>वाचा -</u>

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९.
२) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम,२०११.
३) शासननिर्णयक्रमांकःपीआरई २०१०/(१३०/१०)/प्राशि-५,दि. २० ऑगस्ट, २०१०
४) शासननिर्णयक्रमांकःसंप्रप २००७/(६५/०७)/प्राशि-५, दि. २६ एप्रिल, २००७.

<u>प्रस्तावना -</u>

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ हा १ एप्रिल, २०१० पासून देशभरात लागू झालेला आहे. त्यामधील प्रकरण २, कलम ३ नुसार, ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क मिळालेला आहे. या कायद्यामुळे शिक्षण प्रक्रियेत अनेक कालसुसंगत बदल होत असून त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे. मात्र काही बदलांबाबत समाजामध्ये गैरसमजही निर्माण झाले आहेत. वयानुरुप इयत्तेत प्रवेश, विद्यार्थ्यास एका वर्षापेक्षा अधिक काळ एका इयत्तेत न ठेवणे, इयत्ता ८ वी पर्यंत कोणत्याही मंडळाची सार्वत्रिक परीक्षा पुढील वर्गात जाण्यासाठी द्यावी न लागणे, सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीचा अवलंब यासारख्या बदलांमुळे शैक्षणिक गुणवत्तेवर विपरित परिणाम होईल असा जनमानसात समज निर्माण झाला आहे. हा समज तातडीने दूर करणे आवश्यक आहे.

एका संस्थेच्या वार्षिक शैक्षणिक सद्यस्थिती सर्वेक्षण अहवालात मागील पाच वर्षात इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेमध्ये ९४ टक्क्यांवरून ७४ टक्क्यावर घसरण झाल्याचे निराशाजनक चित्र दिसून येते. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी घेतलेल्या राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षणामध्ये (SLAS) इयत्ता ५वी च्या विद्यार्थ्यांना भाषा विषयातील सरासरी संपादणूक ५३ टक्के व गणित विषयातील सरासरी संपादणूक ५१ टक्के असल्याचे आढळून आले आहे. या सर्वेक्षणात भाषा विषयात सिंधुदूर्ग जिल्हा सर्वोत्कृष्ट (६७ टक्के) व सर्वात मागे सोलापूर जिल्हा (३४ टक्के) तर गणित या विषयामध्ये सर्वोत्कृष्ट जिल्हा भंडारा (६१ टक्के) व सर्वात मागे औरंगाबाद जिल्हा (३४ टक्के) असल्याचे आढळून आले आहे. या आकडेवारीवरून विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीमध्ये राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मोठया प्रमाणात विषमता असल्याचे स्पष्ट होते. तसेच राज्यातील एकूणच शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता ही चिंतेची बाब आहे हे यावरुन दिसते.

शिक्षण हक्क कायद्यातील कलम २९ (२) (ह) नुसार सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीद्वारे विद्यार्थ्यांच्या ज्ञान, आकलन आणि उपयोजन क्षमतांची पडताळणी करणे आवश्यक आहे. कायद्यातील या अपेक्षा आणि तरतुदी विचारात घेऊन दिनांक २० ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयानुसार राज्यात इयत्ता पहिली ते आठवीसाठी सातत्यपूर्ण सर्वकष मुल्यमापन पध्दती लागू केली आहे. त्यानुसार

शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम / कृती, प्रयोग / प्रात्यक्षिके, प्रकल्प, स्वाध्याय, तोंडी काम, लेखी चाचणी इ. द्वारे विद्यार्थ्यांच्या संपादणुकीची वेळोवेळी पडताळणी शाळास्तरावर करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील अडचणी समजून घेऊन त्या दूर करण्याचे प्रयत्न होत आहेत. अपेक्षित संपादणूक पातळीपेक्षा मागे असलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करुन अपेक्षित संपादणूक पातळीपर्यंत आणण्याचा प्रयत्न आहे.

वाचन, लेखन, संख्याज्ञान आणि संख्यांवरील क्रिया या क्षमतांची संपादणूक, प्रभूत्त्व पातळीकडे जाण्यासाठी आवश्यक ठरते. या मुलभूत क्षमतांची परिपूर्ण तयारी झाल्यास ज्ञानग्रहण आणि आकलनाचा मार्ग सुलभ होतो. त्याकडे दुर्लक्ष झाल्यास शैक्षणिक गुणवत्ता विकासाचा पाया कच्चा राहतो. हे विचारात घेऊन वाचन, लेखन, संख्याज्ञान आणि संख्यांवरील क्रियांमध्ये राज्यात एकसुध्दा मूल अप्रगत राहू नये यासाठी संपूर्ण राज्यात प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पायाभूत संपादणूकीची नियमित पडताळणी करुन शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी गरजाधिष्ठित कृतीकार्यक्रमाची आखणी करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ज्या इयत्तेत बालक शिकत आहे त्या इयत्तेच्या क्षमतांचीही संपादणूक वेळच्या वेळी तपासून व मदत करून अप्रगत विद्यार्थ्यांची संख्या कमी करीत जाणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राज्यामध्ये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

(१) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाचा हेतू-

(१.१) प्रत्येक विद्यार्थ्याने वयोगटानुरुप अपेक्षित क्षमता प्राप्त केली आहे किंवा नाही याची तपासणी शैक्षणिक प्रगती चाचण्यांद्वारे करुन ज्या विषयामध्ये / क्षमतेमध्ये विद्यार्थ्यांना अडचणी असतील त्यासाठी कृतिकार्यक्रम आखून अंमलबजावणी करणे. जेणेकरुन प्रत्येक विद्यार्थी प्रभूत्त्व पातळीकडे वाटचाल करु शकेल.

(१.२) या प्रक्रियेत शिक्षकाला मदत करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे.

(१.३) शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे

(१.४) कार्यक्रमाच्या सुरुवातीची दोन वर्षे इयत्ता पहिली ते आठवीमधील प्रत्येक विद्यार्थ्याची भाषा व गणित या विषयातील क्षमतांच्या संपादणुकीची नियमितपणे पडताळणी करणे व शिक्षकाला आवश्यक सहाय्य करणे.

(१.५) विद्यार्थ्यांच्या अध्ययनास व शिक्षकाच्या सुलभीकरणाच्या भूमिकेस सुयोग्य दिशा देणे

(१.६) वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रेरणा व साहाय्य देणे.

(१.७) या गोष्टी साध्य करण्यासाठी शिक्षणव्यवस्थेतील प्रत्येक घटकाचे सबलीकरण करणे.

## शासननिर्णय -

"प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम" सन २०१५-१६ पासून राज्यात सुरू करण्यात येत असून त्याअंतर्गत राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमाच्या मान्यताप्राप्त शाळांमधून इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रथम भाषा व गणित या विषयाच्या शैक्षणिक प्रगती चाचण्यांचे आयोजन करण्यात येईल. याबाबतच्या कार्यवाहीची रूपरेषा पुढीलप्रमाणे राहील.

(अ) सर्व नियमित विद्यार्थ्यांना किमान अपेक्षित क्षमता अवगत असायलाच हवी. याबाबत सर्व विद्यार्थ्यांच्या क्षमता संपादणूकीची खात्री शैक्षणिक प्रगती चाचणीद्वारे केली जाईल. या क्षमतांमध्ये

एकही मूल अप्रगत राहाणार नाही यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्यासाठी शासन, प्रशासन, शालेय व्यवस्थापन विशेष प्रयत्न करणार असून शिक्षकांनी त्याची मुख्य जबाबदारी घेणे आवश्यक आहे.

(ब) गुणवत्ता तपासणे आणि सुधारणे हा या चाचण्यांचा हेतू आहे.

(क) राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षणामध्ये (SLAS: State Learning Achievement Survey) मुलभूत क्षमतांबरोबर संबंधित इयत्तेच्या अपेक्षित सर्व क्षमतांच्या प्रगतीबाबत तपासणी केली जाईल. या यादृच्छिक (random sample) पद्धतीने होतील.

(ड) जे विद्यार्थी अनियमित असतात त्यांचा शाळेतील नियमित सहभाग शाळा व्यवस्थापन समितीच्या सहभागाने वाढविणे ही शिक्षक व मुख्याध्यापकांची जबाबदारी आहे. नियमित असून अप्रगत असतील अशा विद्यार्थ्यांना संबंधित इयत्तेच्या अखेरीस तक्त्यात निश्चित केलेल्या शैक्षणिक प्रगती चाचणीतील क्षमता येणे अनिवार्य आहे. तसेच सर्वसाधारण व प्रगत विद्यार्थ्यांना संबंधित इयत्तेच्या सर्व क्षमता येणे अपेक्षित असून याबाबतची खातरजमा SLAS मधून तपासली जाईल.

(इ) सन २०१६-१७ च्या संपादणूकीमध्ये तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अपेक्षित वाढ होणे आवश्यक आहे. म्हणजेच या कार्यक्रमाच्या माध्यमातून अप्रगत विद्यार्थी आणि साधारण व प्रगत विद्यार्थी या दोघांच्याही संपादणूकीमध्ये वाढ होणे बंधनकारक आहे.

(फ) सन २०१३-१४ मध्ये इयत्ता पाचवी करिता SLAS हाती घेण्यात आला होता. राज्यात पहिल्यांदाच सर्व इयत्तांसाठी SLAS सन २०१५-१६ पासून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेमार्फत करण्यात येईल. त्यामुळे पुढील तक्त्यात सन २०१५-१६ मध्ये SLAS च्या रकान्यात इयत्ता पाचवी वगळून अन्य इयत्तांसाठी ०पहिले असे नमूद केले आहे. सन २०१५-१६ मध्ये इयत्ता पाचवीमध्ये सन २०१३-१४ च्या तुलनेत ५ टक्के वाढीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे

(२) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची कार्यपध्दती

(२.१) शाळेत दाखल झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांने वयोगटानुरुप अपेक्षित शैक्षणिक क्षमता संपादित केली आहे किंवा नाही याची पडताळणी शैक्षणिक प्रगती चाचणीद्वारे घेण्यात येईल.

(२.२) सुरुवातीची दोन वर्षे प्रथम भाषा व गणित या दोन विषयांच्या चाचण्या घेण्यात येतील.

(२.३) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या मान्यताप्राप्त शाळांतील इ. १ ते ८ च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात तीन राज्यस्तरीय शैक्षणिक प्रगती चाचण्यांचे आयोजन करण्यात येईल. यामध्ये एक पायाभूत चाचणी व सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनामधील संकलित मूल्यमापनाच्या दोन सत्रांत परीक्षा (चाचण्या) अशा एकूण ३ परीक्षा घेण्यात येतील.

(२.४) या व्यतिरिक्त त्रयस्थ संस्थेच्या सहभागाने प्रथम सत्राअखेरीस एक व द्वितीय सत्राअखेरीस एक अशा दोन यादृच्छिक (random sample) चाचण्या निवडक शाळांमध्ये होतील

(२.५) पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापनाच्या दोन सत्रांत परीक्षा व २.४ मध्ये नमूद केलेल्या त्रयस्थ संस्थेच्या सहभागाने घेतल्या जाणाऱ्या चाचण्यांचे आराखडे, आयोजन व अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यामार्फत केली जाईल.

(२.१) सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनामधील (CCE) संकलित मूल्यमापनातील इतर विषयांच्या परीक्षा व आकारिक मूल्यमापनातील सर्व विषयांच्या चाचण्या याबाबतची अंमलबजावणी सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन बाबतच्या दि. २०/८/२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे करण्यात येईल.

(२.७) चाचणी आयोजनाचे वेळापत्रक

| क्रमांक | उपक्रम तपशिल | कालावधी | स्तर |
|---|---|---|---|
| १ | चाचणी विकसन कार्यशाळा (कार्यप्रेरणा प्रशिक्षणाच्या माध्यमातून) | दि. १५ जून पर्यंत | राज्य |
| २ | पथदर्शी चाचणी (निवडक शाळांमध्ये करण्यात येईल) | दि. १६ ते २३ जून दरम्यान | राज्य |
| ३ | चाचणी अंतिमिकरण (पथदर्शी चाचण्यांचे पुनर्विलोकन करून अंतिमीकरण केले जाईल) | दि. २४ जून ते ३ जुलै दरम्यान | राज्य |
| ४ | पर्यवेक्षकीय त्रयस्थ संस्थेचे उद्बोधन | दि. ५ ते १० जुलै दरम्यान | राज्य |
| ५ | शिक्षकांचे उद्बोधन | दि. १२ ते १७ जुलै दरम्यान | तालुका |
| ६ | पायाभूत चाचणी व चाचणीमधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांच्या नोंदी शाळास्तरावर | दि.२० ते ३१ जुलै दरम्यान | शाळा |
| ७ | पायाभूत चाचणीचे निष्कर्ष सर्वांना कळविणे. | दि. १४ ऑगस्ट पर्यंत | राज्य |
| ८ | शिक्षकांनी केंद्रप्रमुखांकडे प्रशिक्षणाची मागणी नोंदविणे. | दि. २१ ऑगस्ट पर्यंत | केंद्र |
| ९ | केंद्रप्रमुख यांनी गटशिक्षणाधिकारी यांचेकडे प्रशिक्षणाची मागणी नोंदविणे. | दि. २६ ऑगस्ट पर्यंत | तालुका |
| १० | आवश्यकतेनुसार प्रशिक्षणाचे आयोजन. (केंद्रप्रमुख, शिक्षक प्रशिक्षक, गट / जिल्हास्तरीय यंत्रणा / डाएट / एस.सी.ई.आर.टी. च्या मदतीने व म.प्रा.शि.प. च्या सहकार्याने) | दि. ०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर दरम्यान | केंद्र / तालुका |
| ११ | संकलित मूल्यमापन १ सत्रांत परीक्षा व त्यामधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांच्या नोंदी शाळास्तरावर | दि. १६ ते ३१ ऑक्टो दरम्यान | शाळा |
| १२ | त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन (चाचणी क्र. २ निवडक शाळांमध्ये) | दि. १६ ते ३१ ऑक्टो दरम्यान | शाळा |
| १३ | संकलित मूल्यमापन २ सत्रांत परीक्षा व त्यामधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांच्या नोंदी शाळास्तरावर | दि. ०१ ते १५ एप्रिल दरम्यान | शाळा |
| १४ | त्रयस्थ संस्थेच्या सहभागाने मूल्यमापन (यादृच्छिक चाचणी निवडक शाळांमध्ये) | दि. ०१ ते १५ एप्रिल दरम्यान | शाळा |

(२.८) परीक्षांचे स्वरुप (बाल शिक्षण हक्क कायद्यात नमूद केलेल्या मूल्यमापन पद्धतीनुसार)-

या चाचण्या बालकांची समज व क्षमता तपासतील. लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक अशा तीनही प्रकाराच्या प्रश्नांचा समावेश चाचणीमध्ये असेल. मूलभूत क्षमता आणि त्या त्या इयत्तेत अपेक्षित असणाऱ्या मुख्य क्षमता यांचा या चाचणीत समावेश असेल. या चाचण्या ग्रेडेड असतील. या तीनही चाचण्यांचे विकसन राज्यस्तरावरुन करण्यात येईल.

(२.८.१) पायाभूत चाचणी

- इयत्ता २ ते ८ च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी चाचणी असेल
- मागील इयत्तेपर्यंतच्या मुलभूत क्षमता व त्या त्या इयत्तेच्या प्रमुख क्षमतेवर आधारित चाचणी असेल.
- इयत्ता २ ते ८ च्या सर्व विद्यार्थ्यांची चाचणीद्वारा स्तरनिश्चिती करुन गुणवत्ता कार्यक्रम आखण्यासाठी शिक्षक, शाळा, केंद्र, तालुका स्तरांवर चाचणीचा उपयोग होईल.

- CCE च्या दि. २०/०८/२०१० च्या शासन निर्णयातील संकलित मूल्यमापनाच्या इयत्तानिहाय भारांशाप्रमाणे चाचणीतील गुण असतील

(२.८.२) संकलित मूल्यमापन १ सत्रांत परीक्षा

- इयत्ता १ ते ८ च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी चाचणी असेल
- मागील इयत्तेपर्यंतच्या मुलभूत क्षमता आणि पहिल्या सत्राखेरपर्यंतच्या क्षमतांचे काही प्रश्न चाचणीत असतील.
- मुलभूत क्षमतेच्या गुणवत्तेत वाढ होत आहे की नाही तसेच प्रथम सत्रापर्यंतच्या क्षमतांमध्ये काही त्रुटी राहील्या आहेत का हे या चाचणीतून समजेल.
- CCE च्या दि. २०/०८/२०१० च्या शासन निर्णयातील संकलित मूल्यमापनाच्या इयत्तानिहाय भारांशाप्रमाणे चाचणीतील गुण असतील

(२.८.३) संकलित मूल्यमापन २ सत्रांत परीक्षा

- इयत्ता १ ते ८ च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी चाचणी असेल
- मुलभूत क्षमता, पहिल्या आणि दुस-या सत्राखेरपर्यंतच्या क्षमतांचे काही प्रश्न चाचणीत असतील.
- मुलभूत क्षमतेच्या आणि संकलित मूल्यमापन १ च्या गुणवत्तेत वाढ होत आहे की नाही तसेच द्वितीय सत्रापर्यंतच्या क्षमतांमध्ये काही त्रुटी राहील्या आहेत का हे या चाचणीतून समजेल.
- CCE च्या दि. २०/०८/२०१० च्या शासन निर्णयातील संकलित मूल्यमापनाच्या इयत्तानिहाय भारांशाप्रमाणे चाचणीतील गुण असतील

३) सन २०१५-१६, २०१६-१७ मध्ये घ्यावयाच्या चाचणी परीक्षांमागील उद्दिष्टे

(१) सन २०१५-१६

| चाचणी | शैक्षणिक प्रगती चाचणी | | SLAS चाचणी | |
|---|---|---|---|---|
| व्याप्ती | १०० टक्के विद्यार्थी | | यादृच्छिक | |
| संपादणूक उद्दिष्टे | | | | |
| इयत्ता | भाषा | गणित | भाषा | गणित |
| पहिली | इयत्ता पहिलीला पायाभूत चाचणी होणार नाही. संकलित १ व २ या चाचण्या अध्ययन अनुभवाचा भाग म्हणून होतील. | | | |
| दुसरी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | पहिले | पहिले |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |
| तिसरी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | संख्याज्ञान बेरीज, वजावाकी - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | पहिले | पहिले |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चौथी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान बेरीज, वजाबाकी - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | पहिले | पहिले |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |
| पाचवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान बेरीज, वजाबाकी, गुणाकार - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | ५८ टक्के | ५५ टक्के |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |
| सहावी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | संख्याज्ञान बेरीज, वजाबाकी, गुणाकार - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | पहिले | पहिले |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |
| सातवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान बेरीज, वजाबाकी, गुणाकार - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | पहिले | पहिले |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |
| आठवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | संख्याज्ञान बेरीज, वजाबाकी, गुणाकार - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | पहिले | पहिले |
| | व इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणूकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |

(२) सन २०१६-१७

| | सर्व नियमित विद्यार्थी | | SLAS | |
|---|---|---|---|---|
| इयत्ता | भाषा | गणित | भाषा | गणित |
| पहिली | इयत्ता पहिलीला पायाभूत चाचणी होणार नाही. संकलित १ व २ या चाचण्या अध्ययन अनुभवाचा भाग म्हणून होतील. | | | |
| दुसरी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान व बेरीज - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६- | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | १७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |
| तिसरी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | संख्याज्ञान,बेरीज व वजाबाकी - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |
| चौथी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार, नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी व गुणाकार - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही . | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | व इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |
| पाचवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ |
| | व इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या रासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकुलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |
| सहावी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सातवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ |
| | व इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | व इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ | | |
| आठवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणूकीत १० टक्के वाढ |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणूकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |

- सन २०१७-१८ पासून राज्यात एक सुध्दा मुल अप्रगत राहाणार नाही. कोणत्या चाचण्या चालू ठेवायच्या याबाबतचा निर्णय तेव्हाच्या परिस्थितीनुसार घेण्यात येईल. तसेच त्यानंतर दरवर्षी SLAS अहवालामध्ये प्रत्येक इयत्तेच्या सरासरी संपादणूकीत ५ टक्के वाढ करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात येत आहे.
- वरील क्षमता संपादणूकीमधून प्रमाणीकृत विशेष गरजा असणा-या मुलांना वगळण्यात येत आहे. फक्त शिक्षकांच्या मनात विशेष गरजा (गतिमंद, अध्ययन अक्षम, इत्यादी) वाटणा-या परंतु योग्य प्राधिकाऱ्याद्वारा प्रमाणित (Certified) न करण्यात आलेल्या मुलांना त्यात गृहित धरले जाणार नाही. तथापि, शिक्षकाला एखाद्या मुलाला प्रमाणित करुन घेणे गरजेचे वाटल्यास त्याविषयी गटशिक्षणाधिकारी यांना कळवावे. जिल्हा प्रशासनाने सर्व शिक्षा अभियानाच्या मदतीने पुढील सहा महिन्यात त्या मुलांना तपासून योग्य तो निर्णय कळवावा. uप्रत्येक बालक त्याच्या क्षमतांच्या जास्तीत जास्त पातळीपर्यंत शिकणे या शिक्षण हक्क कायद्यातील व्याख्येनुसार प्रमाणित विशेष गरजा असणा-या मुलांच्या संपादणुकीचे वेगळे मापदंड शासनाच्या विचाराधीन असून त्यावर स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल. विद्यार्थी गतिमंद व अध्ययन अक्षम असल्यास ते सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे शिकू शकतात हा विश्वास शिक्षकांनी बाळगावा व त्या विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत देऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणावे.

४) चाचण्यांचे विश्लेषण

- पायाभूत चाचणी - A
- संकलित मूल्यमापन १ सत्रांत परीक्षा - A+B
- संकलित मूल्यमापन २ सत्रांत परीक्षा - A+B+C

A मागील इयत्तेपर्यंतच्या मुलभूत क्षमतेवर प्रश्न

B पहिल्या सत्रापर्यंतच्या क्षमतेवर काही प्रश्न

C दुस-या सत्रापर्यंतच्या क्षमतेवर काही प्रश्न

५) त्रयस्थ संस्थेच्या सहभागाने घ्यावयाच्या यादृच्छिक चाचण्या -

- ➢ त्रयस्थ संस्थेच्या सहभागाने तीन चाचण्या घेण्यात येतील. (त्रयस्थ संस्था मूल्यमापन शिक्षक, अधिकारी व त्रयस्थ व्यक्ती)
- ➢ संकलित मूल्यमापन एकच्या वेळेस व संकलित मूल्यमापन दोनच्या वेळेस या चाचण्या यादृच्छिक पध्दतीने निवडलेल्या शाळांमध्ये, यादृच्छिक पध्दतीने निवडलेल्या इयत्तांसाठी व यादृच्छिक पध्दतीने निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या होतील. या विद्यार्थ्यांना ही एकच परीक्षा द्यावी लागेल याची दक्षता घेण्यात येईल.
- ➢ संकलित मूल्यमापन १ सत्रांत परीक्षा व संकलित मूल्यमापन २ सत्रांत परीक्षेच्या प्रश्नपत्रिका या SCERT ने बनवलेल्या असतील
- ➢ त्रयस्थ संस्थेची निवड राज्यस्तरावरुन जाहिरात देऊन करण्यात येईल. चाचणी घेण्यासाठी त्रयस्थ संस्थेमार्फत जाणाऱ्या व्यक्ती या शासनाने दिलेल्या निकषांनुसार असणे आवश्यक आहे. त्रयस्थ संस्था राज्याने विकसित केलेली चाचणी वापरेल.

६) त्रयस्थ संस्था, शिक्षक व अधिकारी अशांनी घेतलेल्या त्रिपक्षीय यादृच्छिक चाचणीचे महत्त्व या चाचण्यांचा उपयोग राज्यातील प्रत्येक बालक प्रगती करीत आहे किंवा नाही ते पाहण्यासाठी, आवश्यकता जोखून गुणवत्ता कार्यक्रम आखण्यासाठी, तसेच व्यवस्थेचे मूल्यमापन करीत राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी होणे अपेक्षित आहे. शिक्षक, अधिकारी व समाज हे या प्रक्रियेतील महत्त्वाचे घटक आहेत. या चाचण्या प्रामाणिकपणे घेतल्या जाणे, माहितीचे संकलन व विश्लेषण काटेकोरपणे होणे आणि चाचण्यांमधील निष्पत्तीचा शिक्षक-अधिकारी-समाज या सर्वांकडून संपूर्ण स्वीकार होणे त्यासाठी आवश्यक आहे. या तीनही घटकांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन काम केले तरच हे शक्य आहे. त्यासाठी त्रिपक्षीय टीमद्वारे यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या शाळांमध्ये मूल्यमापन करणे, त्यातील माहितीचे विविध पद्धतीने विश्लेषण करणे आणि त्याआधारे धोरणे व कार्यक्रम याबाबतचे निर्णय घेणे आवश्यक आहे. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विविध स्तरांवरील प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि महानगरपालिका आयुक्त यांच्यापैकी ज्यांना यात सहभागी व्हायचे असेल असे सर्वजण त्यांच्या उपलब्धतेनुसार या प्रक्रियेतील अधिकारी या घटकामध्ये सहभागी होतील. त्यामुळे सर्वांना प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळण्यास तसेच समस्यांचे वेळच्या वेळी निराकरण होण्यास मदत होईल.

७) चाचणी घेतल्यानंतर करावयाची कार्यवाही

(७.१) पायाभूत चाचणी व संकलित मूल्यमापनाच्या दोन सत्रांत परीक्षा घेणे व उत्तरपत्रिका तपासण्याची जबाबदारी शिक्षकांची राहील

(७.२) चाचणीतील विद्यार्थी प्रतिसादाचे संगणकीकरण करण्यासाठी राज्यस्तरावरुन संगणक प्रणाली विकसित करण्यात येईल. त्यामध्ये राज्यस्तरावरील विश्लेषणासाठी विद्यार्थीनिहाय आणि विषयनिहाय एकूण गुणांची नोंद शिक्षक करतील.

(७.३) शाळा व केंद्र पातळीवर नोंदी केल्यास विद्यार्थी कोणत्या क्षमतेमध्ये मागे आहे ते समजेल. त्यानुसार जे विद्यार्थी क्षमतेत मागे आहेत त्यांच्यासाठी विषयनिहाय क्षमतानिहाय कृतिकार्यक्रम तयार करुन त्यांना अपेक्षित संपादणूक पातळीपर्यंत आणता येईल

(७.४) चाचणीचा इयत्तानिहाय विषयनिहाय दर्जा निश्चित करणे यासाठी पुढील सूत्र वापरावे

$$\text{शेकडा पातळी} = \frac{(\text{सर्व विद्यार्थ्यांच्या गुणांची बेरीज} \times १००)}{(\text{पटसंख्या} \times \text{चाचणीचे कमाल गुण})}$$

(७.५) सर्व वर्गांच्या शेकडा प्रमाणानुसार शाळेचे विषयनिहाय शेकडा प्रमाण काढावे.

$$\text{शाळेचे शेकडा प्रमाण} = \frac{(\text{सर्व विद्यार्थ्यांच्या गुणांची बेरीज} \times १००)}{(\text{पटसंख्या} \times \text{चाचणीचे कमाल गुण})}$$

(७.६) विषयनिहाय शेकडा प्रमाणाची सरासरी काढून शाळेचा एकत्रित दर्जा निश्चित करावा.

(७.७) शाळेच्या शेकडा प्रमाणानुसार शाळेला खालीलप्रमाणे गुणवत्ता श्रेणी द्यावी...

- ८१ ते १०० टक्के - अ
  ४१ ते ६० टक्के - क
  ० ते ४० टक्के - ड

वरील श्रेणी ही माझी समृध्द शाळा किंवा ग्राम विकास विभागाने दिलेल्या मूल्यमापन साधनापेक्षा वेगळी श्रेणी आहे हे लक्षात घ्यावे.

$$(७.८)\text{केंद्राचे शेकडा प्रमाण} = \frac{\text{केंद्रातील सर्व शाळांच्या सरासरी शेकडा प्रमाणाची बेरीज}}{\text{एकूण शाळांची संख्या}}$$

(७.९) केंद्राच्या शेकडा प्रमाणानुसार केंद्राला मुद्दा क्र. ४.७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे श्रेणी द्यावी.

$$(७.१०)\text{गटाचे शेकडा प्रमाण} = \frac{\text{गटातील सर्व शाळांच्या सरासरी शेकडा प्रमाणाची बेरीज}}{\text{एकूण शाळांची संख्या}}$$

(७.११) गटाच्या शेकडा प्रमाणानुसार गटाला मुद्दा क्र. ४.७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे श्रेणी द्यावी. (जिल्ह्याची आणि राज्याची शेकडा पातळीसुद्धा काढावी)

८) अहवाल संकलन

राज्यस्तरावर दोन प्रकारचे अहवाल संकलित केले जातील. १) निष्पत्ती अहवाल २) प्रक्रिया अहवाल

(८.१) निष्पती अहवाल - प्रत्येक चाचणी अंती मुलांचे गुण संगणकात भरण्यापलिकडे शिक्षकांना अन्य कोणतेही अहवाल द्यावे लागणार नाहीत याची काळजी घेतली जात आहे. निष्पत्ती अहवाल पूर्णपणे एससीईआरटीद्वारा तयार होत असलेल्या आज्ञावलीतून तयार होणार आहे. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश राहील.

(८.१.१) राज्यात एकूण विद्यार्थी, चाचणीत सहभागी विद्यार्थी, त्यात ४० टक्के पेक्षा कमी गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांची संख्या

(८.१.२) राज्यात गुणवत्ता श्रेणीनिहाय शाळांची संख्या

(८.१.३) राज्यात गुणवत्ताश्रेणीनिहाय केंद्र व गटांची संख्या

(८.१.४) जिल्हानिहाय U-DISE गुणवत्ता श्रेणीतील केंद्र आणि गटांची संख्या व गटांची नावे

(८.१.५) अप्रगत विद्यार्थी विहिन शाळा संख्या

(८.१.६) वरीलप्रमाणे अहवाल प्रत्येक चाचणीअंती एका महिन्याच्या आत शासनास सादर करण्यात यावा.

प्रक्रिया अहवाल - हा अहवाल मासिक स्वरुपाचा असेल. हा अहवालसुध्दा एससीईआरटीने शासनास सादर करावयाचा आहे. यात खालील बाबींचा समावेश असावा.

गुणवत्ता कक्षांची बैठक -

- जिल्हा गुणवत्ता कक्ष - ३६ पैकी झालेली बैठक संख्या
- तालुका (गट / शहर साधन केंद्र) गुणवत्ता कक्ष u ४०८ पैकी झालेली बैठक संख्या
- महानगरपालिका गुणवत्ता कक्ष u २३ पैकी झालेली बैठक संख्या

मागील तीन महिन्यात न झालेल्या गुणवत्ता कक्षांच्या बैठका -

- जिल्हा गुणवत्ता कक्ष - संख्या व नावे
- तालुका गुणवत्ता कक्ष - जिल्हानिहाय संख्या व नावे
- महानगरपालिका गुणवत्ता कक्ष - संख्या व नावे

शिक्षकांद्वारे प्रशिक्षणाची मागणी - जिल्हानिहाय प्रशिक्षणाची मागणी करणा-या शिक्षकांची संख्या, मागणीप्रमाणे प्रशिक्षण दिलेल्या शिक्षकांची संख्या, प्रशिक्षणाने समाधानित झालेल्या शिक्षकांची संख्या.

यामध्ये डाएट / एससीईआरटी इत्यादींनी मागणी नसताना काही प्रशिक्षण घेतले असल्यास ते यात गृहीत धरु नये.

अधिकाऱ्यांद्वारे प्रशिक्षणाची मागणी - जिल्हानिहाय प्रशिक्षणाची मागणी करणा-या अधिका-यांची संख्या, मागणीप्रमाणे प्रशिक्षण दिलेल्या अधिकाऱ्यांची संख्या, प्रशिक्षणाने समाधानित झालेल्या अधिकाऱ्यांची संख्या, यामध्ये डाएट / एससीईआरटी यांनी मागणी नसताना काही प्रशिक्षणे घेतले असल्यास ते यात गृहीत धरु नये

डिजीटल शाळा करण्याचे लक्ष्य – जिल्हा परिषदा व महानगरपालिका यांनी केलेल्या डिजीटल शाळांची संख्या

कार्पोरेट/स्वयंसेवी संस्थांनी दत्तक घेतलेल्या शाळांची संख्या जिल्हा परिषदा व महानगरपालिका निहाय एकूण शाळांपैकी दत्तक घेतलेल्या शाळांची संख्या.

Activity Based Learning (ABL) शाळा करण्याचे लक्ष्य – जिल्हा परिषदा व महानगरपालिका यांनी केलेल्या ABL शाळांची संख्या

ISO ९००० शाळा करण्याचे लक्ष्य – जिल्हा परिषदा व महानगरपालिका यांनी ISO ९००० केलेल्या शाळांची संख्या.

याशिवाय प्रत्येक जिल्ह्याने केलेल्या गुणवत्ता विकासाच्या कामाबाबत दर महिन्याला साधारण १०० शब्दांत माहिती द्यावी

(८.२.१०) विभागातील प्रत्येक संचालनालयातील गुणवत्ता कक्षांनी मागील महिन्यात केलेल्या कार्याचा अहवाल एससीईआरटीमार्फत द्यावी.

(८.२.११) एससीईआरटीने मागील महिन्यात स्वत: केलेल्या कामाचा अहवाल द्यावा.

शिक्षण हक्क कायद्याच्या अनुषंगाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेतील व्याख्या (ज) नुसार मूल्यमापनन याचा अर्थ, विद्यार्थ्यांच्या बाबतीतील अर्थ, विद्याविषयक प्राधिकरणाने विहित केलेल्या मानक दर्जानुसार त्यांच्या नैपुण्याची पातळी ठरविणे असा आहे आणि संस्था व विविध पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्ती यांच्या बाबतीतील अर्थ, त्या प्रभारी असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सरासरी नैपुण्य पातळीसह त्यांच्या कार्यक्षमतेची पातळी ठरविणे, असा आहे.

यानुसार आपापल्या कार्यक्षेत्रातील शाळांची गुणवत्ता सुधारणे ही अधिकाऱ्यांची जबाबदारी राहील. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेत त्यांचा सुलभकाच्या भूमिकेत सक्रिय सहभाग असणे अपेक्षित आहे.

## १०) विद्यार्थ्यांच्या क्षमता संपादणूकीसाठी कृती कार्यक्रमाची आखणी

(१०.१) प्रत्येक विद्यार्थीनिहाय वयोगटानुसार प्रत्येक विषयनिहाय क्षमता संपादणूकीसाठी शिक्षकाने कृतीकार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करावयाची आहे. ४० टक्के पेक्षा कमी गुण असणा-या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक मूल शिकेल या उद्देशाने आधुनिक अध्ययन-अध्यापन पद्धतीवर आधारित विशेष कृती कार्यक्रम विकसित करावयाचा आहे.

(१०.२) एखाद्या वर्गात ४० टक्के पेक्षा अधिक विद्यार्थी एखाद्या विषयामध्ये अप्रगत (४० टक्के पेक्षा कमी गुण मिळवणारे) असतील तर त्या शिक्षकाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर स्वयंअध्यनाचा कृती कार्यक्रम तयार करून द्यावा. शिक्षकास सदरहू विषयामध्ये प्रशिक्षणाची गरज असल्यास तशी मागणी त्याने केंद्रप्रमुखांकडे नोंदवावी.

(१०.३) या शासन निर्णयामध्ये सुरूवातीस दिलेल्या क्षमता संपादणूकीचे उद्दिष्ट पहाता, प्रत्येक वर्गात अप्रगत, साधारण आणि प्रगत या तीन स्तरावरच्या मुलांना शिकण्यास प्रवृत्त करावयाचे आहे. राज्यातील सर्व शिक्षक प्रशिक्षित असल्यामुळे त्यांना अशा परिस्थितीत बहुवर्ग / बहुस्तर अध्यापन करावे लागते हे ज्ञात आहे. तसेच बालमानसशास्त्रीयदृष्टया त्यांना हे ही ज्ञात आहे की, प्रत्येक मूल स्वतःच्या गतीने शिकते. वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते म्हणून सर्व शिक्षकांनी बहुवर्ग / बहुस्तर अध्यापन तंत्रामध्ये पारंगत होण्यासाठी त्याची उजळणी करुन घ्यावी

शिक्षणामध्ये बोलीभाषा विषयक प्रयोग ८ राज्यामध्ये साधारण ६० वेगवेगळ्या बोली भाषांचा उपयोग होतो. प्रमाण मराठी भाषेखेरीज इतर भाषा बोलणाऱ्या मुलांना शिकण्यात अडचणी निर्माण होतात. बरेचसे शिक्षक या अडचणींतून मार्ग काढतात. मुलांच्या भाषेतील शब्द शिकून व वापरून काही शिक्षक मुलांच्या बोलीभाषेचा आदर करतात, काही शिक्षक द्विभाषिक शब्दकोष तयार करतात, व यासारख्या अन्य मार्गांनी मुलांशी जवळीक निर्माण करतात आणि मग मुले शिकायला लागतात. इतर मातृभाषांची, बोली भाषांची, परिसर भाषांची मुले वर्गात आढळल्यास शिक्षकांनी स्वतःहून मार्ग शोधावा. इतर राज्यांच्या सीमेवरील जिल्ह्यांमध्ये बोलल्या जाणाऱ्या इतर प्रमाण भाषांचा समावेश या साठ भाषांमध्ये नाही. कानडी द्विभाषिक असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये यावर काही काम सुरू झाले आहे. त्याचप्रमाणे राज्यातील आदिवासी क्षेत्रात बोलल्या जाणाऱ्या १६ परिसर भाषांमध्ये मुलांच्या वाचनासाठी द्विभाषिक पुस्तके तयार केली जात असून ती त्या त्या भागातील सर्व शाळांना पुरविली जाणार आहेत. द्विभाषिक किंवा बहुभाषिक वर्गव्यवस्थापनासाठी ब्ल्यू प्रिंट तयार करणे शक्य आहे. शिक्षकांनी तशी मागणी नोंदवल्यास राज्य पातळीवरून ते तयार करून पुरविले जाईल.

(१०.५) प्रत्येक शाळेतील शिक्षकांनी संघ भावनेतून कार्य करावयाचे आहे. एखादा शिक्षक अध्ययन अध्यापनात कमकुवत राहिल्यास पूर्ण शाळेची गुणवत्ता खालावते. तेव्हा अशा

शिक्षकांची नावे जाहीर न करता शाळेची गुणवत्ता राखली जाईल याची काळजी घ्यावी. तसेच, संबंधित शिक्षकांनी लक्षात घ्यावे की इतर व्यक्तींकडून शिकण्याची पहिली पायरी सर्वात जवळ उपलब्ध असलेल्या व्यक्तीकडून असते. त्यामुळे कोणतीही अडचण भासल्यास शाळेतीलच एखाद्या शिक्षकाकडून शिकण्यास प्राधान्य द्यावे. याने संघ भावना व एकोपा निर्माण होईल आणि शाळेची गुणवत्तासुद्धा सुधारेल.

११) शिक्षकांना सहाय्यभूत प्रशिक्षण कार्यकृती

(११.१) केंद्रप्रमुखांनी प्रत्येक वर्ग आणि विषयांमध्ये एकसुद्धा अप्रगत विद्यार्थी राहणार नाही याकरीता शिक्षकांद्वारे विकसित करण्यात येत असलेला कृती कार्यक्रम तयार करण्यास मदत करावयाची आहे. तसेच शिक्षकांनी प्रशिक्षणाची मागणी केल्यास तसे प्रशिक्षण स्वत:च्या पातळीवर शिक्षक प्रशिक्षकांद्वारा उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. असे प्रशिक्षण स्वत:च्या पातळीवर आयोजित करणे शक्य न झाल्यास त्याची मागणी गटशिक्षणाधिकारी यांचेकडे करावयाची आहे

(११.२) राज्यात काही ठिकाणी ज्ञानरचनावादास धरुन बहुवर्ग / बहुस्तर अध्यापन करण्याचे उत्कृष्ट उदाहरणे आहेत. अशा ठिकाणी एकसुद्धा अप्रगत विद्यार्थी नाही. त्याचप्रमाणे प्रगत विद्यार्थीसुध्दा अधिक प्रगती करीत आहेत या अप्रगत विद्यार्थ्यांना पुढे घेऊन जात असताना प्रगत विद्यार्थी दुर्लक्षिले जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. राज्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी यांना अशा शाळांचा अभ्यासदौरा तथा कार्यप्रेरणा प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच केंद्रप्रमुखांनाही जिल्हास्तरावर अशाच पद्धतीचे कार्यप्रेरणा प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे. इतरांना असेच प्रशिक्षण घ्यावे असे वाटल्यास त्यांनी तसे नियोजन करावे. शासनाकडून काही मदत हवी असल्यास त्याची मागणी जिल्ह्यातील गुणवत्ता कक्षामार्फत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे (एससीईआरटी) यांचेकडे नोंदवावी.

(११.३) गटातील सर्व शिक्षक सर्व विषयाच्या विषयज्ञानात, अध्यापन पद्धतीत व बालमानसशास्त्रात सक्षम राहतील ही जबाबदारी गटशिक्षणाधिका-यांची आहे. यापैकी कोणत्याही बाबतीत शिक्षक / केंद्रप्रमुखाकडून प्रशिक्षणाची मागणी आल्यास त्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी गटशिक्षणाधिकारी यांची राहील. हे प्रशिक्षण त्यांनी शिक्षणाधिकारी आणि डाएट / एससीईआरटी / सक्षम अशासकीय संस्था यांच्या मदतीने घेता येईल.

(११.४) शिक्षकांना समृद्ध करण्यासाठी त्यांच्या मागणीनुसार प्रशिक्षण देण्यात येणार आहे. एखाद्या केंद्रातील, तालुक्यातील काही शिक्षक ज्या बाबींचे प्रशिक्षण मागतील त्या बाबतीत तेथे प्रशिक्षणे आयोजित होतील.

(११.५) गटशिक्षणाधिकारी / डाएट / एससीईआरटी यांनी प्राप्त मागणीप्रमाणे प्रशिक्षणाचा आराखडा तयार करावयाचा आहे. त्याकरिता कोणत्या प्रकारच्या प्रशिक्षणाची मागणी येऊ शकते याचा अंदाज घेऊन आगाऊ तयारी करणे योग्य राहील. इंटरनेटवर बरेचसे ओपन सोर्सेस, वाचन साहित्य, व्हिडीओ क्लिप, ॲक्टिव्हिटीज उपलब्ध आहेत. राज्यातील ब-याच स्वयंसेवी संस्थांनीसुद्धा असेच भरपूर साहित्य संकेत स्थळांवर उपलब्ध करुन दिले आहे. त्या सर्वांची लिंक डाएट / एससीईआरटी यांनी स्वत:च्या वेबसाईटवर उपलब्ध करून द्यावी. त्याशिवाय शिक्षक / अधिकारी / डाएट / एससीईआरटी यांनी स्वत:हून आवश्यक व्हिडीओ / साहित्य तयार करून व्हाट्सॲप / वेबसाईटच्या माध्यमातून प्रसारित करावेत. यासाठी एससीईआरटी पातळीवर तंत्रस्नेही शिक्षक आणि संस्थांचा एक कार्यगट तयार केला जाणार असून त्यासाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल

१२) नवोपक्रम शाळांमधून उत्कृष्ट प्रशिक्षक

(१२.१) सन २०१५-१६ मध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत नवोपक्रमामध्ये प्रत्येक केंद्रपातळीवर एका शाळेची निवड करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने दि. २१ एप्रिल, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्या शाळेतून एका उपक्रमशील शिक्षकास गणित व भाषेसाठी प्रशिक्षक म्हणून तयार करावयाचे आहे. या माध्यमातून राज्यास उत्कृष्ट प्रशिक्षक मिळतील.

(१२.२) याप्रकारे निवडलेल्या शिक्षकांना प्रगल्भ करण्यासाठी एससीईआरटी पातळीवर विस्तृत योजना आखण्यात यावी व त्यास राज्यशासनाची मंजूरी घ्यावी.

(१२.३) याप्रकारे राज्यभरामध्ये तयार झालेल्या वेगवेगळ्या विषयांच्या प्रशिक्षकांची यादी एससीईआरटीच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावी. जेणेकरून केंद्र, गट व जिल्हा पातळीवर प्रशिक्षण आयोजित करताना पुरेसे प्रशिक्षक उपलब्ध होतील. प्रशिक्षकांची यादी अंतिम करण्यापूर्वी व प्रशिक्षकाचे नाव यादीमध्ये समाविष्ट करण्यापूर्वी प्रत्येक प्रशिक्षकाचे निवडीच्या पुरेशा कारणासह प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा.

१३) पर्यवेक्षण / सुलभीकरण / Mentoring

(१३.१) मुलांना शिकवण्याची पूर्ण जबाबदारी शिक्षकांची असल्याने वर्गामध्ये शिकविण्याची पद्धत, साहित्याचा वापर इ. बद्दल शिक्षकास संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात येईल.

(१३.२) सद्यस्थितीत सर्वसाधारणपणे ज्याला पर्यवेक्षण संबोधले जाते त्याचे किमान आठ प्रकार असू शकतात ते म्हणजे : १) तपासणी २) सनियंत्रण ३) पर्यवेक्षण ४) मार्गदर्शन ५) मदत ६) समुपदेशन ७) सुलभीकरण ८) मेंटरींग या प्रत्येकाचे वेगवेगळे अर्थ आहेत. याविषयी सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणेला MoT

(Management of Training) चे प्रशिक्षण दिले जाईल. पर्यवेक्षकीय यंत्रणेनी यातले शेवटचे चार प्रकार वापरावेत. सुरूवातीचे चार प्रकार गुणवत्तावाढीस फारसे पोषक नाहीत.

(१३.३) मुलांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांची गुणवत्ता तपासावी. शिक्षकांनी तयार केलेली कागदपत्रे त्यांच्या स्वत:च्या मदतीसाठी असतात. फक्त त्या कागदपत्रांवर अवलंबून राहू नये. मुलांना प्रश्न विचारताना ते बालमानसशास्त्रीयदृष्ट्या योग्य पद्धतीने विचारावेत. एखादे मुल प्रश्नाचे उत्तर देण्यास असमर्थ असेल असे त्याच्या देहबोलीवरुन कळत असल्यास अशा मुलांना अवघड प्रश्न विचारू नयेत. तरीसुद्धा अवघड प्रश्न विचारल्यास आणि त्याला प्रश्नाचे उत्तर न जमल्यास मुलाची गळती होण्याची शक्यता आहे. त्यांना सोपा प्रश्न विचारून, यशाचा आनंद देऊन, त्यांचा आत्मविश्वास वाढवता येतो.

(१३.४) वर्गाध्यापन करताना शिक्षकांनी अप्रगत, साधारण आणि प्रगत अशा तीनही प्रकारच्या विद्यार्थ्यांकडे योग्य प्रमाणात लक्ष द्यावयाचे आहे. ते करीत असताना एकाच शैक्षणिक साहित्याचा वापर करून शिकविणे शक्य नाही हे प्रकर्षाने लक्षात ठेवावे.

(१३.१) प्रत्येक मूल स्वत:च्या गतीने शिकते, त्यामुळे प्रत्येक मुलाबद्दलचे नियोजन दररोज बदलणार आहे. त्यामुळे मासिक, त्रैमासिक, सहामाही, वार्षिक नियोजनासारख्या ढोबळ कागदपत्रावर अनाठायी भर देऊ नये. अशा प्रकारची कागदपत्रे ठेवण्याबद्दल शिक्षकांना स्वातंत्र्य द्यावे. मात्र शिक्षकांना वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याचे विषयज्ञान, समज, आवडी-निवडी, कल या बालमानसशास्त्रीय बाबी (प्रत्येकी किमान पाच) आणि त्या मुलाच्या अध्ययनाच्या दृष्टीने त्यांचा उपयोग माहित असावयास हवा. सदरच्या बाबी शिक्षकास माहित असल्याबद्दलची खात्री पर्यवेक्षीय यंत्रणेने मूल आणि शिक्षकाशी संवाद साधून करून घ्यावी. त्यासाठी कोणत्याही कागदपत्राची मागणी शिक्षकांकडे करू नये.

(१३.२) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दती वापरात असल्यामुळे सत्राच्या निकालाची पडताळणी फक्त कागदपत्रे तपासून शक्य नाही. त्यामुळे सत्राअखेरच्या निकालास मान्यता देण्याची प्रथा बंद करण्यात यावी.

१४) प्रशासकीय व व्यवस्थापकीय मदत -

(१४.१) मुलांना शिक्षकच शिकविणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे शिक्षकांना मुलांसोबत पुरेसा वेळ मिळावा ही प्रशासन / व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. तसेच शिक्षकांमध्ये अध्ययन अध्यापन कौशल्ये निर्माण करणे व त्यांना पुरेसे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे हीसुद्धा प्रशासन / व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. शासनाकडून सर्व शिक्षा अभियानांतर्गत सर्व शाळांना यापूर्वी विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आले आहे. सातारा जिल्ह्यातील कुमठे बीट मधील ४० पैकी ३९ शाळा या साहित्याचा सृजनात्मक पद्धतीने वापर करून आणि त्यात थोडी भर घालून काम करीत आहेत. त्यामुळे या शाळांमध्ये एकही विद्यार्थी अप्रगत नाही. तसेच प्रगत आणि साधारण विद्यार्थीसुद्धा प्रगती करत आहेत. यावरून शासनाचे असे मत आहे की, शाळांना अतिरिक्त साहित्य पुरविले नाही तरीही तीनही गटातील विद्यार्थ्यांची प्रगती करत असताना अप्रगत विद्यार्थी विहीन शाळा निर्माण करणे शक्य आहे.

(१४.२) सध्या राज्यामध्ये डिजिटल शाळा तयार करण्याची एक लाट दिसून येते. प्रेरित शिक्षकांकडून लोकसहभागातून मोठ्या प्रमाणावर हे घडत आहे. यात Corporate Social Responsibility (CSR) अंतर्गत बराच सहभाग मिळत आहे. शासनसुद्धा राज्यनिधीला लोकसहभागाची

जोड देऊन आगामी २-३ वर्षात राज्यातील सर्व शाळा डिजिटल होतील अशी योजना आखत आहे. ब-याच जिल्हा परिषदांनीसुद्धा याबाबतीत स्वत:चे लक्ष्य ठरविले आहे.

(१४.२.१) डिजिटल शाळा चळवळ: राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना राज्य शासन शैक्षणिक व प्रशासकीय कामासाठी Tablet उपलब्ध करून देणार आहे. या सर्व शाळांनी लोकसहभागा मधून LCD Projector/ मोठा TV Screen उपलब्ध करून घेतल्यास अशी शाळा डिजिटल शाळा म्हणून काम करण्यास तयार होईल. ज्या शाळा लोकसहभागा मधून LCD Projector/ मोठा TV Screen उपलब्ध करून घेतील अश्या शाळांना शासनाकडून प्रोत्साहनात्मक आणखी एक Tablet उपलब्ध करून दिला जाईल.

(१४.२.२) राज्य शासन जवळपास १७०० केंद्र शाळांमध्ये इंटरनेट सुविधांसह मोठा TV Screen प्रथम टप्यात सर्व शिक्षा अभियान अंतर्गत उपलब्ध करून देत आहे. त्याचा वापर ऑनलाइन व ऑफलाईन पध्दतीने करता येणार आहे. त्यामध्ये भरपूर शैक्षणिक अप्लीकेशन असणार आहेत. या सुविधांचा वापर शैक्षणिक व प्रशासकीय कामासाठी करण्यात येईल.

(१४.२.३)राज्यात ग्रामीण व शहरी भागात ४०८ गट /शहर साधन केंद्र सुरु आहेत. त्या सर्व ठिकाणी पूर्णवेळ इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. तसेच ८००० माध्यमिक शाळांमध्ये ICT चे केंद्र असून त्याठिकाणीही इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे चाचण्यांची माहिती भरणे, विविध डाटा बेस मध्ये माहिती या ठिकाणावरून भरता येईल.

(१४.२.४) आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात पुष्कळ शैक्षणिक ई-साहित्य विविध संकेतस्थळावर उपलब्ध आहे. यामध्ये भारत सरकारच्या www.nroer.gov.in, www.ncert.org इत्यादी वेबसाइटस आहेत. हे ज्ञान सर्वांसाठी खुले असले पाहिजे या तत्त्वाने काम करणाऱ्या काही संस्थांचे साहित्य (शिक्षक व बालकांसाठी उपयोगी) त्यांच्या वेबसाइटवर मोफत उपलब्ध आहे. शासनासोबत ज्यांनी काम केलेले आहे किंवा करीत आहेत अशा संस्थांच्या बेवसाईटसची माहिती येथे दिलेली आहे. शासनाने जाहिरात देऊन इतर संस्थांना निमंत्रित केले आहे. त्यापैकी ज्यांच्या अशा उपयुक्त वेबसाइट असतील त्यांची माहिती नंतर पुन्हा देण्यात येईल.

खाजगी/स्वयंसेवी क्षेत्रातील www.khanacademy.org, www.ceque.org, www.navnirmitilearning.org, www.quest.org.in, www.arvindguptatoys.com, www.pragatshikshansanstha.org,www.palakneeti.org,www.rayatshikshan.edu इत्यादीचा समावेश यात आहे. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट २ पहावे). सातारा जिल्ह्यातील कुमठे बीट मधील शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या उपक्रमावर आधारित शैक्षणिक विडीओ यु-ट्युबवर पुढील लिंक वर उपलब्ध आहेत. www.youtube.com/watch?v=oPMoM५LXwjk, www.youtube.com/watch?v=eTBkiMvt६६o, www.youtube.com/watch?v=u२ddvG-३Ano, www.youtube.com/watch?v=p४YfRMftK८M. या सर्व संकेतस्थळाच्या व यु-ट्युबच्या शैक्षणिक उपयोगाच्याद्दष्टीने लिंक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी तंत्रस्नेही शिक्षकांचा एक गट महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथे स्थापित करण्यात येईल. याबाबतचा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

(१४.३) मुलांना स्वतःच्या गतीने शिकण्यासाठी Activity Based Learning (ABL) ही उत्तम पद्धती पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यामध्ये चांगली रुजली आहे. राज्यस्तरावर प्राप्त माहितीप्रमाणे ती वेगवेगळया जिल्हयांमध्ये पुढीलप्रमाणे पसरत आहे.

(१४.३.१) ठाणे जिल्हा परिषदेच्या मदतीने सर्व वर्ग १ ते ४ च्या शाळा.

(१४.३.२) पुणे जिल्ह्यतील इंदापूर आणि पुरंदर गटातील शाळा.

(१४.३.३) विदर्भ वैधानिक विकास महामंडळाच्या वतीने विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यातील २५ शाळा.

(१४.३.४) गोंदिया जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून रु. १४ लाखाचा वापर.

१४.३.५) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून रु. ७५ लाखाचा वापर करून १६६ शाळा

(१४.४)- मागील वर्षी वाचन, लेखन व गणित विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी झाली आहे. याचे परिणाम स्वरुप प्रकट वाचन करू शकणाऱ्या मुलांच्या संख्येत १५% नी वाढ झालेली दिसते तर समजपूर्वक वाचन, स्वलेखन आणि श्रुतलेखन या भाषा अध्ययनाच्या क्षमतांमध्ये १७% ते २०% नी वाढ झाली आहे. गणिताच्या मुलभूत क्षमतांमध्ये संख्या ओळख असणाऱ्या मुलांच्या संख्येत १७% ते २०% वाढ झालेली दिसते तर संख्यांवरील क्रिया म्हणजे बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार सोडवू शकणाऱ्या मुलांच्या संख्येत १०% ते १५ % नी वाढ झाली आहे.

(१४.५) राज्यातील ब-याच शाळा ISO ९००० प्रमाणित आहेत. पुणे व औरंगाबाद जिल्ह्यात सर्वाधिक शाळा ISO ९००० प्रमाणित झाल्या असून गडचिरोली जिल्ह्यातसुद्धा एक शाळा ISO ९००० प्रमाणित झाली आहे. ISO ९००० शाळेसाठी दाखला मिळविणे खर्चिक बाब आहे. परंतु स्वखर्चातून करण्यात येत असलेल्या प्रयत्नांना शासनाचा पाठिंबा राहील. कारण यामुळे शाळेतील शिक्षकांना काम करण्याचे एक लक्ष्य प्राप्त होते व ते प्रेरित होतात.

(१४.६) चंद्रपूर आणि पालघर मधील जिल्हा परिषदांनी क्रियाशील शिक्षक व अधिका-यांची निवड करून त्यांच्या मदतीने इतर शिक्षकांच्या मदतीकरीता त्यांच्या गरजांचा शोध घेतला आहे. पुणे महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या नेतृत्वाखाली कार्पोरेट्स आणि स्वयंसेवी संस्था मिळून शिक्षकांना सतत मदतीची व्यवस्था उपलब्ध करून देत आहेत.

(१४.७) राज्यशासन माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थी, शिक्षक आणि शाळा या सर्वांची माहिती वर्षातून एकदाच गोळा करणार आहे. यापुढे शिक्षकांकडून वर्षभर माहिती न मागविता प्रशासन चालविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यामुळे यापूर्वी विविध संचालनालयाकडून वर्षातून १३० प्रकारची मागविण्यात येणारी माहिती कमी प्रमाणात मागवावी लागणार आहे.

(१४.८) काही जिल्हा परिषदा शिक्षकांची रजा मंजूरी सुरळीत करण्यासाठी व शाळाभेट अहवाल सादरीकरण इ. साठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करीत आहेत.

(१४.९) वरील बाबी शिक्षकांना निवांतपणे मुलांसोबत उपयोगी वेळ देण्यासाठी सहाय्यभूत ठरत आहेत. प्रत्येक जिल्हा आणि गट पातळीवर शासन निर्णय शिप्रयो २२१४ / प्रक्र ५३ / २०१४ / प्रशिक्षण दि. २१ नोव्हेंबर, २०१४ अन्वये गुणवत्ता कक्ष निर्माण करण्यात आला आहे. या कक्षाने वरीलप्रमाणे विचार करून शिक्षकांसाठी सुलभकाची भूमिका पार पाडावी.

१५) शिक्षक / अधिका-यांचा सन्मान -

(१५.१) शिक्षण हक्क कायदा यशस्वीपणे राबविणे राष्ट्रीय जबाबदारी आहे. ती जबाबदारी पार पाडण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक शिक्षक आहे. त्यासोबत त्यांना सहाय्यभूत ठरणारी यंत्रणा आहे. त्यामुळे ही राष्ट्रीय जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडण्यात यशस्वी झालेल्या व्यक्तींचा सन्मान व्हायला हवा. त्यासाठी पहिला निकष अप्रगत विद्यार्थी विहीन वर्ग तयार करणे हा राहील. दुसरा निकष, हे करत असताना साधारण आणि प्रगत मुलांच्या प्रगतीत कोणतीही बाधा येऊ न देणे हे राहील. या दोनही निकषात पात्र ठरलेल्या सर्व शिक्षकांचा सन्मान केला जाईल. असे मूल्यांकन वर्षातून एकदा केले जाईल आणि दरवर्षी पात्र शिक्षकांचा सन्मान केला जाईल.

(१५.२) सन्मानाची सर्वात नजिकची पातळी शाळा व्यवस्थापन समिती राहील. केंद्र, गट, जिल्हा व राज्य पातळीवर सन्मान करावयाचे ठरल्यास प्रत्येक पातळीवर वरील दोन निकषासह अन्य निकष जोडले जातील.

(१५.३) मूल्यमापनाचा मूळचा घटक शाळा असल्यामुळे मुख्याध्यापक यांचा सन्मान करण्यात येईल. त्याचप्रमाणे एखाद्या केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी किंवा गट शिक्षणाधिकारी यांचा त्यांचे अखत्यारित सन्मान घेणा-या कार्यरत शिक्षक व शाळा यांची संख्या व टक्केवारी विचारात घेऊन सन्मान दिला जाईल. याबाबत स्वतंत्ररित्या शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

१६) शिक्षक / अधिकारी यांचे कार्याचे मूल्यमापन - दरवर्षी प्रत्येक शिक्षक आणि अधिकारी यांचे मूल्यमापन करून गोपनीय अहवाल तयार केला जातात. सन्मानासाठी ठरविलेल्या निकषाच्या आधारे गोपनीय अहवाल लिहिण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येईल. यापूर्वी कामाच्या मूल्यमापनाचा मापनात्मक (Measurable) निर्देशांक नव्हता. त्यामुळे गोपनीय अहवाल Subjective असायचा तो यापुढे Objective राहील.

१७) शिक्षक / अधिकारी यांचे Job Chart (कार्यसूची) चे पुनर्विलोकन - सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात शिक्षक आणि सर्व पातळीवरील अधिकारी यांचे Job Chart (कार्यसूचीचे) पुनर्विलोकन करण्यात येईल. साधारण आणि प्रगत विद्यार्थ्यांची प्रगती कमी होऊ न देता अप्रगत विद्यार्थी विहीन महाराष्ट्र राज्य या उद्देशानुसार सर्वांच्या Job Chart मध्ये योग्य ते बदल करण्यात येतील.

१८) विभागीय संरचना आणि शिखर संस्थांचा अभ्यास - शिक्षण हक्क कायदा, २००९ आल्यानंतर विभागाची प्रशासकीय संरचना त्यास साजेशी आहे किंवा त्यामध्ये काही बदलाची आवश्यकता आहे या हेतूने वैज्ञानिकदृष्ट्या अभ्यास करण्यात येईल. त्याचप्रमाणे शिखर शैक्षणिक संस्थांच्या अभ्यासासाठी युनिसेफने मदत सुरू केली आहे. अभ्यासाअंती आवश्यकतेप्रमाणे पुनर्रचना व बळकटीकरण करण्याचे नियोजन करण्यात येईल.

१९) शिक्षकांच्या पदस्थापनेत समतोल राखणे - U-DISE वरुन काही वेळा दिसून येते की, स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत चालविल्या जाणा-या काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रमाणात कमी शिक्षक तर काही शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक असतात. असे निदर्शनास आल्यास संबंधित प्राधिका-यांनी तात्काळ शिक्षकांचे समायोजन करुन समतोल साधावा अन्यथा अशा बाबी राज्य शासनाच्या निदर्शनास आल्यास राज्यपातळीवरून कार्यवाही करण्यात येईल.

२०) चाईल्ड ट्रॅकिंग सिस्टिम -

(२०.१) राज्यातील अधिकांश मुलांचे आधारकार्ड तयार करण्यात आले असून उर्वरित मुलांचे आधारकार्ड मिळविण्यासाठीची मोहिम शासन निर्णय दि. २२/०४/२०१५ अन्वये हाती घेण्यात आली आहे. पुढील दोन महिन्यात सर्व मुलांना आधारकार्ड मिळवून दिले जातील अशी अपेक्षा आहे.

(२०.२) त्याबरोबरच NIC च्या मदतीने शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी इत्यादी बाबतची डाटाबेस माहिती आज्ञावली तयार करण्यात येत आहे. विभागातील सर्व प्राधिकाऱ्यांनी सर्व मुलांचे आधारक्रमांकासह या आज्ञावलीत डाटा एन्ट्री करावी.

(२०.३) NIC च्याच मदतीने एससीईआरटीमार्फत राज्यस्तरीय चाचणीत प्रत्येक मुलांना मिळणा-या गुणांचे ट्रॅकिंग करण्यासाठी आज्ञावली तयार करण्यात येत आहे. प्रत्येक चाचणीनंतर या सिस्टिममध्ये प्रत्येक मुलांच्या गुणांची डाटा एन्ट्री करावयाची आहे. या गुणांची डाटा एन्ट्री झाल्यावर प्रत्येक मुलाचा अध्ययन संपादणूक स्तर सर्व स्तरावर कळणार आहे. त्यामुळे राज्यात फक्त Child Tracking System तयार होत नसून Child Educational Quality Tracking System सुद्धा तयार होत आहे. या प्रणालीमुळे मुले शाळेत नियमित येत आहेत किंवा नाहीत यासोबतच ते शिकत आहेत की नाही हे लक्षात येणार आहे. शिकत नसलेल्या मुलांची हजेरी वाढवयाची आहे की अन्य उपाययोजना करावयाच्या या बाबी शाळा पातळीवरच्या कृती कार्यक्रमात दिसून येतील.

२१) Bio - Metric हजेरी व्यवस्था - सर्व विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या हजेरीसाठी प्रत्येक शाळा पातळीवर Bio - Metric उपस्थिती व्यवस्था करण्यात येईल.

२२) शाळाबाह्य मुले - (२२.१) शाळेत कधीही दाखल न झालेली मुले - राज्यात काही मुले अजूनही शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल नाहीत. त्यांची नावेसुध्दा हजेरी पटावर नाहीत. अशा मुलांचे सर्वेक्षण स्थानिक पातळीवर घेण्यात यावे. राज्य शासनसुध्दा सर्व्हेक्षण मोहिम हाती घेणार आहे. याबाबतचा शासन निर्णय ओससी ४४१५ / (१०२ / १५) एसडी ४, दिनांक २० मे, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. अशी मुले शोधल्यावर लगेच त्यांचे आधार क्रमांक मिळविण्यात येऊन ज्या शाळेच्या परिसरात ते दिसले त्या शाळेच्या हजेरी पटावर व U-DISE मध्ये त्यांची नावे नोंदविण्यात यावीत.

(२२.२) अनियमित मुले - अनियमित मुलांचे दोन प्रकार करता येतील. एक जे शाळेत नियमित हजर राहत नाही. परंतु शाळेच्या परिसरातच (गावात/वार्डात) राहतात. दुसरी मुले जी शाळेत अनियमित असतात आणि कुटुंबासह स्थलांतरीत होतात.

(२२.३) शाळेच्या परिसरातच राहणारी अनियमित मुले - अशा मुलांचे शाळेत न येण्याच्या कारणांपैकी महत्त्वाचे एक कारण शिक्षकांबद्दल भिती असू शकेल. वरवर काहीही आर्थिक किंवा कौटुंबिक कारण दिसत असेल तरी अशा मुलांबद्दल शिक्षणतज्ज्ञ किंवा समुपदेशकांकडून सखोल चौकशी करुन घ्यावी. त्याने या मुलांना शाळेच्या नियमित प्रवाहात दाखल करणे शक्य होईल. शिक्षकांच्या भितीमुळे अनियमित असल्यास आणि संबंधित शिक्षकाबद्दल माहिती मिळाल्यास त्यांचे नाव

गुप्त ठेऊन त्यांचे सुध्दा समुपदेशन करण्यात यावे. त्यांना विविध विषयांचे प्रशिक्षण घेण्यास प्रेरीत करावे.

(२२.४) स्थलांतरीत होणारी अनियमित मुले - (२२.४.१) काही मुले पालकांसोबत इतर ठिकाणी स्थलांतरीत होतात. स्थलांतराचे ठिकाण राज्यात किंवा राज्याबाहेर असू शकेल. त्यांचा स्थलांतरणाचा दिनांक साधारणपणे शिक्षकांना माहिती असतो. अशा मुलांसाठी आजतागायत साधारणपणे दोन प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. एक, गावातच हंगामी निवासी वसतिगृह तयार करुन मुलांचे स्थलांतर थांबविणे. अशी वसतिगृहे राज्यात बीड, नंदुरबार व अन्य जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतराच्या काळात सुरु केली जातात. काहीवेळा वसतिगृह मंजूर करण्यामध्ये विलंब झाल्यामुळे मुले स्थलांतरीत झाल्यावर वसतिगृह उघडली जातात. अशा वसतिगृहांचा स्थलांतरण थांबविण्यासाठी काहीच उपयोग होत नाही. याबाबतीत असा आदेश देण्यात येत आहे की, मागील वर्षी ज्या ठिकाणी वसतिगृह सुरु करण्यासाठी ज्या तारखेपासून आणि जेवढया क्षमतेसाठी प्रस्ताव आले होते त्यास त्याच तारखा आणि क्षमतेसाठी आताच मंजूरी द्यावी. याबाबतची उचित कार्यवाही महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचेकडून करण्यात यावी. मात्र वसतिगृह सुरु केल्यापासून एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष वसतिगृह सुरु केल्याची तारीख आणि प्रत्यक्ष प्रवेश घेतलेल्या मुलांबद्दल माहिती प्राप्त करुन त्याची शहानिशा करुन (मुलांचे आधार क्रमांक) घ्यावी.

(२२.४.२) दुसरी उपाययोजना जी आजतागायात फार प्रभावीपणे राबविली जाऊ शकली नाही. ती म्हणजे मुले स्थलांतर होऊन ज्या शाळेच्या परिसरात जातील त्या शाळेत प्रवेश घेऊन शिक्षण घ्यावे. Child Tracking System विकसित होत असल्यामुळे प्रत्येक मुलाला मूळच्या शाळेच्या ठिकाणी शिक्षण हमी कार्ड Education Guarantee Card देण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे. या कार्डामध्ये मुळच्या शाळेत मुलाने प्राप्त केलेल्या विषयनिहाय क्षमता, मुळच्या शाळेचा U-DISE Code आणि स्थलांतराच्या ठिकाणच्या शाळेचा U-DISE Code त्या शाळेचा पूर्ण पत्ता, मुख्याध्यापकाचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी माहिती नमूद केली जाईल. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास सुध्दा या मुलाच्या आगमनाची तारीख इत्यादी माहिती पुरविली जाईल.

(२२.५) शिक्षण हक्क कायद्यातंर्गत राज्याने केलेल्या नियमात ३० दिवस सतत गैरहजर मुलांना सुध्दा शाळाबाह्य मानले आहे. अशा मुलांची नावे शाळेच्या हजेरी पटावर असल्यास किंवा हजेरीपटावरुन कमी केलेली असल्यास त्यांची नावे सुध्दा Child Tracking System मध्ये घेण्यात यावी. या मुलांचे सुध्दा आधारक्रमांक मिळविण्यात यावेत.

(२२.६) काही उत्साही शिक्षकांनी मुलांना लोकसहभागातून Tablet मिळवून दिले आहेत. या Tablet चा वापर घरातील टिव्हीस जोडून शिकण्याच्या सरावासाठी सुध्दा करतात. याने संपूर्ण कुटुंब त्या शैक्षणिक कृतीत सहभागी होत आहे. शाळेच्या परिसरात राहणाऱ्या अनियमित मुलांसाठी अशा प्रकारे विविध प्रयोग करण्यात यावेत. यातून अनियमित मुलांना शिकविण्यासाठी काही चांगले मार्ग मिळण्याची शक्यता आहे.

(२२.७) वरील विविध प्रकारच्या शाळाबाह्य मुलांना नियमित शाळेत त्यांच्या वयोगटानुरुप वर्गात दाखल करुन विशेष प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या वर्गशिक्षकाची राहाणार आहे.

२३) कार्पोरेट/स्वयंसेवी संस्थांचा सहभाग: कार्पोरेट/स्वयंसेवी संस्थांचा शाळा विकास, विद्यार्थी विकास, संस्थांचे सक्षमिकरण इत्यादी बाबीसाठी सहकार्य व सहभाग घेण्याकरीता राज्य शासनाने दिनांक ९ जून, २०१४ व १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. तसेच दिनांक २४ जुलै, २०१४ च्या शासन निर्णया अनुसार शैक्षणिक गुणवतेच्या अनुषंगाने स्वयंसेवी संस्थांचा सहभागातून पथदर्शी तत्वावर नाविन्यपूर्ण उपक्रम राबिविण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे. या सर्व माध्यमातून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांत कार्पोरेट व स्वयंसेवी संस्थांचा सहभाग व सहकार्य घेण्यात यावे. कार्पोरेट/स्वयंसेवी संस्थांचा सहभाग व योगदानात सुसूत्रता आणण्यासाठी स्वतंत्र निवेदनाद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

२४) विविध समांतर कार्यक्रमाची अंमलबजावणी: राज्याच्या शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन कार्यक्रमाची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी व त्यामध्ये सक्रीय सहभागी होवून त्यास बळकट करण्याकरिता राज्यातील सर्व प्राधिकारी यांना आवाहन करण्यात येत आहे. विविध प्राधिकारी स्थानिक पातळीवर वेगवेगळे शैक्षणिक कार्यक्रम राबिवितात. सदरचे कार्यक्रम भावनिक पातळीवर विचार करून सरसकट न राबविता त्यामध्ये सुसंगतपणा व सुसूत्रता आणण्यासाठी यापुढील काळात खालील बाबी लक्षात घेऊन त्याप्रमाणे गरजेनुसार नवीन कार्यक्रम राबविण्याबाबत विचार व्हावा. (वाचा : परिशिष्ट १)

२४.१) प्रगत, साधारण व अप्रगत मुलांचा विचार करून त्या प्रत्येकांचे शिक्षण होईल याची काळजी घ्यावी.

२४.२) शिक्षकांना त्यांच्या मागणीनुसार व व्यक्तिगत गरज विचारात घेवून प्रशिक्षण दिले जावे. शिक्षकांच्या शैक्षणिक स्वातंत्र्यावर गदा येणार नाही याची नोंद घ्यावी.

२४.३) शिक्षकांना मुलांसोबत वर्गामध्ये भरपूर वेळ मिळाला पाहिजे त्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची अशैक्षणिक व इतर कामे लादू नयेत. तसेच शिक्षक शाळेबाहेर राहणार नाहीत याची काळजी घ्यावी. अथवा गुणवत्तावाढीच्या कामाच्या पूर्ततेसाठी अतिरिक्त माहिती मागविली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

२४.४) वरील बाबी विचारात घेऊन, विविध प्राधिकारी यांना स्थानिक पातळीवर शैक्षणिक कार्यक्रम राबवयाचे झाल्यास त्याबाबत संबंधित स्तरावरील गुणवत्ता कक्षात चर्चा करावी, व त्या कार्यक्षेत्रातील शिक्षक व अधिकाऱ्यांचा सहभाग घेऊन निर्णय घ्यावा.

२५) खर्च तरतूद - पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन १ व २ मधील चाचणी, त्रयस्थ संस्थेमार्फतच्या चाचण्या, चाचणीचे संगणकीकरण, माहितीचे विश्लेषण, अहवाल निर्मिती इत्यादिसाठी आवश्यक आर्थिक तरतूद राज्य शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील प्रमाणे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक प्रगती चाचण्या सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमाच्या मान्यताप्राप्त शाळांमधून इयत्ता पहिली ते आठवीमधील सर्व विद्यार्थ्यांसाठी लागू राहातील. एक वर्षानंतर सदर कार्यक्रमाचा आढावा घेऊन आवश्यक ते बदल करण्यात येतील

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (www.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६२४१२२१३५९२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nandkumar

Digitally signed by Nandkumar
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=110001, st=Maharashtra, serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6dfb37c2bb83da1977886 45dd8a362ebe5, cn=Nandkumar
Date: 2015.08.04 17:22:32 +05'30'

(नंदकुमार भा.प्र.से.)

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट - एक या शासन निर्णयामागची तत्वे आणि विश्लेषण

### प्रमुख तत्त्व -

शिक्षकांना संकल्पनात्मकदृष्टया समृध्द करणे. शिक्षकांच्या संकल्पनामध्ये विषयज्ञान, बालमानसशास्त्र आणि अध्यापन शास्त्र या तीन घटकांचा समावेश असणे आवश्यक आहे. गुणवत्ताविकासाची योजना भावनिकस्तरावर न करता बौध्दिकस्तरावर करणे म्हणजे कार्यकारणभावाचे विश्लेषण करुन चिन्हीत केलेल्या समस्यांवर उपाययोजना करणे. म्हणजेच तर्कशुध्द पध्दतीने वैज्ञानिक दृष्टिकोणाचा वापर करुन योजना आखणे.

> "उपाययोजना दोन पातळयांवर होतात. एक भावनिक पातळी दुसरी बौध्दिक पातळी .काही मुले लिखाण व वाचनामध्ये मागे पडत आहेत म्हणून लिखणाचे व वाचनाचे कार्यक्रम घेणे हा भावनिक पातळीवरील निर्णय झाला." - एका शिक्षकाचे मनोगत

१. <u>गुणवत्तावाढीसाठी विभिन्न अभियान चालवणे</u> - विद्यार्थ्यांस एका इयत्तेमधील शिक्षण पूर्ण करण्यासाठी एक वर्ष लागते. म्हणजेच विद्यार्थ्यांस पदवीपर्यंत १५ वर्षे लागतात. हे माहीत असूनदेखील शिक्षणक्षेत्रात गुणवत्तेसाठीचे अभियान चालवले जाते. अभियान काही ठराविक काळापुरते चालवले गेल्यास यशस्वी होते. परंतु, शिक्षण ही एक निरंतर प्रक्रिया आहे. त्यामुळे गुणवत्तावाढीचे कार्यक्रम सातत्यपूर्ण सुरु असणे आवश्यक आहे. दीर्घकालीन उद्दिष्टासाठीचा कार्यक्रम काही काळापुरता असल्यास तो राबवू नये. परंतु, तोच कार्यक्रम दीर्घकालीन प्रक्रियेचा भाग असल्यास तो राबविण्यास हरकत नाही.

<u>२ सरसकट राबविणे</u> - शिक्षणामध्ये विद्यार्थी मागे राहिले की लेखन-वाचन प्रकल्प राबविणे वर-वर योग्य असल्याचे दिसते. परंतु, खोलात गेल्यास उणीवा जाणवायला सुरुवात होते. एका संस्थेच्या अहवालानुसार राज्यात वर्ष २०१०-११ साली पाचव्या वर्गातील ९४% मुलांना दुस-या वर्गाचे मजकूर वाचता येत होता. तेच प्रमाण २०१४-१५ साली घसरुन ७४% इतके झाले. म्हणजे वाचन करु शकणाऱ्या मुलांचे प्रमाण २०% नी घसरले आहे. यामध्ये सुधारणा करावयाची असल्यास काय करावे? सरसकट लेखन वाचन प्रकल्प राबविल्यास ७४% मुले ज्यांना वाचता येते त्यांचा वेळ वाया जाणार व ते पुढच्या बाबी शिकण्यापासून वंचित राहणार. परिणामी त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. चाललो होतो शैक्षणिक गुणवत्ता वाढवायला आणि उलटेच करुन बसलो असे काही घडायला नको याची काळजी घेण्यात यावी.

६) त्याचप्रमाणे काही शिक्षक वर्गात असलेल्या मुलांकडे लक्ष देऊन भाषा, गणित हे विषय शिकवण्यावर जास्तीचा भर देण्याचे कार्य करीत असतील आणि अशा शिक्षकांनासुध्दा लेखन, वाचन प्रकल्प राबवावा लागला तर त्यांचाही वेळ वाया जाईल. पुन्हा परिणाम उलटा हाईल. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता विकासाचा कोणताही कार्यक्रम हाती घेतांना खूप विचारपूर्वक काम करावे लागेल. लेखन-वाचन प्रकल्प विचारपूर्वक केल्यास फक्त त्याच विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रीत करावे लागेल ज्या विद्यार्थ्यांना लिहिता-वाचता येत नाही. मुलांची मातृभाषा निराळी असल्यामुळे अडचणी असतील तर मातृभाषेतून

लिपीपरिचय करून पद्धतशीरपणे प्रमाणभाषेकडे नेणारे अध्यापन शास्त्र त्या कार्यक्रमात वापरावे लागेल. ते करीत असताना जे शिक्षक विद्यार्थीनिहाय लक्ष द्यायला शिकले नाहीत, अशाच शिक्षकांच्या वर्गातील लेखन-वाचनामध्ये मागे राहणा-या विद्यार्थ्यांकडेच लक्ष द्यावे. विद्यार्थीनिहाय लक्ष केंद्रीत करणा-या शिक्षकांच्या वर्गात लेखन-वाचनमध्ये मागे राहणारे विद्यार्थी असले तरी त्या मुलांसाठी प्रकल्प राबवू नयेत. बालमानसशास्त्र समजणारा शिक्षक ते कार्य स्वतःहून करु शकेल यावर आपला विश्वास असायला हवा.

> राज्यात एका शिक्षिकेला नव्याने इयत्ता तिसरीचा वर्ग शिकवण्यास मिळाला. सदरच्या वर्गावरील त्यापूर्वीच्या शिक्षकाने त्या वर्गातील एका मुलीला मतिमंद घोषित करुन ती काही शिकू शकणार नाही असा विश्वास पसरवला होता. नव्या शिक्षिकेला त्या मुलीमध्ये कोणतीही अडचण जाणवली नाही. फक्त जुन्या शिक्षिकेसोबत न शिकता गेलेल्या तिच्या वेळेची तूट भरुन काढण्याची आवश्यकता भासली. - **शिक्षकाने जबाबदारीने विद्यार्थ्यांच्या क्षमतांवर शिक्कामोर्तब करावे.**

३. <u>शिक्षकांनी अधिक वेळ द्यावा</u> - वरील बॉक्स वाचल्यानंतर कोणत्या शिक्षकाचा अधिक वेळ कामाचा आहेत हे स्पष्ट होते. कोणत्याही शिक्षकाने अधिक वेळ मुलांना शिकविल्यास मुलांचे शिक्षण सुधारणार असा विश्वास ठेवणे योग्य नाही. शिक्षकाला बालमानसशास्त्र, अध्यापन शास्त्र आणि विषयज्ञान असेल तरच वेळेचा जास्त उपयोग मुलांना होईल अन्यथा नाही. परंतु, वरील तीन बाबींची जाण असलेल्या शिक्षकांना uविद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी जास्त वेळ द्या असे सांगण्याची वेळच येणार नाही.

४. <u>वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळांच्या भेटी वाढवाव्यात</u> - येथे सुध्दा भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांचे बालमानसशास्त्र, अध्यापन शास्त्र, विषयज्ञान आणि मानसशास्त्रविषयांचे ज्ञान तसेच उपयोजन क्षमतेवर त्या भेटीचा नफा-तोटा अवलंबून राहणार आहे.

> एका शाळेतील चौथीच्या वर्गात केंद्रप्रमुख शिरले. त्यांना दाखवून द्यायचे होते की ते केंद्रप्रमुख असल्यामुळे शिक्षकांपेक्षा मोठे आहेत. त्यांनी सर्वात कमी आत्मविश्वास असणाऱ्या दोन मुलींना एक-एक करुन उभे केले. त्यांना त्यांच्या मते अवघड (म्हणजे पाचअक्षरी) शब्द वाचायला सांगितले. त्या दोन्ही मुलींना ते जमले नाही. मुलींना तसेच शिक्षिकेला काही येत नाही इत्यादी सांगत दाटून-दपटून ते निघून गेले. ते गेल्यानंतर एक मुलगी म्हणाली, -असा कसा हा माणूस॰ पुढच्या दिवशी दोन्ही मुली वर्गात गैरहजर राहिल्या. - **आपली प्रत्येक कृती ही शिक्षण क्षेत्रातील संबंधित सर्व घटकांनी विचारपूर्वक करावी.**

५. वरील भेटीचा शैक्षणिक फायदा झाला असे म्हणता येणार नाही. शिक्षिकेला अधिकाऱ्यांना हाताळता आले नाही तर त्या दोन्ही मुलींची गळती होणारच. शासन एकेका विद्यार्थ्याला शाळेत आणण्यासाठी जमीन-अस्मान एक करणार आणि असे अधिकारी शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांना शाळेबाहेर फेकणार. त्यामुळे जर अधिकाऱ्यांना खालील शब्दांमधील फरक लक्षात येईल आणि त्याप्रमाणे ते वागतील तरच त्यांच्या भेटी सत्करणी लागणार आहेत. अन्यथा त्यांनी शाळाभेट न दिलेलीच चांगली.

६. <u>अधिक मूल्यमापन केल्यास मुले अधिक शिकतील</u> - वरच्या बॉक्समध्ये केंद्रप्रमुखाने केलेल्या मूल्यमापनातून मुले अधिक शिकतील असे वाटत नाही. त्या मुलींच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण होऊन त्या शिकण्यापासून परावृत्त होतील.

शिष्यवृत्ती परीक्षेबददल सुध्दा असेच एक बालमानसशास्त्रीय विश्लेषण करता येते. अभ्यासात पुढे असणारी मुले वरच्या काठिण्यपातळीचे गणित सोडवण्याचा आनंद घेतील, तर अभ्यासात मागे असणारे विद्यार्थी अधिक कठीणपातळीचे गणित पाहून गणित हा विषयच त्यांच्या आवाक्याबाहेर आहे असा विचार करतील. कोणतेही मूल्यमापन मुलांना शिकण्यासाठी मदत करणारे असायला हवे. त्यांच्या भावना दुखावणारे नसावे. मुलांच्या संपादणूकपातळीची जाण शिक्षकांना असतेच. शिक्षकांना त्यांची माहिती असूनसुध्दा मुले मागे राहतात.

> मुलांना संपूर्ण स्वातंत्र देत गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याकरिता दुसरी उपाययोजना बौध्दिक पातळीवरील आहे. मुले अनेक दिवस शाळेत जातात, शिक्षक त्यांना शिकवतात तरीदेखील मुलांना शिकण्यात अनेक अडथळे येतात. त्यामागील कारण शोधून शास्त्रीय पध्दतीने त्यावर उपाय करणे ही बौध्दिकपातळीवरील उपाययोजना आहे. या पध्दतीच्या वापराने समस्या सुटणे शक्य आहे अन्यथा आपण समस्येमध्येच गुरफुटून जावू आणि तिथेच गरगरत राहू. - **गुणवत्तापूर्ण शिक्षण या संकल्पनेचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे.**

७. शिक्षकांच्या हातात जेवढी तंत्रे आहेत ती सगळी वापरल्यानंतरसुध्दा ही परिस्थिती असते. त्यामुळे शिक्षकाला अधिक तंत्रे शिकण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांच्या अधिक मूल्यमापनाची आवश्यकता नाही. तसेच, एखादा विद्यार्थी शिष्यवृत्तीपरीक्षा पास होऊ शकेल किंवा त्याचा आनंद घेईल असे त्याच्या शिक्षकाला वाटत असल्यासच त्या विद्यार्थ्याला परीक्षेला बसवावे. येथेसुध्दा सरसकटचा नियम अयोग्य आहे.

८. <u>वयानुरुप वर्गांमध्ये दाखल केलेली मुले</u> - अशा मुलांना शिक्षकांनी अधिक वेळ देऊन शिकवण्याचा विचार असतो. मग ही मुले नियमित वर्गामध्ये असताना शिकतात की नाही याचा विचार करावयाची गरज आहे. त्याने बाहेरून शिकलेले ज्ञान व स्वतःचे स्वतः शिकण्यासाठी अवगत केलेली पद्धत वापरून, त्याचा आत्मसन्मान जपत त्याला शिकविण्याचे तंत्र शिक्षकांनी शिकले पाहिजे. वर्गातील दिलेल्या वेळेचा उपयोग मुलाला होत नसल्यास त्याच्या आयुष्याचा तेवढा वेळ आपण वाया घालवतो असा होईल. नियमित वर्गामध्ये जाणारा वेळ मुलाला उपयोगाचा वाटत नसल्यास ते मूल शाळा सोडून देईल.

९. <u>शाळाबाहय मुले</u> - सर्वेक्षण करुन या मुलांना शाळेत आणल्यानंतरसुध्दा वरीलप्रमाणे वर्तन राहिल्यास ते मूल शाळेत नियमित येणार नाही. त्यामुळे आजच्या घटकेला शाळाबाहय मुलांना प्रवाहात आणण्यासाठी काही ठोस उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे.

१०. <u>स्थलांतरित होणारी मुले</u> - सध्याचा विचार हा स्थलांतरित मुलांना स्थलांतरित ठिकाणच्या शाळेत घालण्याचा आहे. त्याठिकाणीसुध्दा शिक्षकाला बहुस्तरीय शिक्षण जमत नसल्यास या विचाराचा काहीच फायदा होणार नाही. त्यामुळे नवीन विचार करावयाची गरज आहे.

२. <u>अभ्यासात मागे राहणारी मुले</u> - पाचव्या वर्गापर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जर लिहिता-वाचता येत नसल्यास त्या वर्गाला शिकवणाऱ्या शिक्षकाला वाचन-लेखन कार्यक्रमाचे प्रशिक्षण देणे योग्य असा सरसकट नियम लावता येणार नाहीत. पुढील बॉक्स पहा. या प्रकरणात त्या मुलांना चौथ्या वर्गापर्यंत शिकवणाऱ्या शिक्षकांचे शोध घेऊन त्या शिक्षकांना बालमानसशास्त्र, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अध्यापन शास्त्र शिकवण्याची गरज आहे.

> सध्या राज्यामध्ये एका पाचवीच्या वर्गामध्ये प्रत्यक्ष घडत असलेली ही गोष्ट-एकूण ४९ मुले असलेल्या वर्गात चार महिन्यापूर्वी १७ मुलांना अक्षरओळखसुध्दा नव्हती. पण आता तेवढेतरी विद्यार्थ्यांना यायला सुरुवात झाली आहे. चार महिन्यात शिकू शकतात तर चार वर्षात का नाही? असा प्रश्न त्या वर्गाच्या शिक्षकाने केला. असे आत्मपरिक्षण प्रत्येक शिक्षकाने करणे गरजेचे आहे.

३. <u>आदिवासी मुले</u> - राज्यात स्पष्ट दिसते की, नंदुरबार, नाशिक, अमरावती, ठाणे, गडचिरोली जिल्हे गणित आणि भाषा या दोन्ही विषयांमध्ये मागासलेले आहेत. एका स्वयंसेवी संस्थेच्या सर्वेक्षणानुसार ते भाषेपेक्षा गणितामध्ये जास्त मागासलेले आहेत. त्यामुळे शिक्षकांना गणिताचेच अधिक प्रशिक्षण देणे चांगले असे म्हणता येणार नाही. कारण सदरहू परिसरात मोठया प्रमाणात मराठी भाषा बोलली जात नसल्यास गणितामध्ये मागे राहण्याचे कारणसुध्दा मुलांना भाषा न समजणे हे असू शकते.

<u>शिक्षक प्रशिक्षण - वरील बाबींचा विचार करता स्पष्ट आहे की, राज्य किंवा जिल्हा किंवा तालुका आणि केंद्रपातळीपर्यंतसुध्दा सरसकट शिक्षक प्रशिक्षण देता येणार नाही. सध्याचे प्रशिक्षण त्याप्रमाणे आयोजिले जाते. मग आश्चर्य नाही की, शिक्षक या प्रशिक्षणांना विरोध करतात. अशा प्रशिक्षणांनी शिक्षकांना मदत तर मिळत नाही. उलट त्यांना वर्गात कमी वेळ मिळण्याची खंत असते. जसे मुलांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन शिक्षकांनी मुलांना शिकवायचे आहे. तसेच,शिक्षकांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन प्रशासन आणि प्रशिक्षणयंत्रणेने त्यांना मदत करावयाची आहे.</u>

४. <u>शिक्षकांना प्रेरित करणे</u> - इतरांनी सांगून कोणीच प्रेरित होत नाही. प्रेरणा नेहमी आतून असते. त्यामुळे वर्गातील मुलांना स्वतःचे मूल समजून शिकवा या व अशा वाक्यांनी काही होणार नाही. आजतागायत प्राप्त ज्ञानाच्या आधारावर माणसांना प्रेरित करणे सहज सोपी गोष्ट नाही. काही वेळा वरिष्ठ पदावर असलेल्या मंडळींनादेखील ते जमत नाही. मग त्यांना उपलब्ध असलेल्या काही अधिकारांची भाषा ते बोलायला सुरुवात करतात. कारवाई करणार, सस्पेंड करणार किंवा डिसमिस करुन टाकणार असे ते बोलतात. पण नंतर तसे ते करत नाहीत. असे शब्द आणि वाक्य भावनिक पातळीवरची आहेत. त्यामुळे मानसिक वातावरण खराब होते आणि मानवीयता वितळते. तसेही शिस्त आणि अपिलनियमांमध्ये कारवाई करण्याबदल उल्लेख नाही.

५. <u>गुणवत्तेमध्ये मागे असल्याबद्दल कारवाई करणे</u> - सुरुवातीला आपण पाहिले की, गुणवत्ता मिळवणे ही दीर्घकाळाची बाब आहे. कारवाई करणे ही क्षणिक बाब आहे. त्यामुळे दोन्हीचा संबंध लावता येणार नाही असे तात्विकरित्या दिसते.

नापास न करण्याचा नियम आणि गुणवत्ता ढासळणे - शिक्षण हक्क कायद्याचा हा सर्वात विवादित मुद्दा आहे. बरेच लोक नापास न करणे आणि पास करणे या दोन्हीला सारखेच समजतात त्यामुळे सुध्दा विवाद वाढतांना दिसतो. खरे तर हा नियम निसर्गाच्या जन्म आणि मृत्यूच्या नियमानुकुल आहे. प्रत्येक माणूस जन्मल्यानंतर वयानुरुप शरीराने मोठा होतो, तो तरुण होतो, वयस्क होतो, म्हातारा होतो आणि त्यानंतर मृत्यू पावतो. जन्माला आलेली सर्व माणसे साधारणपणे १०० वर्षांनी मरण पावतात. माणूस त्यांच्या समवयस्क लोकांसोबत जगतो आणि मरणही पावतो. त्यामुळे त्याला इतर वयातील लोकांसोबत ठेवणे नैसर्गिक नियमांच्या विरोधात असून त्याच्यासाठी ती शिक्षा आहे. त्याला शिक्षा करायची नाही म्हणून नापास करायचे नाही. शिक्षण हक्क कायदा येण्यापूर्वी नापास करण्याचा नियम होता. बऱ्याच लोकांना नापास केले गेले. शाळेत नापास होणाऱ्या लोकांचे पास होणाऱ्या लोकांपेक्षा वय किती वर्षांनी कमी असते असा प्रश्न विचारला तर या प्रश्नालाच लोक विनोद म्हणतील. आपण शाळेत एखाद्याव्यक्तीला नापास केले तरी निसर्गाला ते मान्य नाही. आपण नापास करुनसुध्दा ते आपल्यासोबतच जगणार आहेत म्हणजेच ते पास होण्याच्या लायकीचे आहेत. तरीदेखील आपणाला ते नापास होण्याच्या लायकीचे दिसतात. सबब, आपण निसर्गाच्या नियमाच्याविरुध्द असल्यामुळे एकूण शिक्षण आणि मूल्यमापन इत्यादीबाबतची प्रक्रिया तपासून घेण्याची गरज आहे. ते तपासता येत नसल्याने सध्याची शिक्षणव्यवस्था नापास ठरत आहे. मग शिक्षणव्यवस्थेतील लोकांना घरी पाठवायचे काय? तसे आजतागायत झाले नाही आणि पुढेही होणार नाही. आपण व्यवस्थेला सुधारण्याचा प्रयत्न करतो जसे व्यवस्थेला कायम ठेवून सुधारण्याची संधी देतो. तसेच, मुलांना वयानुरुप वर्गात ठेवून शिकण्याची संधी देणे हा आहे नापास न करण्याचा नियम. व्यवस्थमध्ये कुवत तयार झाल्यास अशी मुले क्वचितच दिसतील.

***********

## परिशिष्ट २

## शिक्षक, अधिकारी व बालकांसाठी उपयुक्त वेबसाइटस

ज्ञान सर्वांसाठी खुले असले पाहिजे• या तत्त्वाने काम करणाऱ्या काही संस्थांचे साहित्य (शिक्षक व बालकांसाठी उपयोगी) त्यांच्या वेबसाइटवर मोफत उपलब्ध आहे. शासनासोबत ज्यांनी काम केलेले आहे किंवा करीत आहेत अशा संस्थांच्या बेवसाईटसची माहिती खाली उदाहरणादाखल नमूद केलेली आहे. शासनाने जाहिरात देऊन इतर संस्थांना निमंत्रित केले आहे. त्यापैकी ज्यांच्या अशा उपयुक्त वेबसाइट असतील त्यांची माहिती नंतर पुन्हा देण्यात येईल.

नवनिर्मिती लर्निंग फाऊंडेशन - www.navnirmitilearning.org नवनिर्मिती संस्था २००० सालापासून जि.प, न.प, म.न.पा. व आदिवासी भागातील शाळा, SSC, CBSE, ICSE, IGCSE शाळांमध्ये गणिताच्या सार्वत्रिकीकरणाचे काम करीत आहे. वास्तव परिस्थितीत प्रत्येक मूल गणित शिकू शकते हे या शिक्षकांनी सिद्ध केलेले आहे. नवनिर्मिती टीमने भारतभरात, दक्षिण आफ्रिकेत आणि टर्कीमध्ये मिळून सुमारे २०००० शिक्षकांच्या गणित कार्यशाळा घेतल्या आहेत. प्रत्येक मूल गणित शिकेल अशी पद्धत प्रत्यक्ष वर्गात वापरण्यासाठीच्या शिक्षक हस्तपुस्तिका, मूल्यमापन संच, इयत्ता १ ते ४ च्या मुलांसाठी वर्कबुक्स, ५ ते ८ मधील ज्या मुलांचा पाया कच्चा आहे अशांसाठी सेतू कोर्स कृती व अभ्यासपुस्तिका, अपूर्णांक व चिन्हांकित संख्या बुकलेट्स असे प्रत्यक्ष कार्यक्रमातून तयार व यशस्वी झालेले साहित्य इंग्रजी, मराठी व हिंदीतून freely downloadable form मध्ये उपलब्ध आहे. विज्ञान-भूगोल-भूमिती-अंकगणित यांचा एकात्मिक अनुभव देणाऱ्या, मुलांनी स्वतः साहित्य बनवून करण्याच्या दिवसाच्या खगोलशास्त्राच्या -wow• प्रयोगांचे विडिओज व पुस्तिका हिंदी, इंग्रजी व मराठीतून day time astronomy या विभागात उपलब्ध आहेत.

Centre for Equity and Quality in Universal Education - www.ceque.org व्यापक स्तरावर गुणवत्ता शक्य आहे, हा विश्वास आधी व्यवस्थेच्या आणि प्रत्येक व्यक्तीच्या मनात आवश्यक आहे या विचाराने ही ना नफा तत्त्वावरील संस्था कार्यरत आहे. चांगले काम करणाऱ्या शिक्षकांच्या वर्गातील अनुभव विडिओच्या स्वरूपात तयार करणे, अशा विडिओजची एक बँक तयार करणे, त्यावर चर्चा व देवाणघेवाण होईल असे व्यासपीठ निर्माण करणे, त्याद्वारे शिक्षकांचे समृद्धीकरण होणे असा उद्देश ठेवून काम चालू आहे. या वेबसाइटवरील Teacher Pages या विभागात भाषा, गणित, भूगोल, विज्ञान इ. अनेक विषयांवर प्रत्यक्ष वर्गात शिक्षक करीत असलेल्या कामांचे विडिओ उपलब्ध आहेत.

क्वेस्ट - www.quest.org.in QUEST ही संस्था गेली आठ वर्षे प्राथमिक बालशिक्षण, प्राथमिक शिक्षण व शिक्षक-शिक्षण या क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेच्या www.quest.org.in शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक संसाधने, मोफत उपलब्ध करुन दिली आहेत. वेबसाईटच्या होम पेज वरील Teacher Area या विभागात अनेक उपयुक्त लिंक आहेत. शिक्षक अभ्यास मंडळाचे व्यासपीठ या पानाववर सुमारे ३०० सदस्य शिक्षण विषय चर्चा करतात. संस्थेमार्फत वेबसाईटच्या माध्यमातून शिक्षकांसाठी गणित व भाषा शिक्षणाचा ऑनर्लाईन कोर्स मराठीतून चालवला जातो. तसेच अनेक शिक्षण विषयक लेख साईटसवर उपलब्ध आहेत. या शिवाय वर्गांतर्गत प्रक्रिया दाखवणा-या सुमारे ७० व्हिडिओ क्लिप उपलब्ध आहेत. मुलांसाठी इंग्रजी व मराठीतून ऑडिओ गोष्टीही उपलब्ध आहेत.

प्रगत शिक्षण संस्था - www.pragatshikshansanstha.org शिक्षण क्षेत्रात गेली ३० वर्षे कार्यरत असणारी प्रगत शिक्षण संस्था अनेक बाबतीत पथदर्शी संस्था आहे. संस्थेचा इतिहास व व्यक्ती यांचे

काम वाचण्यासारखे आहे. संशोधन व संसाधने या टॅब मध्ये शिक्षकांनी केलेली कृती संशोधने, नवोपक्रम, फेलोशिप्चे अहवाल उपलब्ध आहेत. तसेच संस्थेची प्रकाशने, प्रथम भाषेच्या २ फिल्म्स, बालवाडीच्या १६ फिल्म्स, इंग्रजी शब्द-भांडार वाढविण्यासाठी असणाऱ्या उपक्रमांची जि. प. शाळेत चित्रित केलेली फिल्म Here is a Tree - part १ &२ असे सर्व शैक्षणिक साहित्य व शिक्षणविषयक अनेक लेख मोफत उपलब्ध आहे. CLLC ग्रंथालयातील सुमारे १०० भाषा विषयक संदर्भ ग्रंथांची यादी पहायला मिळेल. कमला निंबकर बालभवन या टॅबमध्ये मुलांनी केलेले वार्षिक प्रकल्प, पर्यावरण प्रकल्प, ICT चे प्रकल्प तसेच मुलांचे लिखाण व के. एन. बी. बुलेटीन वाचायला मिळेल. ब्लोग्स मध्ये शाळेतील उपक्रम वाचायला मिळतील.

पालकनीती - www.palakneeti.org पालकनीती हे मुळात संवादासाठीचं व्यासपीठ. १९८७ पासूनपालकनीतीनं शिक्षण आणि पालकत्वासंबंधी अनेक मूलभूत मुद्यांवर मांडणी केली आहे. २००४ पासूनचे अंक व त्यातील जवळपास २००० लेख पालक-शिक्षक आणि इतर जिज्ञासूसांठी www.palakneeti.org या संकेतस्थळामध्ये विषयनिहाय उपलब्ध आहेत. मुलांच्या आणि त्यांच्या सोबत आपल्याही वाढण्या-घडण्याच्या संदर्भातला समृद्ध आणि मूलभूत विचारांचा साठा यालेखांच्या रुपानं आपल्याला सापडेल. शिक्षणाचे माध्यम, शिक्षण हक्क कायदा, शिक्षणातले बदलते प्रवाह आणि इतर सामाजिक प्रश्नांची चर्चा पालकनीतीच्या संवादकीय आणि लेखांमध्ये आहे. यातील सर्व लेख UNICODE मध्ये असल्याने आपण शोधा हा पर्याय वापरून आपण विषयानुसार, शीर्षकानुसार किंवा शब्दानुसार लेख शोधू शकता व freely download करू शकता. पानाच्या खालच्या भागात काही निवडक, वेचक लेख आपल्याला - हे जरूर वाचा या विभागात वाचायला मिळतील.तसेच उत्साही लेखक आपलं लिखाण - आपले लेखन पाठवा यावर click करून पालकनीतीकडे पाठवू शकतात.

रयत शिक्षण संस्था - rayatshikshan.edu रयत शिक्षण संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात फार मोलाचा वाटा सुमारे १०० वर्षांपूर्वीपासून उचललेला आहे. त्यांचे शैक्षणिक काम, प्रकल्प यांची माहिती बेवसाइटवस आहे. धोरणात्मक, शैक्षणिक व प्रशासकीय बाबींची थोडक्यात व सोप्या शब्दात मराठीतून माहिती देणाऱ्या पुस्तिका वेबसाइटवर आहेत. उदा. ज्ञानरचनावाद म्हणजे काय?, शिक्षण हक्क कायदा, माझी समृद्ध शाळा इ.

अरविंद गुप्ता - arvindguptatoys.com अरविंद गुप्ता व त्यांची टीम गेली अनेक वर्षे मुलांच्या विज्ञान शिक्षणामध्ये काम करत आहेत. मुलांना प्रयोग करत करत विज्ञान शिकता यावे यासाठी सातत्याने विज्ञान खेळणी/प्रयोग निर्माण करत आहेत. कोणतीही गोष्ट जेव्हा मुलं हाताने करतात तेव्हा ती गोष्ट मुलांना सहज समजते हेच तत्व डोळ्यासमोर ठेवून त्यांनी मुलांच्या आनंददायी शिक्षणासाठी परिसरात सहज उपलब्ध होणारे साहित्य वापरून १००० विज्ञान खेळणी/प्रयोग बनविले आहेत. या सर्व प्रयोगांच्या छोट्या फिल्म्स निर्माण करून त्या यु-ट्युबवर उपलब्ध करून दिल्या आहेत. जगभरातून ३०००० लोक रोज या फिल्म्स वापरतात. मुलांना प्रयोग सहज करता यावेत यासाठी सर्व प्रयोगांचे ११००० फोटो सुद्धा ठेवले आहेत.

शिक्षक, पालक, बालक व प्रत्येक शिक्षणप्रेमीसाठी अनेक विषयांवरची, अनेक भाषांमधील ५००० पुस्तके या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. यात इंग्रजी, हिंदी, मराठी व संमिश्र भाषांमधील पुस्तके आहेत.

**(परिशिष्ट ५.२)**

राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षण (SLAS) प्राथमिक व माध्यमिक स्तरावर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः राप्रधो-२२१५/प्र.क्र.६९/२०१५/प्रशिक्षण
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
तारीख: १० जुलै २०१५.

प्रस्तावना -

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर भर देण्यात आला. सार्वत्रिकीकरणाचे ध्येय साध्य करण्यासाठी वेगवेगळया कृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले त्यामुळे पटनोंदणी, उपस्थिती टिकवून धरणे यामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली असली तरी गुणात्मक वाढ होणे आवश्यक आहे. शिक्षणाची गुणवत्ता ठरविणारे अनेक घटक असले तरी विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणूकीचा स्तर हा महत्वाचा घटक आहे.

राष्ट्रीय स्तरावर शिक्षणाचे आरोग्य तपासण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) नवी दिल्ली ही सन २००१ पासून इयत्ता ३ री, ५ वी व ८ वी या इयत्तांचे टप्प्याटप्प्याने (दरवर्षी एक इयत्ता याप्रमाणे) अध्ययन संपादणूक सर्वेक्षण करुन शैक्षणिक गुणवत्तेचा अहवाल प्रसिध्द करीत आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राज्यातील सर्व जिल्हयांची अध्ययन संपादणूक पातळी कोणत्या स्तरावर आहे हे तपासण्यासाठी सन २०१३-१४ मध्ये फक्त मराठी माध्यमाच्या अनुदानित शाळांमधील इयत्ता ५ वी च्या मराठी व गणित या दोन विषयांचे अध्ययन संपादणूक सर्वेक्षण करण्यात आले तर सन २०१४-१५ मध्ये मराठी माध्यमाच्या अनुदानित शाळांमधील इयत्ता २ री, ३ री, ५ वी व ८ वी च्या मराठी व गणित या दोन विषयांचे अध्ययन संपादणूक सर्वेक्षण करण्यात आले. त्याचप्रमाणे इतरही स्वयंसेवी संस्था आपापल्या पध्दतीने सर्वेक्षण करुन शैक्षणिक गुणवत्तेबद्दल अहवाल प्रसिध्द करीत आहेत. संपादणूकीमध्ये राज्याचा शैक्षणिक दर्जा दरवर्षी घसरत आहे असे दिसून येत आहे.

वाचन, लेखन व गणन या मुलभूत अध्ययन क्षमतांचा विकास हा बालकांच्या प्राथमिक शिक्षणातील महत्वाचा टप्पा आहे. शालेय मुलांना प्रत्येक वर्गात ज्या क्षमता अपेक्षित आहेत त्या क्षमता त्या त्या वर्गात प्राप्त झाल्या तर शिक्षणाबाबतचा सकारात्मक दृष्टीकोन समाजामध्ये वृध्दींगत होतो. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना दर्जेदार शिक्षण मिळत आहे याची खात्री करणे ही शासनाची जबाबदारी आहे. राज्याची अध्ययन संपादणूक पातळी कोणत्या स्तरावर आहे हे जाणून घेण्यासाठी राज्याचे अध्ययन संपादणूक सर्वेक्षण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

सर्व व्यवस्थापनाच्या मान्यताप्राप्त अनुदानित व विना अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची अध्ययन संपादणूक पातळी तपासण्यासाठी राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सर्वेक्षणाचा हेतू-

१. वेगवेगळया वर्गातील गणित, भाषा विषयांच्या अध्ययन संपादणूक पातळीचे मूल्यमापन करणे.
२. अध्ययनातील कठीण क्षेत्रांचा शोध घेणे.
३. विविध सामाजिक गटातीत अध्ययन संपादणूकीची तुलना करणे.
४. ग्रामीण शहरी क्षेत्रनिहाय, लिंगनिहाय, जिल्हानिहाय विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणूकीची तुलना करणे.
५. अध्ययन संपादणूकीची पातळी उंचावण्यासाठी पुनर्नियोजन कृतिकार्यक्रमांची आखणी करता येणे.

सर्वेक्षण करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे :-

राज्यामध्ये मराठी, इंग्रजी व उर्दु माध्यमांच्या शाळांची संख्या मोठया प्रमाणात आहे. ही बाब विचारात घेऊन सन २०१५-१६ साठी पुढीलप्रमाणे सर्वेक्षणाची व्याप्ती व मर्यादा ठरविण्यात येत आहेत.

१. **सर्वेक्षणांची जनसंख्या** - मराठी, इंग्रजी व उर्दु माध्यमाच्या मान्यताप्राप्त सर्व व्यवस्थापनाच्या अनुदानित व विना अनुदानित शाळा.
२. **इयत्ता व विषय** - इयत्ता २ री ते १० वी मधील प्रथम भाषा व गणित या विषयांचे मुलभूत अध्ययन संपादणूक पातळी तपासणे.
३. निष्कर्षाचा स्तर- सर्वेक्षणाचे निष्कर्ष जिल्हास्तरापर्यंत काढणे
४. नमुना निवड- प्रत्येक जिल्यातील शाळांची व विद्यार्थ्यांची निवड यादच्छिक पध्दतीने करणे.
५. अभ्यासक्रम - ज्या त्या इयत्तांसाठी मागील इयत्तांपर्यंतच्या मुलभूत क्षमता व या वर्षीचा प्रथम सत्रापर्यंतचा अभ्यासक्रम राहील.
६. चाचणीचे स्वरुप- चाचणी वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी प्रश्नांची असेल.
७. माहिती व संकलन- माहितीचे संकलन करुन निष्कर्ष काढणे.
८. अहवाल- अहवाल प्रसिध्द करणे.

इयत्ता २ री ते इयत्ता ८ वी या इयत्तांचे संपादणूक सर्वेक्षण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची राहील. इयत्ता ९ वी व १० वी यांचे अध्ययन संपादणूक सर्वेक्षण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ यांची राहील. सर्वेक्षणाची व्याप्ती व मर्यादा विचारात घेऊन कृती कार्यक्रमाचे वेळापत्रक तयार करुन त्यास सर्वेक्षण समितीची मान्यता संबंधित संस्थांनी घ्यावी. सदर सर्वेक्षणासाठी येणाऱ्या अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव त्याचे निकष, अटी व खर्चाच्या मर्यादेसह कोणत्या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात येणार आहे. याबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव विद्यापरिषदेने शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

सर्वेक्षण समितीची रचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| (१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| (२) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे | सदस्य |
| (३) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे | सदस्य |
| (४) संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| (५) संचालक (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| (६) संशोधन व मुल्यमापन तज्ञ (अशासकीय किमान ४) | सदस्य |
| (७) प्राथमिक शिक्षक - २(अप्रगत विद्यार्थी विहीन वर्ग/शाळा केलेले शिक्षक) | सदस्य |
| (८) माध्यमिक शिक्षक-२ (१०० टक्के निकाल देणा-या शाळांमधील शिक्षक) | सदस्य |
| (९) सह संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिष्द,पुणे | सदस्य सचिव |

सदर राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक कृती कार्यक्रम, नियोजन, खर्चाचे निकष व सर्वेक्षणाचे निष्कर्ष यास राज्य सुकाणू समितीची मान्यता घेण्याची जबाबदारी संचालक, विद्या परिषद यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०७१०१७५५५४३७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nandkumar

Digitally signed by Nandkumar
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=110001, st=Maharashtra, serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da19778645dd8a362ebc5, cn=Nandkumar
Date: 2015.07.10 17:57:47 +05'30'

(नंद कुमार)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
३. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. आयुक्त (क्रीडा), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
७. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
८. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

९. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१०.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११.संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे.
१२.संचालक, यशदा, पुणे
१३.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
१४.सर्व विभागीय शिक्षण उप संचालक.
१५.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद.
१६.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१७.प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व जिल्हे.
१८. शिक्षण निरिक्षक (पश्चिम/दक्षिण/उत्तर), बृहन्मुंबई.
१९.सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग.
२०.निवडनस्ती (प्रशिक्षण)

**(परिशिष्ट ६.१)**

अखर्चित निधी खर्च
करण्याबाबतची कार्यप्रणाली

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ६ जून, २००८

वाचा:- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय,
दिनांक: २६ सप्टेंबर २००५.

प्रस्तावना:-

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे वित्त विभागाने विभागांतर्गत वर्ष अखेर अखर्चित राहिलेल्या रकमा खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी पूर्णपणे खर्च करतांना येणा-या अडचणी लक्षात घेऊन उपरोक्त शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला व अखर्चित राहीलेला निधी खर्च करण्यासाठी दिनांक ३० जून पूर्वी अनुमती घेण्याची अट शिथिल करण्यात येत आहे. आता सदर अखर्चित निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर पर्यंत खर्च करण्याची अनुमती देण्यात येत आहे. सदर अनुमती सन २००७-०८ व त्यापुढील अखर्चित रकमांसाठी राहील. मात्र सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या आधी मुक्त केलेल्या व पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०६०६१४२१५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु.प्र.कानडे )
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग

(कृ.मा.प.)

प्रतिः

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)

२. सर्व उप सचिव, अवर सचिव, वित्त विभाग,/ सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग.

३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा), मुंबई.

५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,

६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा), नागपूर.

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ वांद्रे

८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई

९. निवड नस्ती, अर्थोपाय

**(परिशिष्ट ६.२)**

जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातील राखून ठेवलेल्या २०% निधीबाबत.

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१४ /प्र.क्र.११३ / वित्त-३ .

सार्वजनिक बांधकाम भवन, १ ला मजला
२५, मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१.
दिनांक :-१७ जुलै ,२०१५.

महाराष्ट्र जिल्हा परिषदां व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील कलम १०० ला जोडलेल्या अनुसूची मध्ये नमूद केल्यानुसार, जिल्हा निधीतील, जिल्हा परिषदांच्या स्वउत्पन्नातून २०%निधी मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या योजनेकरीता राखून ठेवणे अनिवार्य आहे व असा निधी मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर पूर्णत: खर्च करावयाचा आहे.

तथापि, जिल्हा परिषदां व पंचायत समित्या,त्यांनी राखून ठेवलेला २०% निधी मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर त्या-त्या वर्षात पूर्णपणे खर्च करीत नसल्याचे पंचायत राज समिती समोरील साक्षीवेळी शासनाच्या निदर्शनास आले आहे.

वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. १००२/ प्र.क्र.१२८/ अर्थोपाय,दि. ६ जून,२००८ अन्वये वित्त विभागाने एखादया आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी पूर्णपणे खर्च करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन,अखर्चित राहिलेला निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षाअखेर खर्च करण्याची अनुमती देण्यांत आली आहे. तसेच पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीलेला निधी शासन खाती भरणे बंधनकारक केलेले आहे.

त्याअनुषंगाने जिल्हा परिषदांना आदेशीत करण्यात येते की,मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी,व योजनांमधील मुळ उद्देश सफल व्हावा याकरीता,जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्वउत्पन्नातील २०% प्रमाणे राखून ठेवलेला निधी त्याच वर्षी किंवा लगतच्या पुढील आर्थिक वर्षाअखेरच खर्च करावा अशा सूचना याव्दारे देण्यांत येत आहेत.

या प्रकरणी विहीत पध्दतीचा अवलंब करून,विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून संबंधितानी कार्यवाही करावी,जेणे करून अशा प्रकरणी कोणत्याही प्रकारच्या अनियमिता होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( र.ह.श्रावणपाटील )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. सचिव,( सर्व मंत्रालयीन विभाग )

# परिशिष्ट “ ब ”

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**मंगळवार, दिनांक १८ एप्रिल, २०१७**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

२) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

३) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

४) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

६) श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.

७) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

८) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

९) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

१०) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**उपस्थित अधिकारी :**

१. श्री. व्ही. गिरिराज, प्रधान सचिव, (व्यय) वित्त विभाग,

२. श्री. आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,

३. श्री. संजीव कुमार, प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग,

४. श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

५. श्री. भा.र.गावित, सह सचिव, सामाजिक न्याय विभाग,

६. श्री. श.मा.साठे, उप सचिव (पशुसंवर्धन) कृषि व पदुम विभाग,

७. श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

८. श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव (वित्त) ग्रामविकास विभाग,

९. श्री. एस. आर. चौहान, सहसंचालक (वित्त),

१०. श्री. ला. रा. गुजर, उप सचिव, महिला व बालविकास विभाग,

११. श्री. भि. य. मंता, उप सचिव, उर्जा विभाग,

१२. डॉ. सुवर्णा दि. खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग,

**गोंदिया जिल्हा परिषद**

डॉ. सी. एल पुलकुंडवार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने पहिल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात प्रधान सचिव, (व्यय) वित्त विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, उप सचिव, कृषि व पदुम (पशुसंवर्धन) विभाग, उप सचिव, ऊर्जा विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १९ एप्रिल, २०१७**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

२) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

३) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

६) श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.

७) श्री. अनिल बाबर, वि.स.स.

८) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

९) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**उपस्थित अधिकारी :**

१. डॉ. विजय सतबीर सिंह, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,

२. श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग,

३. श्री. राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

४. श्री. वि.रा.नाईक, सचिव, ग्रामविकास (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना) विभाग,

५. श्री. सुरेंद्र बागडे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

६. श्री. व्हि.व्हि.गुजर, सह सचिव, ग्रामविकास विभाग,

७. श्री. भा.र.गावित, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

८. श्रीमती शुभांगी सेठ, सह सचिव, वित्त विभाग,

९. श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

१०. श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

११. श्रीमती स्मिता निवतकर, उप सचिव, महिला व बालविकास विभाग,

१२. श्री. प्रकाश इंगोले, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,

१३. श्री. वि. ज. सुरळकर, संचालक, विमा संचालनालय,

१४. श्री. उत्तम कावडे, उपसंचालक, ग्रामविकास विभाग,

**सिंधुदुर्ग जिल्हा परिषद**

श्री. शेखर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने पहिल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग, प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, सचिव, ग्रामविकास (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना) विभाग, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग, सह सचिव, वित्त विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, महिला व बालविकास विभाग, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर २०१७**

**स्थळ : विधान भवन, नागपूर**

**उपस्थिती :**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

५. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

६. डॉ. देवराव होळी, वि.स.स.

७. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.

८. श्री. किशोर पाटील, वि.स.स.

९. श्री. तुकाराम काते, वि.स.स.

१०. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

११. श्री. तानाजी सावंत, वि.प.स.

१२. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

१३. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

१४. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

१५. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

१६. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेसंदर्भात विधानमंडळास सादर केलेल्या पहिल्या व दुसऱ्या अहवालाच्या शिफारशींच्या अनुपालनार्थ पहिल्या व दुसऱ्या अनुपालन अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणांसह संमत केले.

शामुना-एचबी-१९२८-मविमंसना-१२-२०१७-५६० प्रती-पीए४*